


# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | रविवार । दि. १३ सप्टेंबर २०२६ । अंक ९९ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in







## कृषी विभागाचा आकृतीबंध रद्द

**मुंबई :** तब्बल १७ वर्षांनंतर तयार करण्यात आलेला कृषी विभागाचा आकृतीबंध अधिकारी-कर्मचारी संघटनांच्या प्रखर विरोधानंतर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुढील मंगळवारी होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्र्यांच्या संमतीने आकृतीबंध अधिकृतपणे रद्द केला जाईल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. मंजूर आकृतीबंध तांत्रिक प्रवर्गावर अन्याय करणारा असून, शेतीच्या बांधावरील मनुष्यबळ कमी करून आस्थापना शाखेला अतिरिक्त मनुष्यबळ देणारा असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य कृषी सेवा महासंघाने केला होता. याविरोधात पुण्यात धरणे आंदोलन व उपोषण करण्यात आले होते.

# गणेशभक्तांची कोंडी

## लोकप्रतिनिधींची आश्वासने फोल | महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा

**। सलीम शेख ।**
**। माणगाव ।**

गणेशोत्सवाच्या तोंडावर कोकणाकडे जाणाऱ्या गणेशभक्तांचा प्रवास सुकर करण्यासाठी माणगाव-इंदापूर बायपासची एक लेन सुरू करण्याचे आश्वासने देणाऱ्या लोकप्रतिनिधींचे दावे अखेर हवेतच विरले आहेत. बायपासचे काम रखडलेलेच राहिल्याने मुंबई-गोवा महामार्गावर वाहनांचा महापूर आला असून, माणगाव-इंदापूर मार्गावर तासन्तास वाहतूक ठप्प होत आहे. पाहण्या, बैठका आणि आश्वासनांची रेलचेल झाली; मात्र प्रत्यक्षात रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा दिसत असल्याने 'आश्वासनांची लेन' सुरू झाली; पण बायपासची लेन नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवाशांमधून उमटत आहे.



गणेशोत्सवासाठी मुंबई, ठाणे, पुणे आणि परिसरातून मोठ्या संख्येने चाकरमानी कोकणाकडे रवाना झाले आहेत. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावर वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. माणगाव बाजारपेठ आणि इंदापूर परिसरातील अरुंद रस्ता, महामार्गाची मर्यादित क्षमता आणि रखडलेले बायपासचे काम यामुळे वाहतुकीचा वेग मंदावला असून, अनेक ठिकाणी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत.

गणेशोत्सवापूर्वी बायपासची किमान एक लेन वाहतुकीसाठी खुली केली जाईल, असे मंत्री, खासदार, आमदार आणि संबंधित लोकप्रतिनिधींकडून वारंवार सांगण्यात आले •>पान २ वर

## प्रवाशांची गैरसोय; पोलिसांची दमछाक

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवासाठी कोकणाकडे निघालेल्या चाकरमान्यांच्या प्रवासात शनिवारी सकाळीच वाहतूक कोंडीचे विघ्न उभे राहिले. मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव ते इंदापूरदरम्यान तब्बल तीन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने वाहतूक मंदावली. अवघ्या दहा मिनिटांचा प्रवास पूर्ण करण्यासाठी तब्बल अर्धा तास लागत असल्याने गणेशभक्तांची मोठी गैरसोय झाली. कोंडी सोडविताना वाहतूक पोलिसांचीही अक्षरशः दमछाक झाली.



> माणगाव-इंदापूर मार्गावर साधारण तीन किलोमीटर अंतरात वाहतूक कोंडी झाली आहे. अरुंद रस्त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली असून, वाहतूक सुरळीत करण्यासाठी यंत्रणा काम करीत आहे. गोव्याच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना प्राधान्य दिले जात आहे. महामार्गावर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. – सचिन पवार, पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा, रायगड

गणेशोत्सव अवघ्या दोन दिवसांवर आल्याने मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर आणि परिसरातून मोठ्या संख्येने चाकरमानी कोकणाच्या दिशेने रवाना झाले आहेत. गेल्या दोन दिवसांपासून महामार्गावर वाहनांची संख्या सातत्याने वाढत असून, शनिवारी सकाळी •>पान २ वर

## तीन वाहन्यांच्या धडकेने कोंडी

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावर नागोठणे परिसरात कोकणात जाणारी तीन वाहने एकमेकांवर आदळून अपघात झाला आहे. या अपघातात तीनही वाहनांचे थोड्याफार प्रमाणात नुकसान झाले आहे. या अपघातामुळे महामार्गावर महाड बाजूकडे जाणाऱ्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. त्यामुळे गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचे प्रचंड हाल झाले. वाहतूक कोंडी होण्याची ही घटना शनिवार, दि. १२ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास घडली होती. •>पान २ वर

## वेधक

### मराठा मोर्चा मुंबईत धडकणार

**जालना :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आंदोलनाची घोषणा केली आहे. मुंबईत १९ सप्टेंबरपासून आझाद मैदानावर आमरण उपोषण सुरू करणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी जाहीर केले आहे. गणपती बसवायचा आणि १५ सप्टेंबरला मंगळवारी मुंबईसाठी कूच करायचं, असे जरांगे म्हणाले. मनोज जरांगे पाटील यांचा मराठा मोर्चा १९ सप्टेंबरला म्हणजे गणेशोत्सवाच्या काळात मुंबईत येऊन धडकणार आहे. त्यानुसार १५ सप्टेंबर रोजी अंतरवाली सराटी येथून निघून पाटोदा, जिल्हा बीड येथे मुक्काम, १६ सप्टेंबर रोजी श्रीगोंदा, जिल्हा अहिल्यानगर, १७ सप्टेंबर रोजी हडपसर, पुणे, तर १८ सप्टेंबर रोजी खोपोली किंवा कोपर खैराणे परिसरात मुक्काम करण्याचे नियोजन असल्याचे जरांगे म्हणाले.

### नाल्यात पडून नागरिकाचा मृत्यू

**पनवेल :** सेक्टर-१ येथील सुधागड शाळेजवळून पोलीस ठाण्याकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या नाल्यात पडून एका नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. नाल्याची साफसफाई करताना काढण्यात आलेल्या संरक्षणात्मक लोखंडी जाळ्या पुन्हा बसविण्यात न आल्याने ही दुर्घटना घडल्याचा आरोप होत आहे. नाल्याच्या साफसफाईच्या कामादरम्यान नाल्यालगतच्या लोखंडी जाळ्या काढण्यात आल्या होत्या. मात्र, काम पूर्ण झाल्यानंतर या जाळ्या पुन्हा बसविण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे नाल्यालगत कोणतीही ठोस सुरक्षा व्यवस्था नसल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला होता. •>पान २ वर

# डागडुजीच्या नावाखाली थुकपट्टी

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रस्त्यांवरील खड्डे बुजवून वाहनचालकांना दिलासा देण्याऐवजी कुरुळ ते बेलकडे फाटा रस्त्यावर डागडुजीच्या नावाखाली चक्क खडी पसरवून थुकपट्टी करण्यात आली आहे. खड्ड्यांवर खडी टाकून ती व्यवस्थित दाबली किंवा आवश्यक साहित्याचा वापर न केल्याने ही खडी रस्त्यावरच पसरली आहे. त्यामुळे ऐन गणेशोत्सवात या मार्गावरून प्रवास करणाऱ्या दुचाकीस्वारांसह अन्य वाहनचालकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून, बांधकाम विभागाने दुरुस्तीऐवजी अपघाताला आमंत्रण दिल्याचा संताप प्रवाशांकडून व्यक्त होत आहे.

अलिबाग-रोहा मार्गावरील बेलकडे फाटा ते कुरुळ या रस्त्यावर ठिकठिकाणी लहान-मोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमधून वाहन चालविताना वाहनचालकांना कसरत करावी लागत असून, अनेक ठिकाणी अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. खड्ड्यांची दुरुस्ती करण्याकडे बांधकाम विभागाने •>पान २ वर




(छायाचित्र : समीर मालोदे)

### प्रवाशांकडून संताप व्यक्त

गणेशोत्सवाच्या तोंडावर नागरिकांना सुरक्षित रस्ता देण्याऐवजी खड्ड्यांवर खडीचा मुलामा देऊन बांधकाम विभागाने आपली जबाबदारी पार पाडल्याचा केवळ दिखावा केला आहे. ही थुकपट्टी तातडीने दूर करून रस्त्याची योग्य पद्धतीने दुरुस्ती करावी, अन्यथा या मार्गावर अपघात झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा संतप्त सवाल वाहनचालक आणि प्रवाशांकडून केला जात आहे.

### उडणाऱ्या धुळीमुळे आरोग्याचाही प्रश्न

रस्त्यावर पसरलेली खडी आणि त्यातून उडणाऱ्या धुळीमुळे वाहनचालक व प्रवाशांना आणखी त्रास सहन करावा लागत आहे. वाहनांच्या वर्दळीमुळे धुळीचे कण हवेत उडून नाका-तोंडात जात आहेत. त्यामुळे डोळे, नाक आणि श्वसनासंबंधी त्रास होण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे. गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या संख्येने नागरिक या मार्गावरून प्रवास करणार असल्याने हा प्रश्न अधिक गंभीर झाला असून, उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

## पिंपळभाट १२ तास अंधारात

### महावितरणच्या कारभाराबाबत तीव्र संताप

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवाच्या स्वागताची लगबग सुरू असतानाच महावितरणच्या निष्काळजी कारभाराचा फटका पिंपळभाट ग्रामस्थांना बसला. ऐन सणासुदीत संपूर्ण गाव तब्बल १२ तास अंधारात राहिले. गणपतीच्या सजावटीसह घरगुती कामांसाठी वीज आवश्यक असताना पुरवठा खंडित होऊनही तो तातडीने पूर्ववत न झाल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली. चेंढरेचे माजी सरपंच दत्ता ढवळे यांच्यासह महिला व ग्रामस्थांनी महावितरणच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. ग्रामस्थांच्या पाठपुराव्यानंतर अखेर बारा तासांनी वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला.



गणरायाचे आगमन सोमवारी (दि. १४) घरोघरी होणार आहे. त्यामुळे बाप्पाच्या स्वागतासाठी सजावट आणि विद्युत रोषणाईची तयारी जोरात सुरू आहे. अनेक भक्त रात्री उशिरापर्यंत जागून सजावटीची कामे करीत आहेत. अशातच अलिबाग तालुक्यातील पिंपळभाट गावातील वीजपुरवठा अचानक खंडित झाला.

वीजपुरवठा बंद झाल्यानंतर चेंढरेचे माजी सरपंच दत्ता ढवळे यांनी महावितरणचे सहाय्यक अभियंता कुसुमानंद दळवी •>पान २ वर

### राज्यात पावसाचा जोर वाढणार

**मुंबई :** गणेशोत्सवाच्या काळात राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मान्सूनचा परतीचा प्रवास अद्याप सुरू झालेला नसून, पुढील काही दिवसांत मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, पुणे, नाशिकसह मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत पाऊस होण्याचा अंदाज आहे. १३ सप्टेंबरला मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, पुणे, सातारा, रत्नागिरी, नाशिकसह अनेक जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. तर १४ सप्टेंबरला नाशिक घाट, पुणे घाट, पुणे, अहिल्यानगर आणि रत्नागिरीमध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे. १५ सप्टेंबरपासून पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## भोगावती नदीवरील पूल महाराष्ट्रात 'सर्वोत्कृष्ट'

### राज्य शासनाच्या पुरस्कारासाठी निवड



**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरलेल्या तरणखोप येथील पेण तरणखोप रोडवरील इजीमा ५६ भोगावती नदीवरील उच्चस्तरीय पुलाची महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून 'उत्कृष्ट पूल' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. त्यामुळे पेणच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने ११ सप्टेंबर रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, सन २०२५-२६ करिता सार्वजनिक बांधकाम विभागातील उल्लेखनीय व वैशिष्ट्यपूर्ण बांधकामांना 'उत्कृष्ट रस्ता', 'उत्कृष्ट पूल' आणि 'उत्कृष्ट इमारत' या तीन विभागांत पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये पेण •>पान २ वर

## एमएमआरडीएचा अजब कारभार!

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

पळस्पे फाटा ते डी-पॉईंट या महत्त्वाच्या जेएनपीए महामार्गावरील कॉलेज फाटा येथे लावण्यात आलेल्या दिशादर्शक फलकावर स्थानिक परिसरांची नावेच चुकीच्या पद्धतीने लिहिण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) अखत्यारितील या मार्गावरील अधिकृत फलकावर 'कळंबोली'चे नाव 'कलंबोली', तर 'करंजाडे'चे नाव 'कारंजाडे' असे छापण्यात आले आहे. सरकारी यंत्रणेच्या फलकावरच मराठी नावांची तोडमोड झाल्याने स्थानिक नागरिक आणि मराठीप्रेमींमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.




- फलकावरच मराठीची तोडमोड
- कळंबोली'चे 'कलंबोली', लिहिले तर 'करंजाडे'चे 'कारंजाडे'

पळस्पे फाटा ते डी-पॉईंट हा जेएनपीए बंदर, कळंबोली, करंजाडे यांसह परिसरातील महत्त्वाच्या भागांना जोडणारा •>पान २ वर

## ऐन गणेशोत्सवात एटीएम बंद

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला असताना मुरूड शहरातील अनेक बँकांचे एटीएम बंद असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. बँक ऑफ इंडिया, भारतीय स्टेट बँक तसेच काही खासगी बँकांच्या एटीएम सेवा बंद असल्याने सणासुदीच्या काळात रोख रकमेची गरज असलेल्या ग्राहकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.




● (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

### रोख रकमेअभावी ग्राहकांची गैरसोय
### पैसे काढण्यासाठी करावी लागतेय भटकंती

शहरातील काही प्रमुख ठिकाणी असलेल्या एटीएममध्ये तांत्रिक बिघाड, •>पान २ वर














# उरण पोलीस ॲक्शन मोडवर

- परप्रांतियांच्या व्यवसायावर फिरवला बुलडोझर
- नागरिकांकडून कारवाईचे स्वागत

| उरण | प्रतिनिधी |

उरणमध्ये बुधवारी (दि. १०) रात्री खरकट पाणी अंगावर फेकल्याच्या मुद्द्यावरून परप्रांतीय जमावाकडून पती, पत्नी आणि त्यांच्या सात वर्षीय मुलीवर लाट्या काट्याबरोबर सशस्त्र हल्ला चढवला होता. यावेळी जाब विचारणाऱ्या रुपेश भोईर यांच्यासह आणखी चार स्कूटरचे नुकसान करून, या परप्रांतीय जमावाकडून परिसरात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.

याबाबत उरण पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करून यातील तेरा परप्रांतीय जणांना अटक करण्यात आली आहे. तर आरोपी रहात असलेले ठिकाण सिडकोच्या माध्यमातून उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर यांनी जमीनदोस्त केले आहे. तसेच द्रोणागिरी विभागातील अन्य बेकायदेशीर टपऱ्यादेखील नष्ट करण्याची कारवाई पोलीस आणि सिडकोने संयुक्तरित्या केली आहे.

अशाप्रकारची उरणमध्ये करण्यात आलेली ही पहिलीच कारवाई आहे.पोलीस व सिडकोच्या धडाकेबाज कारवाई बदल मनसेचे तालुकाध्यक्ष अँड सत्यवान भगत यांनी पोलीस व सिडकोचे अभिनंदन केलं तसेच सामान्य नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, अशा प्रकारची कारवाई नियमित व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

उरणच्या द्रोणागिरी नोड मधील सेक्टर ५० मध्ये रस्त्यावरून जाणाऱ्या रुपेश भोईर याच्या अंगावर खरकटं फेकल्याचा जाब विचारताच, परप्रांतीय जमावाकडून लाठ्याकाठ्यांसह हल्ला चढवण्यात आल्याची घटना उरण पोलीस ठाण्याच्या हद्दीत बुधवारी घडली. यामध्ये मारहाण होताच रुपेश भोईर यांनी तेथून आपली पत्नी आणि पाच वर्षीय मुलीसह बाजूला जाण्याचा निर्णय घेतला.

मात्र या जमावाने आपला आतंक दाखवण्यासाठी व परिसरात दहशत निर्माण करण्याच्या दृष्टीने रुपेश भोईर यांच्या स्कुटरवर हल्ला चढवला. यामध्ये स्कूटरचे मोठे नुकसान झाले आहे. तर रुपेश भोईर यांना देखील दुःखापत झाली आहे. याबाबत उरण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती.

उरण तालुक्यात येणाऱ्या परप्रांतीय नागरिकांनी या अगोदर ही स्थानिकांवर शस्त्र हल्ले करुन आपली दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.मात्र स्थानिक पुढाऱ्यांच्या वरदहस्त मुळे परप्रांतीय नागरिक आपला बचाव करत आहे.

मात्र बुधवारी उरणमध्ये घडलेल्या घटनेचे तीव्र पडसाद स्थानिकांच्या मनात उमटू लागल्याने या घटनेचा निषेध व्यक्त करत परप्रांतीय नागरिकांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मनसे व स्थानिक नागरिकांकडून करण्यात आली.

या मागणीची दखल उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर यांनी घेऊन आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सदर १३ परप्रांतीय आरोपींना अटक केली आहे. तसेच सदर हल्ल्यानंतर अनाधिकृत व्यवसाय करणाऱ्या परप्रांतीय नागरिकांच्या टपऱ्या व पत्र्याच्या शेडवर बुलडोजरची कारवाई सिडकोच्या माध्यमातून केली आहे.

पोलीस व सिडकोच्या या कारवाईचे नागरिकांनी व उरण मनसेकडून ही स्वागत करण्यात आले आहे.

## २० सप्टेंबरला 'शाळा वाचवा, शिक्षण वाचवा' परिषद

| पनवेल | प्रतिनिधी |

'शाळा वाचवा, शिक्षण वाचवा' या बेमुदत आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पनवेल परिसरातील खांदा कॉलनी येथे स्थानिक संयोजनसमितीचीमहत्त्वपूर्णबैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत आंदोलनाची भूमिका, उद्दिष्टे आणि आगामी नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सत्यशोधक विद्यार्थी संघटनेचे तुषार सूर्यवंशी व प्रवीण जठार यांनी आंदोलनाची भूमिका आणि त्यामागील उद्दिष्टांची माहिती उपस्थितांना दिली. मुंबई येथे ५ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या 'शाळा वाचवा, शिक्षण वाचवा' आंदोलनाची भूमिका नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पनवेलमध्ये २० सप्टेंबर रोजी 'शाळा वाचवा, शिक्षण वाचवा' परिषदेचे आयोजन करण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.


## भारत सरकार, रेल्वे मंत्रालय

रेल्वे भरती बोर्ड

**केंद्रीकृत रोजगार सूचना (CEN) क्र. 05/2026**

**पॅरामेडिकल श्रेणीतील विविध पदांवर भरती**

**सूचक सूचना**

पॅरामेडिकल श्रेणीतील विविध पदांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सर्व बाबतीत पूर्ण असलेले अर्ज फक्त ऑनलाइन पद्धतीने सादर करावेत. अधिकृत संकेतस्थळ: **https://www.rrbapply.gov.in**

**अर्ज सुरू होण्याची तारीख : 15/09/2026 (तात्पुरती)**
**अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख : 14/10/2026 (23:59 वाजेपर्यंत) (तात्पुरती)**

| पदाचे नाव | 7व्या वेतन आयोगानुसार वेतन स्तर | वैद्यकीय मानक | 01.01.2027 रोजी वय | तात्पुरती रिक्त पदे (सर्व RRB) |
|---|---|---|---|---|
| पॅरामेडिकल श्रेणीतील विविध पदे | वेतन स्तर 3 ते वेतन स्तर 7 | तपशीलवार CEN नुसार | तपशीलवार CEN नुसार | 560 |

**टीप:**
1. ऑनलाइन अर्ज भरताना उमेदवारांनी आधारद्वारे आपली प्राथमिक माहिती पडताळून घेण्याचा सल्ला देण्यात येत आहे, जेणेकरून भरती प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर होणाऱ्या सविस्तर छाननीमुळे गैरसोय व विलंब टाळता येईल.
2. आधारद्वारे यशस्वी पडताळणी करण्यासाठी, आधारमधील नाव व जन्मतारीख ही 10वीच्या प्रमाणपत्रातील पूर्ण नाव व जन्मतारखेशी जुळणारी असणे आवश्यक आहे. तसेच, आधारमधील छायाचित्र अद्ययावत असावे आणि बायोमेट्रिक माहिती (बोटांचे ठसे व आयरिस) ऑनलाइन अर्ज भरण्यापूर्वी अद्ययावत केलेली असावी.
3. ही सूचना केवळ सूचक स्वरूपाची असून, संभाव्य उमेदवारांना भरतीसाठी आवश्यक प्रमाणपत्रे किंवा कागदपत्रांची माहिती देण्याच्या उद्देशाने जारी करण्यात आली आहे. भरतीसाठी लागू असलेल्या सर्व अटी, पात्रता निकष, प्रक्रिया व इतर आवश्यकता संबंधित CEN क्र. 05/2026 मध्ये नमूद केल्याप्रमाणे काटेकोरपणे लागू राहतील. भविष्यात कोणतेही शुद्धिपत्रक (Corrigendum) जारी झाल्यास ते वेळोवेळी सर्व RRB च्या संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात येईल.

सर्व RRB च्या अधिकृत संकेतस्थळांची माहिती: **https://rrb.indianrailways.gov.in** उमेदवार संबंधित RRB च्या संकेतस्थळावरून वेबपेजवर जाऊ शकतात.

**संख्या - आरआरबी / आरएनसी / एडीवीटी / सीईएन / 05/2026**
**दिनांक : 13/09/2026**

**अध्यक्ष**
**रेल्वे भरती बोर्ड**

"फसवणूक करणारे, दलाल आणि नोकरीचे आमिष दाखवणाऱ्यांपासून सावध रहा."

555


पान १ वरुन

## डागडुजीच्या नावाखाली थुकपट्टी

सातत्याने दुर्लक्ष केल्याने त्यांचा आकार आणि संख्या वाढत गेली.

गणेशोत्सवापूर्वी रस्त्यांवरील खड्डे दुरुस्त करण्याचे आदेश प्रशासनाकडून बांधकाम विभागाला देण्यात आले होते. त्यामुळे या मार्गावरील खड्डे व्यवस्थित बुजवून रस्ता वाहतुकीसाठी सुरक्षित होईल, अशी अपेक्षा वाहनचालकांना होती. मात्र, प्रत्यक्षात बांधकाम विभागाने खड्ड्यांवर केवळ खडी पसरवून आपली जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केल्याचे चित्र दिसून येत आहे. खडीखाली आवश्यक माल टाकण्यात न आल्याने आणि ती व्यवस्थित रोलरने दाबण्यात न आल्याने रस्त्यावर ठिकठिकाणी खडी पसरली आहे. सध्या गणेशोत्सवासाठी खरेदी करण्याकरिता अलिबागकडे जाणाऱ्या नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यातच गणेशोत्सवासाठी मुंबई, नवी मुंबईसह अन्य भागांतून कोकणात येणारे चाकरमानीही या मार्गाचा वापर करीत आहेत. त्यामुळे या रस्त्यावर वाहनांची वर्दळ वाढली असताना रस्त्यावर पसरलेली खडी वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत आहे.विशेषतः दुचाकीस्वारांना या खडीचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. अचानक ब्रेक लावल्यास किंवा वाहनाचा वेग किंचित वाढल्यास खडीवरून दुचाकी घसरून अपघात होण्याची भीती आहे. चारचाकी आणि अन्य वाहनांनाही खडीमुळे वाहनावर नियंत्रण ठेवताना अडचणी येत आहेत. त्यामुळे खड्डे बुजविण्याऐवजी रस्त्यावर खडी पसरवून बांधकाम विभागाने नागरिकांच्या सुरक्षिततेशी खेळ सुरू केल्याचा आरोप प्रवाशांकडून केला जात आहे.एकीकडे प्रशासनाकडून गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रस्ते सुरक्षित करण्याचे आदेश दिले जात असताना दुसरीकडे संबंधित विभागाकडून दुरुस्तीच्या नावाखाली वरवरची मलमपट्टी केली जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. खड्डे बुजविण्यासाठी आवश्यक दर्जाचे साहित्य वापरून रस्ता मजबूत करण्याऐवजी केवळ खडी पसरविण्याचा प्रकार नेमका कोणाच्या आदेशाने आणि कोणत्या निकषांवर करण्यात आला, असा सवालही उपस्थित होत आहे.

या प्रकाराबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच एमएसआयडी विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे रस्त्याच्या दुरुस्तीचे काम कोणत्या पद्धतीने करण्यात आले, त्यासाठी किती निधी खर्च करण्यात आला आणि कामाचा दर्जा कोण तपासणार, असे प्रश्नही आता उपस्थित झाले आहेत.

## गणेशभक्तांची कोंडी!

होते. कामाची पाहणी, बैठका आणि ठेकेदाराला सूचना यानंतरही प्रत्यक्षात मात्र एकही लेन सुरू झाली नाही. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी दिलेली आश्वासने फोल ठरल्याचे चित्र आहे.स्थानिक माध्यमांनी यापूर्वीच बायपासच्या कामाची गती, मनुष्यबळ आणि यंत्रसामग्री पाहता गणेशोत्सवापूर्वी लेन सुरू होणे कठीण असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. अखेर गणेशोत्सवाच्या उंबरठ्यावर निर्माण झालेली वाहतूक कोंडी या वस्तुस्थितीवर शिक्कामोर्तब करणारी ठरली आहे.

**पाहण्या झाल्या, मग काम कुठे?**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी बायपासची पाहणी केली. ठेकेदाराकडून कामाचा आढावा घेण्यात आला आणि कामाला वेग देण्याच्या सूचना देण्यात आल्या. मात्र या सर्व प्रक्रियेनंतरही वाहतुकीला दिलासा मिळालेला नाही. त्यामुळे पाहणी, बैठक आणि आश्वासनांपलीकडे प्रत्यक्ष काम किती पुढे गेले, याचा हिशेब जनतेसमोर ठेवण्याची वेळ आली आहे.

जर गणेशोत्सवापूर्वी एक लेन सुरू करणे शक्य नव्हते, तर त्याची वस्तुस्थिती वेळेत का सांगण्यात आली नाही? कामाची वास्तविक प्रगती लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला माहीत होती का? आणि माहीत असूनही आश्वासने दिली असतील, तर त्याची जबाबदारी कोणाची? हे प्रश्न आता कोंडीत अडकलेल्या प्रवाशांकडूनच विचारले जात आहेत.

दरवर्षी गणेशोत्सवात कोकणाकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या वाढते, हे प्रशासनाला आणि महामार्ग यंत्रणेला माहीत असतानाही पर्यायी वाहतूक नियोजन का झाले नाही, असा सवालही उपस्थित होत आहे. एकेरी मार्ग, डायव्हर्शन, पार्किंग, अतिरिक्त मनुष्यबळ आणि वाहतूक नियोजन याबाबत आधीच ठोस उपाययोजना करणे अपेक्षित होते. पोलीस कर्मचारी वाहतूक सुरळीत करण्यासाठी रस्त्यावर उतरले असले तरी पोलीस वाहतूक नियंत्रित करू शकतात; रखडलेला बायपास पूर्ण करू शकत नाहीत. त्यामुळे वाहतूक पोलिसांवर अतिरिक्त ताण देण्यापेक्षा माणगाव-इंदापूर बायपासचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्याची गरज आहे.

गणेशोत्सवासाठी आनंदाने गावाकडे निघालेल्या चाकरमान्यांना माणगावमध्येच तासन्तास कोंडीत अडकावे लागत आहे. वृद्ध, महिला आणि लहान मुलांसह प्रवाशांचे हाल होत आहेत. त्यामुळे माणगाव पुन्हा एकदा मुंबई-गोवा महामार्गावरील 'वाहतूक कोंडीचा स्पॉट' ठरला असून, लोकप्रतिनिधींच्या आश्वासनांची पोलखोल या कोंडीनेच केली आहे.

## प्रवाशांची गैरसोय; पोलिसांची दमछाक

माणगाव-इंदापूर मार्गावर त्याचा मोठा परिणाम जाणवला.

मुंबई-गोवा महामार्गाचे रखडलेले काम, अपूर्ण माणगाव-इंदापूर बाह्यवळण मार्ग, अरुंद रस्ता आणि काही वाहनचालकांकडून होणारे वाहतुकीचे नियमभंग यामुळे कोंडीत आणखी भर पडत असल्याचे सांगण्यात आले. वाहनांची संख्या वाढल्याने महामार्गावरील वाहतूक संथ झाली आणि काही वेळातच वाहनांच्या रांगा तीन किलोमीटरपर्यंत पोहोचल्या.

वाहतूक सुरळीत करण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या नेतृत्वाखाली महामार्गावर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गोव्याच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना प्राधान्य देत वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## तीन वाहनांच्या धडकेने कोंडी

नागोठणे हद्दीतील हॉटेल रुचीसमोर एका ठिकाणी महाड बाजूकडे जाणाऱ्या मार्गिकेवरील डायव्हरजनच्या ठिकाणी दोन जॉईंटवर रस्ता समपातळीत तयार न करता खालीवर तयार केल्याने पुढील वाहनाने ब्रेक मारल्यामुळे ही तीन वाहने एकमेकांवर आदळल्याने किरकोळ अपघात घडवून ही वाहतूक कोंडी झाली. काही वेळानंतर पोलीस व वाहतूक शाखेचे पोलीस घटनास्थळी आल्यानंतर त्यांनी महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली. अपूर्ण अवस्थेतील मुंबई गोवा महामार्गावरून गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या कोकणकरांची वाट बिकट झाली असून, प्रवाशांना तासनतास एकाच जागेवर खोळंबून राहावे लागत आहे. सणासुदीच्या काळात झालेल्या या अपघातामुळे चाकरमान्यांचा प्रवास अत्यंत खडतर आणि मनस्ताप देणारा ठरत आहे.

## ऐन गणेशोत्सवात एटीएम बंद

रोख रकमेचा तुटवडा किंवा सेवा बंद असल्याचे चित्र आहे. त्यामुळे पैसे काढण्यासाठी नागरिकांना दुसऱ्या एटीएमचा शोध घेत दूरवर जावे लागत आहे. गणेशोत्सवाच्या काळात बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. विविध व्यवहारांसाठी रोख रकमेची गरज वाढली असताना एटीएम सेवा बंद असल्याने ग्राहकांच्या अडचणीत भर पडली आहे. सणासुदीच्या काळात एटीएम सेवा सुरळीत ठेवण्याची जबाबदारी संबंधित बँकांची असताना सेवा बंद असल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

## पिंपळभाट १२ तास अंधारात

यांच्याशी संपर्क साधला. मात्र, वीजपुरवठा पूर्ववत करण्याऐवजी उडवाउडवीची उत्तरे देण्यात आल्याचा आरोप ढवळे यांनी केला आहे. त्यामुळे पिंपळभाट गाव तब्बल १२ तास अंधारात राहिले.

खंडित वीजपुरवठ्याबाबत दत्ता ढवळे, संदीप ढवळे, सुरेश घरत यांच्यासह ग्रामस्थांनी महावितरण कार्यालयात धाव घेत अधिकाऱ्यांना जाब विचारला. ग्रामस्थांच्या पाठपुराव्यानंतर अन्य अधिकाऱ्यांच्या मदतीने अखेर वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. ऐन गणेशोत्सवाच्या काळात वीजपुरवठा खंडित होऊनही संबंधित अधिकारी जबाबदारीने काम करीत नसल्याचा आरोप दत्ता ढवळे यांनी केला आहे. सहाय्यक अभियंता दळवी हे कार्यालयात दारूच्या नशेत काम करीत असल्याची शंका निर्माण झाल्याचाही आरोप त्यांनी केला आहे.या प्रकारामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागल्याने सहाय्यक अभियंता दळवी यांच्याविरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांकडे निवेदन देऊन तक्रार करण्यात आली आहे. यासंदर्भात कार्यकारी अभियंत्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र संपर्क होऊ शकला नाही.

## नाल्यात पडून नागरिकाचा मृत्यू

या पार्श्वभूमीवर नाल्यालगतच्या संरक्षणात्मक जाळ्या का बसविण्यात आल्या नाहीत, याची सखोल चौकशी करून संबंधित ठेकेदार तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी मनसे कळंबोली शहराध्यक्ष राहुल चव्हाण यांनी केली आहे. भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी सेक्टर-१ मधील सदर नाला कायमस्वरूपी बंदिस्त करावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. नाला बंदिस्त करण्याचे काम पूर्ण होईपर्यंत नाल्याभोवती मजबूत लोखंडी जाळ्या, संरक्षण कठडे आणि पुरेशी प्रकाशव्यवस्था तातडीने उभारावी, अशी मागणीही राहुल चव्हाण यांनी केली आहे.

## भोगावती नदीवरील पूल महाराष्ट्रात 'सर्वोत्कृष्ट'

तालुक्यातील तरणखोप येथील रोडवरील भोगावती नदीवर उभारण्यात आलेल्या १०० मीटर लांबीच्या उच्चस्तरीय पुलाची 'उत्कृष्ट पूल' म्हणून निवड करण्यात आली आहे.या पुलामुळे पेण-तरणखोप मार्गावरील वाहतूक अधिक सुरक्षित आणि सुलभ होण्यास मदत झाली असून, परिसरातील नागरिकांच्या दळणवळणालाही मोठा हातभार लागला आहे. तांत्रिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण आणि सार्वजनिक उपयोगाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरलेल्या या पुलाला राज्य शासनाच्या पुरस्कारासाठी मिळालेली मान्यता ही पेण तालुक्यासाठी निश्चितच अभिमानाची बाब आहे. राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुरस्काराच्या यादीत पेण तालुक्यातील पुलाचा समावेश झाल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

## एमएमआरडीएचा अजब कारभार!

प्रमुख मार्ग आहे. या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात अवजड वाहने, प्रवासी वाहने तसेच स्थानिक नागरिकांची वाहतूक सुरू असते. वाहनचालकांना योग्य दिशा मिळावी यासाठी कॉलेज फाटा येथे एमएमआरडीएकडून मोठा दिशादर्शक फलक उभारण्यात आला आहे. मात्र, या फलकावरील स्थानिक भागांच्या नावांचेच चुकीचे शुद्धलेखन करण्यात आल्याने प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. 'कळंबोली' या नावातील 'ळ'चा 'ल' करून 'कलंबोली' असा उल्लेख करण्यात आला आहे. तसेच 'करंजाडे' या प्रचलित नावाचे 'कारंजाडे' असे चुकीचे लेखन करण्यात आले आहे. फलक तयार करण्यापूर्वी त्यावरील नावांची साधी शुद्धलेखन तपासणीही करण्यात आली नाही का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे, हा काही खासगी संस्थेचा फलक नसून सार्वजनिक निधीतून उभारण्यात आलेला अधिकृत दिशादर्शक फलक आहे. त्यामुळे अशा फलकांवर स्थानिक ठिकाणांची नावे अचूक आणि प्रमाण मराठीत असणे अपेक्षित आहे. मात्र, संबंधित अधिकारी व कंत्राटदारांच्या दुर्लक्षामुळे मराठी भाषेचीच हेळसांड होत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. दरम्यान, कॉलेज फाटा येथील या फलकाची एमएमआरडीए प्रशासनाने तातडीने दखल घेऊन चुकीची नावे दुरुस्त करावीत, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पराग बालड यांनी केली आहे. सार्वजनिक ठिकाणी लावण्यात येणाऱ्या सर्व दिशादर्शक फलकांवरील मराठी नावांची योग्य शुद्धलेखन तपासणी करूनच ते लावण्यात यावेत, अशीही मागणी जोर धरू लागली आहे.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी मौजे कोळगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कोळगांव ता.अलिबाग | ३६७/१ | जिरायत ०-३८-२० वरकस ०-०६-१० पो.ख. ०-०२-८० एकूण ०-४७-१० | ९.५२ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकतीपैकी विक्रेता यांचे सामाईकांत असलेले क्षेत्र ०-३२-०० हे. आर. व त्यावर असणारी ग्रुप ग्रामपंचायत सासवणे मालमत्ता क्र. १४५१ हि घर मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक १) वैजयंती चंद्रकांत म्हात्रे, २) शर्मिला चंद्रकांत ठाकुर, ३) राजश्री सुभाष म्हात्रे, ४) साधना अजित काटकर व ५) प्राप्ती निलेश गावंड यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती ह्या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक - १२/०९/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस-लक्ष्मी नारायण, पहिला मजला, गाळा नं. ७ व ८, ब्राह्मण आळी, राममंदिरसमोर, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे बेलकडे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| बेलकडे | ८९ | ०-४९-०० पो.ख.०-१७-०० ०-६६-०० | ०.६० | दत्तात्रेय घारू पाटील |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेच्या त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे, असे गृहित धरून आमचे अशिल सदरची मिळकत खरेदी करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. १३/०९/२०२५

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा.वत्सला, टिळक रोड, स्टेट बँके समोर, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे बेलकडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| बेलकडे | ८६ | ०-२०-०० पो.ख.०-०७-०० ०-२७-०० | ०.२५ | विलास राजाराम पाटील |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेच्या त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे, असे गृहित धरून आमचे अशिल सदरची मिळकत खरेदी करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. १३/०९/२०२५

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा.वत्सला, टिळक रोड, स्टेट बँके समोर, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार १) सौ.सुषमा प्रमोद डवरे २) श्री.आनंद मोडक यांनी मौजे-वाकस, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत सदर मिळकतीचे मालक १) श्री. पांडुरंग उंदराजी वैखरे. २) श्रीमती.नंदाबाई सखाराम डायरे. ३) श्री.रामा उंदराजी वैखरे ४) सौ. रखमाबाई दादा पाटील. ५) सौ.कांता गोपाळ वैखरे. ६) श्री.महेश गोपाळ वैखरे. ७) श्री. राजेंद्र गोपाळ वैखरे ८) सौ. रीना रवींद्र भुसारी. ९) सौ.नीलम अशोक बागडे. १०) सौ.योगिता योगेश डायरे सर्व रा. वाकस, ता. कर्जत, जि. रायगड. यांचेकडुन विकत घेण्याची ठरवलेली आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ५२ | २ | ०.८८.०० | ०.७० |

सबब सदर व्यवहारा बाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदर जाहिर नोटीसी प्रसिद्ध केल्यापासुन १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथम दर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत दाखल न झालेस सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत.

दिनांक : १३/०९/२०२६

**ॲड. ऋषीकेश अनिल कांबळे**
बी.ए.एल.एल.बी.
नेरळ, कुंभार आळी,
जिल्हा परिषद शाळेसमोर,
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९५६१७३४३७७

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे आशिल श्री. राहूल रविंद्र वैद्य, श्रीमती रूपाली रविंद्र वैद्य, श्रीमती गिरिजा भालचंद्र कान्हेरे, श्रीमती वंदना वसंत केळकर, श्री महेंद्र अरविंद वैद्य, श्रीमती अस्मिता मिलींद केतकर, श्रीमती वसुधा विष्णू वैद्य, श्रीमती मेघना माधव वैद्य, श्री. वैभव माधव वैद्य, श्रीमती मिताली एदय दामले, श्रीमती योगिनी यशवंत वैद्य, श्री. राजेश यशवंत वैद्य, श्रीमती संगिता विनायक वैद्य, श्री. दिपक विनायक वैद्य, श्रीमती आसावरी समीर दातार, श्री. किशोर वसंत शिंत्रे, श्री. विवेक वसंत शिंत्रे हे सर्व मौजे भोनंग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनांकीत सामाईक जमीन मिळकतींचे कायदेशीर व नोंदणीकृत मालक व भोगवटादार आहेत.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) | भोगवटादार पद्धत |
|---|---|---|---|---|
| भोनंग, ता.अलिबाग जि.रायगड | २७० | जिरायत ०.९२.७० पो.ख.०.०१.१० एकूण क्षेत्र ०.९३.८० | ४.९९ | वर्ग २ |
| | २९९ | जिरायत ०.२३.४० पो. ख.०.००.०० एकूण क्षेत्र ०.२३.४० | १.२५ | वर्ग २ |
| | ३२५/१ | जिरायत ०.९५.०० पो.ख.०.००.०० एकूण क्षेत्र ०.९५.०० | १.७४ | वर्ग १ |
| | ३९१ | जिरायत ०.३१.०० पो.ख.०.०३.०० एकूण क्षेत्र ०.३४.०० | ८.३७ | वर्ग १ |
| | ४१० | जिरायत ०.००.०० वरकस ११.३५.०० पो.ख. ०१.०७.०० एकूण क्षेत्र १२.४२.०० | १८.९५ | वर्ग १ |
| | ४२९ | जिरायत ०.००.०० वरकस ०.११.०० पो. ख.०.००.०० एकूण क्षेत्र ०.११.०० | ०.२० | वर्ग १ |
| | ४६४ | जिरायत ०.००.८० पो. ख. ०.००.०० एकूण क्षेत्र ०.००.८० | ०.१९ | वर्ग २ |
| | ४७६ | जिरायत ०.००.०० वरकस ०.०४.०० पो.ख. ०.००.०० एकूण क्षेत्र ०.०४.०० | ०.०८ | वर्ग २ |

आमच्या अशिलांना सदर मिळकतींचे हक्क व मालकी निर्वेध, बोजारहित व स्वच्छ (Clear and Marketable Title Report) असल्याचे स्पष्ट करण्यासाठी ''टायटल रिपोर्ट'' तयार करायचा आहे. आमच्या अशिलांनी सदर मिळकतीबाबत कोणालाही विक्रीचा, गहाण अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा व्यवहार केलेला नाही. परंतु, काही इसम/व्यक्ती सदर मिळकतीबाबत साठेकरार, कुलमुखत्यारपत्र (Power of Attorney) किंवा इतर हक्क असल्याचा गैरसमज पसरवत असल्याचे आमच्या अशिलांच्या निदर्शनास आले आहे. आमच्या अशिलांनी किंवा त्यांच्या पूर्वजांनी अथवा कोणत्याही सह-हिस्सेदारांनी असा कोणताही व्यवहार केलेला नाही.

तरी वरील नमूद मिळकतींच्या संदर्भात सदर मिळकतीचे मालक, त्यांचे पूर्वज किंवा कोणत्याही वारसांकडून अथवा सह-हिस्सेदारांकडून कोणाचाही काही साठेकरार, Power of Attorney कुलमुखत्यारपत्र (Power of Attorney), गहाण/तारण, दान, बक्षिस, लिज, बयाणा पावती, फरोक्तखत, खरेदीखत, कोर्टात दावा, मृत्युपत्र, वारसाहक्क, वहिवाटीचा मार्ग किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार अथवा हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील सही करणाऱ्या वकिलांकडे योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरूपात हरकती नोंदवाव्यात.

विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास, सदर मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार, बोजा किंवा साठेकरार Power of Attorney अस्तित्वात नाही आणि सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध (Clear Title) आहे असे गृहीत धरून पुढील टायटल रिपोर्ट देण्यात येईल. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत किंवा दावा आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : अलिबाग
दि. १०/०९/२०२६

सही /-
**ॲड. रोशन अनिल राऊत**
पत्ता- वढाव खर्दु, पो. बामणगाव, ता.अलिबाग, जि.रायगड.
मो.क्र.७७९८०२७६३८

# संघर्षाची मशाल; स्व. मीनाक्षीताई पाटील

**स्वर्गीय मीनाक्षीताई पाटील यांचा जीवनप्रवास म्हणजे संघर्ष, समाजसेवा, राजकीय ध्येयवाद आणि महिलांच्या सक्षमीकरणाची प्रेरणादायी कहाणी आहे. अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याची जिद्द त्यांना रक्तातून आणि घरच्या संस्कारातून मिळाली. रायगडच्या मातीत अन्यायाविरुद्ध संघर्षाची मशाल पेटविणारे कै. नारायण नागू पाटील ऊर्फ आप्पासाहेब आणि त्यानंतर दादा-भाऊ म्हणून परिचित कै. दत्ता पाटील व कै. प्रभाकर पाटील यांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रभाव मीनाक्षीताईंच्या व्यक्तिमत्त्वावर बालपणापासूनच पडला. त्यामुळे राजकारण त्यांच्यासाठी केवळ सत्ता नव्हे, तर सामान्य माणसाच्या प्रश्नांसाठी लढण्याचे माध्यम बनले.**

प्रा. महेश बिऱ्हाडे



मीनाक्षीताईंचा जन्म १३ सप्टेंबर १९४७ रोजी कर्जत तालुक्यातील भडवळ येथे झाला. जन्मावेळी आलेले वादळ आणि मुसळधार पाऊस जणू त्यांच्या भविष्यातील वादळी व्यक्तिमत्त्वाचीच चाहूल देणारा ठरला. लहानपणी त्यांना प्रेमाने 'बेबी' म्हणून संबोधले जात असे. त्या हुशार, टापटिपीच्या, पण तितक्याच हट्टी आणि स्पष्टवक्त्या होत्या. कै. नारायण नागू पाटील स्वतः त्यांचा अभ्यास घेत असत. पुढे सामाजिक आणि राजकीय जीवनात गोरगरीब, आदिवासींच्या घरात जाऊन त्यांच्यासोबत जेवणारी मीनाक्षीताई पाहिल्यावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील परिवर्तन प्रकर्षाने जाणवत असे.

पोयनाड येथे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी अलिबागच्या जनता महाविद्यालयातून उच्च शिक्षण घेतले. त्यांनी वकील व्हावे, अशी कुटुंबाची इच्छा होती. मात्र परिस्थितीमुळे ते शिक्षण पूर्ण करता आले नाही. तरीही पुढे कायदे करणाऱ्या विधानसभेत आपल्या अभ्यासू आणि आक्रमक भूमिकेने त्यांनी स्वतःचे भक्कम स्थान निर्माण केले.

वयाच्या दहाव्या वर्षापासूनच त्या वडील प्रभाकर पाटील यांच्यासोबत सभा-संमेलनांना जाऊ लागल्या. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळातील एक प्रसंग त्यांच्या धाडसी स्वभावाची साक्ष देतो. स.का. पाटील यांच्या विरोधातील आंदोलनात अवघ्या तेरा-चौदा वर्षांच्या बेबीने गर्दीतून धावत जाऊन त्यांच्या हातात बांगड्या भरल्या. हा प्रसंग पाहून आंदोलनाचे नेते जयंतराव टिळक यांनी ही मुलगी भविष्यात मोठी पुढारी होईल, अशी भविष्यवाणी केली होती. पुढे ती अक्षरशः खरी ठरली.

१९६८ मध्ये त्यांनी भूविकास बँकेत नोकरी सुरू केली; मात्र, समाजकारणाची ओढ आणि घरातून मिळालेले राजकीय संस्कार यामुळे त्यांनी नोकरीचा त्याग केला. १९७७-७८ मध्ये पोयनाड-आंबेपूर ग्रामपंचायतीच्या सदस्य म्हणून त्यांची राजकीय कारकीर्द सुरू झाली. त्या आंबेपूर ग्रामपंचायतीच्या पहिल्या महिला सदस्या आणि पहिल्या महिला सरपंच ठरल्या. त्यांच्या कार्यकाळात ग्रामपंचायतीने विकासाची अनेक कामे केली. अतिक्रमणे हटविणे, बेघरांना घरे व प्लॉट मिळवून देणे, शेतकरी योजना राबविणे, रोजगाराच्या संधी निर्माण करणे तसेच आंबेपूरचा सोमवारचा आठवडी बाजार सुरू करण्यासाठी दिलेला कायदेशीर लढा हे त्यांच्या कार्यकौशल्याचे उदाहरण ठरले.

या कार्याची दखल घेत १९७९ मध्ये त्यांची रायगड जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीवर तज्ज्ञ सदस्य म्हणून निवड झाली. आणीबाणीच्या काळात प्रभाकर पाटील तुरुंगात असताना मीनाक्षीताईंनी त्यांना लिहिलेली पत्रे कैद्यांसमोर वाचली जात. त्यामुळे त्यांना 'पत्रकन्या' म्हणूनही संबोधले गेले.

पत्रकारितेतही त्यांचा ठसा उमटला. १९७५ मध्ये त्या रायगड मराठी पत्रकार संघाच्या पहिल्या महिला अध्यक्षा बनल्या आणि तब्बल १५ वर्षे त्यांनी नेतृत्व केले. त्यांच्या काळात पत्रकार संघाने अनेक उपक्रम राबविले.

१९९२ मध्ये वैजाळी जिल्हा परिषद मतदारसंघातून त्या निवडून आल्या. "रायगड जिल्हा परिषद हे माझे विद्यापीठ आणि प्रभाकर पाटील हे या विद्यापीठाचे कुलगुरू," असे त्या अभिमानाने सांगत. जिल्हा परिषदेतून त्यांनी संसदीय कामकाजाचे धडे घेतले आणि सामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली.

१९९५ मध्ये शेतकरी कामगार पक्षाने त्यांना अलिबाग-उरण मतदारसंघातून विधानसभेची उमेदवारी दिली आणि त्या मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्या. २००० मध्ये पुन्हा विजयी होत त्यांनी मत्स्य व बंदर विकास खात्याच्या राज्यमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली. मच्छिमार आणि कोकणातील बंदरांच्या विकासाला प्राधान्य देत त्यांनी निर्णय घेतले. मात्र, सरकारचे निर्णय पक्षाच्या तत्त्वांविरोधात जात असल्याचे जाणवताच शेकापच्या आदेशानुसार त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. "प्रश्न संख्येचा नसून तत्त्वाचा आहे," हा त्यांचा ठाम संदेश महाराष्ट्राच्या राजकारणात गाजला.

२००४-०५ मध्ये नामसाधर्म्य असलेल्या डमी उमेदवारांमुळे त्यांना पराभव पत्करावा लागला. मात्र, त्या खचल्या नाहीत. पक्षसंघटना आणि कार्यकर्त्यांचे जाळे पुन्हा मजबूत करून २००९ मध्ये पुनर्रचित अलिबाग-मुरुड मतदारसंघातून त्या प्रचंड मतांनी विजयी झाल्या.

विधानसभेतील त्यांची आक्रमक शैली सर्वपरिचित होती. महिला आमदारांच्या प्रश्नांना त्यांनी सातत्याने आवाज दिला. हुंडाबळी, लैंगिक अत्याचार, स्त्रीभ्रूणहत्या आणि आश्रमशाळेतील मुलींवरील अत्याचार या विषयांवर त्यांनी सरकारला धारेवर धरले. स्त्रीभ्रूणहत्येविरोधात त्यांनी "एकीकडे जिजाबाई, सावित्रीबाई फुले यांचा वारसा सांगतो, मग मुलगी का नाकारतो?" असा सवाल उपस्थित केला. महिलांनी आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात सक्षम व्हावे, हा त्यांचा कायम आग्रह होता.


महिला बचतगटांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरणाला त्यांनी प्रोत्साहन दिले. रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून बचतगटांना बळ देण्याच्या उपक्रमात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

"आभाळाशी स्पर्धा करण्याएवढी इर्षा, मुठीएवढ्या मनामध्ये सतत असू दे; स्वार्थापुढे सामर्थ्याला झुकू देऊ नकोस, सत्तेपुढे कर्तव्याला वाकू देऊ नकोस," हा त्यांचा विचार त्यांच्या संपूर्ण जीवनाचे सार सांगणारा आहे.

प्रभाकर पाटील आणि दत्ता पाटील यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले; मात्र, त्यांच्या यशाचा पाया त्यांच्या स्वकर्तृत्वात होता. प्रेमळ मातृतुल्य स्वभाव, विलक्षण स्मरणशक्ती, कार्यकर्त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप आणि अन्यायाविरुद्ध रौद्ररूप धारण करण्याची ताकद यामुळे मीनाक्षीताई पाटील यांनी रायगडच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात अढळ स्थान निर्माण केले. त्या आज आपल्यात नसल्या तरी त्यांचे विचार, संघर्षाची भूमिका आणि महिलांच्या सक्षमीकरणाचा संदेश कायम प्रेरणा देत राहील. स्व. मीनाक्षीताई पाटील यांना त्रिवार लाल सलाम!

# 'अवजड' बंदीमुळे रस्ते जाम

| खांदेश्वर | प्रतिनिधी |



गणेशोत्सवासाठी मुंबई-गोवा महामार्गावरून कोकणाकडे जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित व्हावा, यासाठी अवजड वाहनांच्या वाहतुकीवर बंदी घालण्यात आली आहे. मात्र, या बंदीमुळे अवजड वाहने मुंबई-पुणे मार्गासह जेएनपीटी मार्गावरील विविध ठिकाणी उभी करण्यात आल्याने वाहतुकीचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः एनएच-४ आणि जेएनपीटी मार्गावरील पुल परिसरात अवजड वाहने मोठ्या संख्येने पार्क करण्यात आल्याने वाहतूक कोंडीला आमंत्रण मिळाले.

या अवजड वाहनांसाठी करण्यात आलेल्या पार्किंगमुळे मार्गावरील उपलब्ध रस्त्याची जागा कमी झाली आहे. त्याचा परिणाम मुंबई तसेच उपनगरांकडे जाणाऱ्या वाहनांच्या वाहतुकीवर झाला.

गणेशोत्सवासाठी कोकणाकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या आधीच वाढली असताना दुसरीकडे अवजड वाहनांच्या पार्किंगमुळे वाहतुकीवर अतिरिक्त ताण आला आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीमध्ये अनेक वाहनचालक अडकून पडले. काही ठिकाणी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने प्रवाशांना संथ गतीने प्रवास करावा लागला. एकीकडे कोकणातील चाकरमान्यांचा प्रवास सुरळीत व्हावा, यासाठी अवजड वाहनांवर निर्बंध घालण्यात आले आहेत. तर, दुसरीकडे त्याच अवजड वाहनांना महामार्गालगत उभे करण्यामुळे मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याचे चित्र आहे.

गणेशोत्सवाच्या काळात रस्त्यावर वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढणार असल्याने अवजड वाहनांच्या पार्किंगचे योग्य नियोजन करण्याची मागणी वाहनचालकांकडून होत आहे. वाहतूक पोलिसांनी कोंडीच्या ठिकाणी लक्ष देऊन अवजड वाहनांची शिस्तबद्ध पार्किंग व्यवस्था करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. चाकरमान्यांचा कोकण प्रवास सुखकर करण्यासाठी घेतलेल्या निर्णयाचा फटका मुंबईकडे जाणाऱ्या वाहनचालकांना बसू नये, यासाठी प्रशासनाने वाहतूक व्यवस्थेचे योग्य नियोजन करण्याची गरज आहे.

## रेल्वे स्थानकात चाकरमान्यांची गर्दी

**खांदेश्वर** : लाडक्या गणरायाच्या आगमनाला अवघा एक दिवस उरला असताना कोकणातील चाकरमान्यांना बाप्पाच्या भेटीची ओढ लागली आहे. गावी जाण्यासाठी पनवेल रेल्वे स्थानकात शनिवारी (दि.१२) सकाळपासूनच प्रवाशांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. आरक्षणाच्या गाड्यांची तिकिटे फुल्ल झाली असतानाही बाप्पाच्या भेटीची आस लागलेल्या चाकरमान्यांचा उत्साह मात्र कमी झालेला नाही. 'मिळेल ती रेल्वे पकडायची आणि गावी पोहोचायचे', असा निर्धार अनेक प्रवाशांनी केला आहे. यंदा कोकणाकडे जाणाऱ्या अनेक रेल्वेगाड्या सोडण्यात आल्या असल्या तरी स्थानकावरील गर्दी कमी होताना दिसत नाही. गेल्या काही दिवसांपासून चाकरमानी हातात बॅगा, सोबत लहान मुले आणि कुटुंबीयांना घेऊन रेल्वेची प्रतीक्षा करताना दिसत आहेत. यादरम्यान "बाप्पा, मी येतोय... तुझ्या स्वागतासाठी!' अशी भावना प्रत्येकाच्या मनात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



## शनिवार पहाटेपासूनच कामोठ्यात गर्दी

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

अवघ्या एका दिवसावर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर लाडक्या गणरायाच्या स्वागतासाठी पनवेलकर सज्ज झाले आहेत. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत तसेच महिला वर्गातही बाप्पाच्या आगमनाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. घराघरांत सजावटीची लगबग सुरू असून, गणरायाच्या स्वागतासाठी नागरिकांकडून जय्यत तयारी करण्यात येत आहे. दरम्यान, गणेशोत्सवासाठी आपल्या मूळ गावी जाणाऱ्या चाकरमान्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. शनिवारी पहाटेपासूनच सायन-पनवेल महामार्गावरील कामोठे परिसरात गावाकडे जाणाऱ्या नागरिकांची मोठी गर्दी दिसून आली. आपल्या गावाकडे जाणारी एसटी बस अथवा खासगी बस कधी येणार, याची प्रतीक्षा करत अनेक प्रवासी रस्त्याच्या कडेला थांबले होते. हातात सामानाच्या बॅगा, डोक्यावरच्या पिशव्या आणि सोबत लहान मुलांना घेऊन अनेक कुटुंबे बसची वाट पाहताना दिसत होती. गणेशोत्सवासाठी वर्षातून एकदा गावाकडे जाण्याची संधी मिळत असल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर उत्साहाचे वातावरण होते. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात आपल्या गावच्या गणरायाच्या भेटीसाठी चाकरमानी आतुर झाले आहेत.

# गणेशभक्तांवर खड्ड्यांचे विघ्न कायम

| चणेरा | प्रतिनिधी |



गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर चाकरमान्यांची गावाकडे मोठी लगबग सुरू असतानाच रोहा-तांबडी मार्ग खड्ड्यांच्या विळख्यात सापडला आहे. रस्त्याची दयनीय अवस्था प्रशासनाने मान्य करूनही प्रत्यक्षात खड्डे बुजविण्याच्या कामाला अद्याप मुहूर्त मिळालेला नाही. त्यामुळे येथील गणेशभक्तांवर खड्ड्यांचे विघ्न कायमआहे.

गणेशोत्सव अवघ्या एका दिवसावर येऊन ठेपला आहे. मुंबईसह विविध शहरांमध्ये नोकरी-व्यवसायानिमित्त राहणारे चाकरमानी मोठ्या संख्येने गावाकडे दाखल होत आहेत. रोहा तालुक्यातील तांबडी, गौळवाडी, सवाणे, म्हसाडी, बारशेत यासह परिसरातील अनेक गावांतील नागरिकांची रोहा बाजारपेठेत रोजची वर्दळ वाढणार आहे. मात्र, ज्या रस्त्यावरून हजारो नागरिकांना प्रवास करावा लागणार आहे, तोच रस्ता सध्या जीवघेण्या खड्ड्यांनी व्यापलेला आहे. येथील रोहा-तांबडी रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून, त्यात दगड-मातीचे साम्राज्य पसरले आहे. वाहनचालकांना खड्डे चुकवत वाहने चालवावी लागत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. विशेष म्हणजे, रस्त्याची दुरवस्था प्रशासनाने मान्य केली आहे. खड्डे बुजविण्याचे आश्वासनही देण्यात आले. राजकीय नेत्यांकडूनही नागरिकांना आश्वासनांची मलमपट्टी करण्यात आली. मात्र, आश्वासनांचे दिवस संपले, तरी रस्त्यावरील खड्डे मात्र जैसे थे! यामुळे नागरिकांचा संताप आता उफाळून येत आहे.

## तिकिटासाठी लांबच लांब रांगा

**खांदेश्वर** : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आपल्या लाडक्या गणरायाच्या स्वागतासाठी गावी जाणाऱ्या चाकरमान्यांची लगबग वाढली आहे. त्यामुळे शनिवारी पहाटेपासून पनवेल एसटी आगारात प्रवासी वर्गाची मोठी गर्दी पाहायला मिळाली. मुंबई, नवी मुंबई आणि पनवेल परिसरातील नागरिक कुटुंबीयांसह आपल्या मूळ गावी गणेशोत्सव साजरा करण्यासाठी रवाना होत आहेत. गावाकडे जाणाऱ्या एसटी बस पकडण्यासाठी आगारात नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. विशेषतः विनावाहक बसचे तिकीट घेण्यासाठी प्रवाशांची मोठी रांग लागल्याचे चित्र दिसून आले. हातात सामानाच्या बॅगा, सोबत लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक अशा अवस्थेत अनेक कुटुंबे बसची प्रतीक्षा करताना दिसत होती. एसटी प्रशासनाकडून गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त बससेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र, प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने आगार परिसरात गर्दीचे चित्र कायम आहे.

# सायन-पनवेल महामार्गावर वाहतूक कोंडी

| खांदेश्वर | प्रतिनिधी |



बाप्पाच्या आगमनाला अवघा एक दिवस उरला असताना गणेशोत्सवासाठी आपल्या गावी जाणाऱ्या चाकरमान्यांची लगबग वाढली आहे. शनिवारी पहाटेपासूनच सायन-पनवेल महामार्गावर वाहनांची संख्या अचानक वाढल्याने अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण झाली.

मुंबई, नवी मुंबई आणि पनवेल परिसरातील नागरिकांनी गणेशोत्सवासाठी आपल्या खासगी वाहनांनी गावाकडे जाण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे महामार्गावर वाहनांची मोठी गर्दी झाली. विशेषतः कळंबोली सर्कल परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र शनिवारी सकाळच्या सुमारास पाहायला मिळाले. या वाहतूक कोंडीमुळे वाहनचालकांना काही काळ संथ गतीने प्रवास करावा लागला. गाड्यांच्या वाढत्या संख्येमुळे महामार्गावरील वाहतुकीवर मोठा ताण आला असून, वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत. तसेच, सायन-पनवेल महामार्गावर वाढलेली वाहनांची वर्दळ पाहता गणेशोत्सवाच्या काळात वाहतूक व्यवस्थेसमोर मोठे आव्हान निर्माण होण्याची शक्यता आहे.

# कर्जतमध्ये खड्डे भरण्याची कामांना वेग

| नेरळ | प्रतिनिधी |



कर्जत तालुक्यातील सर्व बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे पोलीस मित्र संघटना नवी दिल्ली भारत संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष रमेश कदम यांच्या उपोषणाला यश मिळाले असून, त्यांचे जलसमाधी आंदोलन तात्पुरते स्थगित झाले आहे.

कर्जत तालुक्यातील अनेक रस्ते खड्डेमय झाल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. या खड्ड्यांमुळे आतापर्यंत चार वाहनचालक आणि वाटसरू यांना आपला जीव गमवावा लागला आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी रमेश कदम यांनी दि.७ सप्टेंबर पासून गणपती बाप्पाला मांडीवर घेऊन रस्त्यावर बसून उपोषणाचा मार्ग अवलंबला होता. त्यांच्या या आंदोलनाची दखल घेत अखेर प्रशासनाला जाग आली आहे. दि.८ सप्टेंबर पासून तालुक्यातील सर्व बांधकाम विभागाने अनेक रस्त्यांचे खड्डे बुजवण्याच्या कामाला सुरुवात केली आहे. दरम्यान, दि.१० सप्टेंबर रोजी रमेश कदम यांनी उल्हास नदी पात्रात बाप्पाला घेऊन जलसमाधी घेण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर कर्जतचे तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांनी तातडीने मध्यस्थी करीत शासकीय यंत्रणा यांना खड्डे भरण्यासाठी प्रोत्साहन दिले.






शनिवारपासूनच गणेशोत्सवाची चाहूल | लाखो मूर्ती राज्यासह परराज्यात रवाना

# कारखान्यांमध्ये गणेशमूर्तींवर अखेरचा हात

| हमरापूर | संतोष पाटील |



पेण तालुक्यातील मूर्ती कला केंद्रांमध्ये सध्या गणेशमूर्तींवर शेवटचा हात फिरण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. दरम्यान, आतापर्यंत लाखो गणेशमूर्ती महाराष्ट्र राज्यसह परराज्यात रवाना झाल्या आहेत.

पेण शहर हे पूर्वीपासून गणेशमूर्तींचे माहेरघर म्हणून प्रसिद्ध आहे. या कलेला शंभर वर्षांचा इतिहास आहे. शाडूची मूर्ती म्हटली तर प्रत्येक जण पेणला येऊन ती मूर्ती घेऊन जातो. पूर्वी फक्त शाडू मातीची मूर्ती प्रत्येक घरात मांडली जात असत. मात्र, गेल्या दहा-पंधरा वर्षांत प्लास्टर पॅरिसच्या गणेशमूर्तींचा जमाना आला आहे. त्यामुळे प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती देखील मोठ्या प्रमाणात कारागीर बनवू लागले आहेत. हमरापुर, तांबडशेत, जोहे, कळवे, दादर ही गावे प्लास्टर ऑफ पॅरिसचे हब म्हणून ओळखली जाऊ लागली आहेत. येथील मूर्ती राज्यासह परराज्यात जात आहेत. अवघ्या एका दिवसावर गणेशोत्सव आल्याने शनिवारपासूनच गणेशोत्सवाची चाहूल लागली असून, तालुक्यातील गणेशमुर्ती कारखान्यांमध्ये सध्या प्रचंड लगबग सुरू आहे.

## पेणची गणेशमूर्ती अर्थव्यवस्थेचा कणा

पेणचा गणेशमूर्ती उद्योग हा येथील अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा कणा मानली जातो. वर्षभर हजारो कारागीर आणि कामगार या उद्योगाशी जोडलेले असतात. या व्यवसायाच्या निमित्ताने पेण शहरासह तालुक्यात करोडो रुपयांची उलाढाल होते. यावर्षी जवळपास १०० कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचा अंदाज वर्तविला जात आहे. या उद्योगाला गणेशोत्सव जवळ येताच अक्षरशः सुगीचे दिवस येतात.

# कॉंक्रिट रस्त्यावरील खड्डे पेव्हर ब्लॉकने भरले

## • नेरळ ग्रामपंचायतीची तत्पर कार्यवाही • स्थानिकांमध्ये समाधान

। नेरळ । प्रतिनिधी ।

**नेरळ ग्रामपंचायत हद्दीमधील कॉंक्रिट रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे आश्वासन शांतता कमिटीच्या बैठकीत देण्यात आले होते. त्यानुसार नेरळ ग्रामपंचायतीकडून गणेशोत्सव पूर्वतयारीच्या कामांना वेग आला असून, कॉंक्रिट रस्त्याच्या मधोमध असलेले खड्डे बुजविण्यासाठी पेव्हर ब्लॉक लावण्यात आले आहेत. त्यामुळे स्थानिकांनी समाधान व्यक्त केले आहे.**

नेरळ गावात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणकडून रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करण्यात आले होते. त्यानंतर गेल्या आठ वर्षांत या रस्त्यांमधील दुभाजक असलेल्या ठिकाणी खड्डे पडले आहेत. हे खड्डे एका सरळ लाइनमध्ये पूर्ण रस्त्यात पडले होते. त्यामुळे कोणतेही वाहन त्या खड्ड्यात आदळत होते. ही बाब लक्षात घेऊन ऑगस्ट महिन्यात नेरळ ग्रामपंचायतीकडून गावातील बहुसंख्य रस्त्यांवरील खड्डे सिमेंट खडी टाकून भरण्यात आले होते. मात्र, सततच्या पावसामुळे माथेरान-नेरळ रस्ता, लोकमान्य टिळक चौक ते टॅक्सी स्टँड, रेल्वे पूल ते खांडा तसेच जुनी बाजारपेठ आणि वाचनालय ते ग्रामपंचायत कार्यालय इत्यादी सर्व भागातील रस्त्यावर दोन रस्त्यांमधील गॅप सिमेंट खडीने भरली होती. परंतु, रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये टाकलेले सिमेंट आणि खडी लगेच निघाली असून, पुन्हा पूर्वीसारखे खड्डे निर्माण झाले.



दरम्यान, गावातील या रस्त्याबाबत नेरळ पोलीस ठाणे शांतता कमिटीच्या बैठकीत चर्चा झाली. त्यावेळी ग्रामपंचायतीकडून ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले यांनी कॉंक्रिट रस्त्यांवरील खड्डे पुन्हा भरले जातील, अशी माहिती दिली होती. त्यामुळे गणेशोत्सव काही दिवसांवर आलेला असताना नेरळ ग्रामपंचायतीकडून कॉंक्रिट रस्त्यावरील बहुसंख्य ठिकाणी दोन रस्त्यांच्या मधोमध असलेली ही गॅप खोदून काढली आणि तेथे पेव्हर ब्लॉक लावले. ही कार्यवाही नेरळ ग्रामपंचायतीने रात्रीच्या वेळी बांधकाम कर्मचारी यांच्याकडून काम करून घेण्यात आले. त्याचा चांगला फायदा नेरळ गावातून वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांना होऊ लागला आहे. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाने तत्परता दाखवल्याबद्दल नेरळ गावातील जागरूक नागरिक यांनी समाधान व्यक्त केले आहे.

### गणेश घाटातील खड्डे तसेच..

नेरळ ग्रामपंचायतकडून गावातील कल्याण-कर्जत राज्यमार्ग रस्त्यावरील गणेश घाट समोरील खड्डे अद्याप भरण्यात आलेले नाहीत. गणेश घाट येथे नेरळ गावातील गणपती विसर्जनासाठी येत असतात आणि अशावेळी तेथील खड्डे भरण्यात आले नसल्याने नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

## जमिनीच्या फेरफार नोंदणीला आक्षेप

**नेरळ :** कर्जत तालुक्यात होऊ घातलेल्या टोरंट वीज प्रकल्पाच्या कॉलनीसाठी शासनाने आपल्या महसूली विभागाची ९६ एकर जमीन दिली आहे. या जमिनीच्या फेरफार दाखल्याला भालिवडी येथील ग्रामस्थांकडून आक्षेप घेण्यात आला असून, तसा लेखी आक्षेप दाखल झाला आहे. दरम्यान, पुलाची वाडी आणि लाखाची वाडी येथील ३९.१७ हेक्टर जमीन देण्यास आक्षेप घेण्यात आल्याने टोरंट कंपनीला दिलेल्या जमिनीचे काय होणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे. तालुक्यातील भालीवाडी ग्रामपंचायत मधील पुलाची वाडी येथील सर्वे क्रमांक १४ गट नंबर ९८/१ मधील ३९.१७ हेक्टर जमीन टोरंट कंपनीला दिल्याच्या नोंदीसंदर्भात करण्यात आलेल्या फेरफार क्र. ९५२ विरोधात हरकत अर्ज दाखल करण्यात आला आहे. गावातील रहिवासी मंगेश सोमा म्हसे यांनी कर्जत तहसीलदारांकडे हा अर्ज सादर करून हा फेरफार तात्काळ रद्द अथवा स्थगित करण्याची मागणी केली आहे. म्हसे यांनी, या जमिनीबाबतचा फेरफार दि.६ ऑगस्ट रोजी नोंदणीकृत झाला असून, दि.२२ ऑगस्ट रोजी समजल्याचे नमूद केले आहे. मात्र, या फेरफाराची कोणतीही नोटीस आपल्याला अथवा गावातील ग्रामस्थांना देण्यात आलेली नसल्याचा दावा त्यांनी केला आहे.

## माता पालक मेळावा उत्साहात

**पाली/बेणसे :** श्री सोमजाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमिक विद्यालय पाच्छापूर येथे माता पालक मेळावा उत्साहात पार पडला. शाळा आणि पालक यांच्यातील परस्पर सुसंवाद अधिक दृढ करणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या आरोग्याची, वैयक्तिक स्वच्छतेची आणि चांगल्या सवयींची काळजी घेण्यासाठी पालकांमध्ये जनजागृती निर्माण करणे, हा या मेळाव्याचा प्रमुख उद्देश होता. याप्रसंगी पालकांना विद्यार्थ्यांचे उत्तम आरोग्य, पौष्टिक आहाराचे महत्त्व, दैनंदिन वैयक्तिक स्वच्छता, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, शिस्त आणि संस्कारक्षम सवयी या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या मेळाव्याचे मुख्य आकर्षण म्हणजे उपस्थित महिला वर्गासाठी आयोजित करण्यात आलेले विशेष मनोरंजक खेळ. महिलांनी या स्पर्धांमध्ये अतिशय उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. विविध खेळांमध्ये प्रथम तीन क्रमांक पटकवणाऱ्या विजेत्या महिलांचा विशेष पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

## उल्हास नदी पुलावर सुरक्षा कठडे बसवले



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील मालेगाव दहिवली येथे उल्हास नदीवर असलेल्या पुलाचे कठडे उल्हासनदीला आलेल्या महापूरमध्ये वाहून गेले होते. त्याबाबत दोन महिने सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येत नव्हती. त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि स्थानिक वाहनचालकांनी आक्रमक भूमिका घेतली होती. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने त्या पुलावरील सर्व संरक्षक कठडे नव्याने बसवून त्यांना रंगरंगोटी करण्याचे काम पूर्ण केले आहे.

मालेगाव दहिवली येथील उल्हासनदी पुलावरून पावसाळ्यात किमान चारवेळा महापुराची पाणी वाहून गेले आहे. या महापुरात पुलाचे संरक्षक कठडे वाहून गेले होते. त्यामुळे बांधकाम खात्याने तेथे बांबूच्या काठ्या बांधून वाहनचालकांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, समाज माध्यम आणि स्थानिक वाहनचालक यांच्याकडून नाराजी व्यक्त होत होती. शेवटी महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्याकडून सार्वजनिक बांधकाम विभागाला कडक इशारा देण्यात आला होता. वाहनचालकांच्या आक्रमक भूमिकेमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने गणेशउत्सव सुरु होण्याआधी पुलाचे संरक्षक कठडे नव्याने बसवले. संपूर्ण पुलाला नवीन लोखंडी पाईप बसवण्यात आले असून कठड्यांना रंगरंगोटीदेखील केली आहे.



## हेमराज म्हात्रेंची चेअरमनपदी निवड

**अलिबाग :** पडघे विभागीय शिक्षण संस्थेच्या मंजुळा त्रिंबक ठाकूर इंग्रजी माध्यमिक विद्यालयाच्या प्रथम चेअरमनपदी हेमराज म्हात्रे यांची निवड करण्यात आली आहे.

पडघे विभागीय शिक्षण संस्थेची स्थापना सन १९८९ मध्ये हेमराज म्हात्रे यांचे वडील तथा माजी पंचायत समिती गटनेते नाथा गोपाल म्हात्रे यांनी केली होती. हेमराज म्हात्रे यांची चेअरमनपदी निवड झाल्याने पंचक्रोशीसह तालुक्यातील नागरिकांमध्ये नवचैतन्य व समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या निवडीप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष काशिनाथ पाटील, कार्याध्यक्ष पांडूशेठ भोईर, खजिनदार विष्णू जोशी, सचिव प्रकाश म्हात्रे, सहसचिव गणपत तांडेल तसेच संस्थेचे संचालक व सदस्य उपस्थित होते.

## तरुणाची आत्महत्या

**रत्नागिरी :** शहरानजीकच्या कुवारबाव येथील सोसायटीच्या टेरेसवर तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. शन्मुख अप्पासाहेब निंबाळ (३१) असे मृत तरुणाचे नाव आहे. शन्मुख याची पत्नी त्याला पाहण्यासाठी सोसायटीच्या टेरेसवर गेली असता तिला शन्मुख याने तेथील लोखंडी अँगलला कपडे वाळत घालण्यासाठी बांधलेल्या केबलने गळफास घेतल्याचे दिसून आले. तिने आरडा ओरडा करताच रहिवाशांनी धाव घेत शन्मूखला जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, तेथील डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले.

## गणेशोत्सवाच्या साहित्य खरेदीसाठी बाजारात गर्दी



। खांब । प्रतिनिधी ।

पावसाने विश्रांती घेताच चार दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सव सोहळ्यासाठी लागणारे साहित्य खरेदीसाठी हळूहळू बाजारात गर्दी वाढू लागली आहे. तर या गर्दीत महिला वर्गाचा मोठा समावेश आहे.

आपल्या देशासह संपुर्ण जगभरात गणेशोत्सव हा धार्मिक सोहळा मोठ्या उत्साहात व धुमधडाक्यात साजरा करण्याची आपली परंपरा आहे. या उत्सव काळात गणरायाची पूजाविधी तसेच गणरायाची सजावट करणे, प्रसादासाठी लागणारे साहित्य या वस्तूंना विशेष प्राधान्य दिले जाते. त्यामुळे विविध प्रकारचे साहित्य खरेदी करण्यासाठी गणेश भक्तांनी बाजारात मोठी गर्दी केली असल्याचे दिसून येत आहे. गणेशोत्सवासाठी लागणारे साहित्यांनी बाजारपेठाही फुलून गेल्या असून दुकानदारांनी देखील उत्सव काळात लागणारे साहित्य आपापल्या दुकानात आकर्षक पद्धतीने सजावट करून ठेवले आहेत.

> **गणेशोत्सवासाठी लागणारे सजावटीचे साहित्य थोडेफार जरी महाग झाले असले तरी ग्राहकांचा उत्साह मात्र कायम आहे.**
> **– नारायण कान्हेकर, व्यापारी**

गणरायाची सजावट करण्यासाठी लागणारे साहित्य यासह स्वीटवाले, अगरबत्तीची दुकाने, कपडे, किराणा सामान, फळवाले, नॉव्हेल्टी दुकाने, इलेक्ट्रिक साहित्याची दुकाने आदी दुकानात ग्राहकवर्ग आपल्याला लागणारे साहित्य खरेदीसाठी गर्दी करू लागले आहेत. सध्या पावसाने बऱ्यापैकी उघडीप दिली असल्याने गणेशोत्सवाचे साहित्य खरेदी करताना ग्राहकांच्या चेहऱ्यावर देखील वेगळाच उत्साह दिसून येत आहे.

## 'सुखी जीवनासाठी तडजोड महत्त्वाची'

। कर्जत । प्रतिनिधी ।

प्रत्येकाला आपले जीवन सुखी असावे म्हणजे नेमके काय करायला पाहिजे? हेच माहीत नसते. सुखी जीवन होण्यासाठी योग्य मार्गदर्शन, संगत आणि तडजोड हे तीनही स्थर अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यातील एक तरी जुळला नाही, तरी सुखी जीवनाचे कुलूप उघडणार नाही. आज योग्य मार्गदर्शनाची किंमत लोकांना नाही. संगत म्हणजे साथ नव्हे तर सहवासाला महत्त्व आहे. त्यानंतर उगाचच अहंकार दुखावतो म्हणून तडजोड करायला कुणी तयार नसतो; परंतु, ते ज्याला जमले तो खरा सुखी माणूस होतो. असे प्रतिपादन जीवनविद्या मिशनचे प्रसारक व्याख्याते शैलेश रेगे यांनी केले. ब्राह्मण सभा आणि संस्कार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने ''सुखी जीवनाची गुरुकिल्ली' या विषयावर महिला मंडळाच्या सभागृहात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.



(छायाचित्र : संजय गायकवाड)

यावेळी संस्कार भारती कोकण प्रांत सह महामंत्री ॲड. अमित चव्हाण, जिल्हा महामंत्री ॲड. जयंत चेऊलकर, ब्राह्मण सभा अध्यक्ष महेश वैद्य, संस्कार भारती जिल्हाध्यक्ष पांडुरंग गरवारे, संतोष सावंत यांच्यासह माणिक जाधव, संजय हरपुडे, कुमार व्यास, सुरेखा शितोळे, सायली कुंभार, दिनीती सावंत, विलास चंदन, प्राजक्ता गरवारे, मुकुंद टुमणे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## अध्यक्षपदी दर्शना आठवले

। रोहा । प्रतिनिधी ।

रोहा येथील ज्ञानगंगा बहूविकलांग संस्थेची शुक्रवारी (दि.११) सर्वसाधारण सभा पार पडली. या सभेत संस्थेची नवीन कार्यकारिणी गठीत करण्यात आली असून, संस्थेच्या अध्यक्षपदी दर्शना आठवले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच, उपाध्यक्षपदी संजय आर्ते, सचिवपदी गिरीश मोरे, सहसचिवपदी श्रिया जोशी, खजिनदारपदी राजश्री आठवले, सहखजिनदार वृषाली पराडकर, तर कार्यकारणी सदस्यपदी दिधेश शहा यांची निवड करण्यात आली आहे.

## पाच जवानांचा सन्मान



। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

खारघर येथील पांडवकडा धबधब्यात बुडत असलेल्या एका तरुणाचा जीव वाचविण्यासाठी धाडसी बचावकार्य करणाऱ्या सिडको अग्निशमन दलातील पाच जवानांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. जवानांनी दाखविलेल्या तत्परता, धाडस आणि कर्तव्यनिष्ठेबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे. सिडकोचे पोलीस उपमहानिरीक्षक तथा मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या हस्ते या जवानांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सन्मानित जवानांमध्ये अग्निशमन प्रणेता प्रशांत कुंडलिक दरेकर, तसेच फायरमन कौस्तुभ रमेश वायदंडे, सूरज पाटील, प्रीतम पाटील आणि चेतन पवार यांचा समावेश आहे.

### सहा वेळा निवड होणारे एकमेव भारतीय | पेस्टल सोसायटी ऑफ अमेरिकेचे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन

# पराग बोरसे यांच्या चित्राची सहाव्यांदा निवड

। कर्जत । प्रतिनिधी ।

भारतीय वास्तववादी पेस्टल चित्रकलेला आंतरराष्ट्रीय स्तरावर लौकिक मिळवून देणारे चित्रकार पराग बोरसे यांच्या कलाप्रवासात आणखी एक महत्त्वाचा आणि मानाचा टप्पा नोंदवला गेला आहे. त्यांच्या 'विदर्ड ग्रेस' या पेस्टल माध्यमातील पोर्ट्रेटची अमेरिकेतील प्रतिष्ठित पेस्टल सासायटी ऑफ अमेरिकेच्या ५४ व्या 'अन्यूअल एक्सहिबिशन एंड्यूरिंग ब्रिलिअन्स'साठी निवड झाली आहे. विशेष म्हणजे, पीएसएच्या या प्रतिष्ठित वार्षिक प्रदर्शनासाठी पराग बोरसे यांच्या कलाकृतीची निवड होण्याची ही सहावी वेळ आहे. असे करणारे ते एकमेव भारतीय चित्रकार आहेत.



(छायाचित्र : संजय गायकवाड)

यंदाच्या प्रदर्शनासाठी निवड प्रक्रिया अत्यंत कठीण होती. पीएसएच्या सदस्यांकडून जगभरातून १,०७८ कलाकृती सादर करण्यात आल्या होत्या. त्यापैकी केवळ १२५ कलाकृतींची अंतिम प्रदर्शनासाठी निवड करण्यात आली. म्हणजेच सादर झालेल्या कलाकृतींपैकी अवघ्या सुमारे ११.६ टक्के कलाकृतींनाच प्रदर्शनात स्थान मिळाले. या १२५ निवडक कलाकृतींमध्ये पराग बोरसे यांच्या 'विदर्ड ग्रेस'चा समावेश झाला आहे. या निवड प्रक्रियेसाठी मार्ला बगेटा पीएसए (ओरेगॉन), डायन रोझेन पीएसए-एमपी (न्यूयॉर्क) आणि पीटर सेल्ट्झर पीएसए-एमपी, एचएफएच (कनेक्टिकट) या तीन प्रतिष्ठित कलाकारांचा ज्युरी म्हणून सहभाग होता.

पराग बोरसे यांच्या या यशामागे गेल्या काही वर्षांतील आंतरराष्ट्रीय पुरस्कारांचीही महत्त्वपूर्ण मालिका आहे. २०२४ मध्ये 'अ टर्बन गेझ' या चित्राला पेस्टल सोसायटी ऑफ अमेरिकेचा प्रतिष्ठित 'फ्लोरा बी. गिफुनी मेमोरियल अवॉर्ड' त्यांना प्रदान करण्यात आला. त्यानंतर २०२५ मध्ये याच संस्थेच्या वार्षिक प्रदर्शनात 'यंग फॅमिली अवॉर्ड' या महत्त्वपूर्ण पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला. अशा प्रकारे अमेरिका आणि आंतरराष्ट्रीय पेस्टल कला क्षेत्रातील विविध प्रतिष्ठित संस्थांकडून सातत्याने मिळणारे पुरस्कार आणि निवडी यामुळे पराग बोरसे यांनी भारतीय वास्तववादी पेस्टल चित्रकलेला जागतिक पातळीवर वेगळी ओळख मिळवून दिली आहे.

### कलाशैलीची वैशिष्ट्ये

'विदर्ड ग्रेस' हे पेस्टल माध्यमातील पोर्ट्रेट असून, मानवी चेहऱ्यावर उमटलेले अनुभव, वय, भावभावना आणि व्यक्तिमत्त्वातील सूक्ष्म छटा वास्तववादी शैलीत प्रभावीपणे मांडण्यात आल्या आहेत. पेस्टलच्या माध्यमातून त्वचेचे पोत, प्रकाश-छाया आणि मानवी भावविश्व यांचे सूक्ष्म चित्रण ही पराग बोरसे यांच्या कलाशैलीची वैशिष्ट्ये आहेत.

## निवडक



(छायाचित्र : संजय गायकवाड)

### 'श्रींच्या मिरवणुकीत डीजे टाळा'

**कर्जत :** आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कर्जत पोलीस ठाण्याच्या सभागृहात शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत, गणेशोत्सवात श्रींची मिरवणूक पारंपरिक वाद्यांच्या तालवर नेल्यास आपल्या संस्कृतीचे दर्शन होईल. मंडळातील काही हौशी सदस्यांसाठी डीजे लावणे टाळा. गणेशोत्सव मंडळानी नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध आहे. तसेच, विजेसाठी रीतसर अर्ज केल्यास उत्सवासाठी कमी दरात वीज उपलब्ध होईल. विसर्जन मिरवणुकी दरम्यान रस्त्यावर काही अडथळे असतील तर ते तात्पुरत्या स्वरूपात काढून टाकू. सुरळीत वाहतुकीसाठी पोलीस कर्मचारी आणि २५ होमगार्ड काम करतील, असे प्रतिपादन उप विभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांनी येथे केले. पोलीस निरीक्षक पाटील यांनी प्रस्ताविकात डीजेबद्दल वरिष्ठ पातळीवर लवकरच निर्णय होईल, असे सांगितले तसेच, सध्याच्या गणेशोत्सवांमध्ये देखावे कमी आणि दिखावा जास्त दिसू लागला आहे. डीजेमुळे आपल्या पारंपारिक वाद्य वाजवणाऱ्यांचा उदरनिर्वाह कमी झाला आहे. तसेच, उत्सवाला गालबोट लागणार नाही याची दक्षता घ्या, असे देखील सूचित केले. यावेळी उप विभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड, पोलीस निरीक्षक उमेश पाटील, पोलीस उपनिरीक्षक किरण नवले, पोलीस उपनिरीक्षक मीनल शिंदे, पोलीस उपनिरीक्षक विशाल पवार उपस्थित होते.



### 'भक्तिभावाने देवासी भजावे'

**खांब :** जीवनाचे सार्थक करायचे असेल तर संत वचनांचे पालन करून साधकाने मोठ्या भक्तिभावाने भगवंताची सेवा नित्यनेमाने करावी, असे उद्गार नंदकुमार तेलंगे यांनी काढले. रोहा शहरातील संत गोरोबा नगर दमखाडी येथील संत शिरोमणी गोरोबा काकांच्या मंदिरामध्ये चातुर्मास श्रावणी सोमवार एकादशी पर्वा निमित्ताने तेलंगे यांनी मोलाचे व मार्मिक विचार प्रगट करून आध्यात्मिक प्रबोधन केले. मंदिरामध्ये गेली अनेक वर्षे मासिक एकादशीनिमित्ताने सामुदायिक हरिपाठ आणि चातुर्मास निमित्ताने तालुक्यातील नवोदित व अभ्यासू नामांकित समाज प्रबोधकांची कीर्तन व प्रवचन सेवा उपक्रम राबविण्यात येत आहेत. या कार्यक्रमाप्रसंगी महाराष्ट्ररत्न पुरस्कार गायनाचार्य रविंद्र मरवडे, अमोल बिरवाडकर, प्रशांत धाटावकर, जालिंदर बर्गे, पांडुरंग मोटे, प्रकाश कोस्तेकर आदींसह वारकरी सांप्रदायिक भाविक महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



### रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा

**पाताळगंगा :** रिक्षामध्ये विसरलेली बॅग स्वतःकडे न ठेवता पोलिसांच्या माध्यमातून संबंधित प्रवाशाच्या स्वाधीन करणाऱ्या रिक्षाचालकाच्या प्रामाणिकपणाचे परिसरात कौतुक होत आहे. चौक-जांभिवली येथील नितीन गावडे यांनी दाखविलेल्या या प्रामाणिकपणामुळे माणुसकीचा आदर्श निर्माण झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एक प्रवासी सिद्धेश्वरी कॉर्नर ते चावणे असा रिक्षाने प्रवास करीत होता. चावणे येथे पोहोचल्यानंतर प्रवासी रिक्षातून उतरला. काही वेळानंतर आपली बॅग रिक्षामध्येच राहिल्याचे लक्षात आले. बॅग हरवल्याने तो चिंतेत पडला. दरम्यान, रिक्षाचालक नितीन गावडे हे सायंकाळी रिक्षा घेऊन घरी गेल्यानंतर वाहनामध्ये प्रवाशाची बॅग असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. बॅगमध्ये रोख रक्कम, महत्त्वाची कागदपत्रे तसेच बँकेचे धनादेश असल्याचे समजले. गावडे यांनी तातडीने लगतच्या पोलीस ठाण्यात बॅग जमा केली. पोलिसांच्या माध्यमातून संबंधित प्रवाशाला बोलावून खातरजमा केल्यानंतर बॅग त्याच्या स्वाधीन करण्यात आली. त्यामुळे रिक्षाचालक नितीन गावडे यांच्या या प्रामाणिकपणाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



### कचराकुंड्यासह स्ट्रेचरचे वाटप

**पाताळगंगा :** ग्रामपंचायत हद्दीतील गावांमध्ये स्वच्छता व आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी चौक ग्रामपंचायतीच्यावतीने कचराकुंड्या आणि स्ट्रेचर वाटपाचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. सरपंच रितु ठोंबरे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला. 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत गाव कचरामुक्त व प्रदूषणमुक्त करण्याच्या उद्देशाने ओला व सुका कचरा वेगळा करण्यासाठी शासनाच्या धोरणानुसार चार रंगांच्या कचराकुंड्या उपलब्ध करून देण्यात आल्या. चौक बाजारपेठेसाठी ६०, तर विविध सार्वजनिक ठिकाणांसाठी ८०, अशा एकूण १४० कचराकुंड्यांचे वाटप करण्यात आले. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना तातडीने रुग्णालयात हलविता यावे, यासाठी हातनोली, तारापूर, जांभिवली, चौक, मोरबे, यांसह विविध गाव व वाड्यांमध्ये एकूण १४ स्ट्रेचरचे वाटप करण्यात आले. कचराकुंड्यांचा योग्य वापर करून ग्रामपंचायतीला सहकार्य करावे, असे आवाहन गणेश मोरे यांनी केले. यावेळी उपसरपंच वृषाली आंबवणे, ग्रामपंचायत सदस्य सुभाष पवार, निखिल मालुसरे, लक्ष्मी वाघ, कल्पना सिंगवा, व्यापारी संघटना अध्यक्ष हर्षल हनुमंते, ग्रामपंचायत अधिकारी गणेश मोरे, कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थ उपस्थित होते.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१३ सप्टेंबर

१) श्री. पुरुषोत्तम गोविंद पाटील अलिबाग, १३-९-१९२९

२) श्री. कमलाकर लक्ष्मण पाटील झिराड, १३-९-१९४२

३) श्रीम. शैला सुहास सबनीस अलिबाग, १३-९-१९५१

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन

वाढदिवस साजरा करा अन्नदानाने

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# उरणमध्ये ‘बॅनरबाजां’ची स्पर्धा सुरू



**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण शहरात रस्ते कमी आणि फ्लेक्स-बॅनर जास्त, अशी संतापजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. चौक, रस्ते, सार्वजनिक जागा आणि वळणाचे मार्ग मिळेल तिथे फ्लेक्स ठोकण्याची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. राजकीय शुभेच्छा, वाढदिवस, उद्घाटने आणि व्यावसायिक जाहिरातींच्या नावाखाली शहराच्या सौंदर्याची अक्षरशः वाट लावली जात असताना नगरपालिका प्रशासन मात्र, बघ्याची भूमिका घेत असल्याचे चित्र आहे.

- **शहराच्या सौंदर्याचे विद्रुपीकरण**
- **चौकाचौकात अनधिकृत फ्लेक्स-होर्डिंग्ज**

अनधिकृत फ्लेक्स, बॅनर आणि होर्डिंग्जच्या प्रश्नावर न्यायालयाने वेळोवेळी कठोर भूमिका घेतली आहे. मुंबई उच्च न्यायालयातील जनहित याचिकांच्या संदर्भात अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाई करण्याबाबत प्रशासनाला निर्देश देण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयानेही सार्वजनिक सुरक्षिततेशी संबंधित अशा अनधिकृत फलकांच्या प्रश्नांची गंभीर दखल घेतली आहे. असे असतानाही उरण नगरपरिषद हद्दीत अनधिकृत बॅनरबाजी सुरूच असेल, तर न्यायालयीन निर्देश आणि नियमांची अंमलबजावणी नेमकी कुठे होते? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

बोरी नाका, मोरा रोड, बाजारपेठ, दांडा फाटा यांसारख्या वर्दळीच्या परिसरात तसेच रस्त्यांच्या वळणावर मोठमोठे फ्लेक्स आणि बॅनर लावले जात असल्याने वाहनचालकांच्या दृष्टीला अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे.

काही ठिकाणी फलकांची रचना आणि त्यावरील प्रकाशयोजनाही वाहनचालकांचे लक्ष विचलित करू शकते. बॅनरबाजांचा प्रचार महत्त्वाचा की वाहनचालकांचा जीव? असा संतप्त सवाल आता उरणकर विचारत आहेत. पालिकेच्या हद्दीत जाहिरात फलक लावण्यासाठी परवानगी आवश्यक असताना अनेक फलकांवर परवानगी क्रमांक, परवानगीची तारीख अथवा वैधतेची स्पष्ट माहिती दिसून येत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे अधिकृत आणि अनधिकृत बॅनर ओळखण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. नियमांचे पालन करून परवानगी घेणार्‍यांच्या तुलनेत परवानगीशिवाय फलक उभारणाऱ्याना जर मोकळे रान मिळत असेल, तर नियम पाळण्याची गरजच काय, असा सवालही उपस्थित होत आहे. उरणकरांना आता कागदी आदेश, आश्वासने आणि अधूनमधून होणाऱ्या वरवरच्या कारवाईपेक्षा प्रत्यक्ष परिणाम दिसणे अपेक्षित आहे.

### प्रशासनाची कारवाई आवश्यक

उरण शहराला फ्लेक्सच्या जंगलात रूपांतरित करण्यापूर्वी नगरपालिका प्रशासनाने जागे होणे गरजेचे आहे. अन्यथा उद्या बॅनर कुणाचा? यापेक्षा या बॅनरला परवानगी कोणी दिली? हा प्रश्न अधिक मोठा होईल. त्यामुळे न्यायालयीन निर्देश, पालिकेचे नियम आणि नागरिकांची सुरक्षितता यांचा सन्मान राखत अनधिकृत बॅनरबाजीला आळा घालण्यासाठी प्रशासन आता प्रत्यक्षात काय पाऊल उचलते, याकडे उरणकरांचे लक्ष लागले आहे.

# आरतीच्या तालावर पाढे पाठ



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील उपक्रमशील शाळा असणाऱ्या झुगरेवाडी येथील राजिपरिच्या शाळेत आगामी काळात होत असलेले गणेशोत्सवापूर्वी एका अनोख्या उपक्रमांची सुरुवात झाली आहे. गणित हा विद्यार्थ्यांना न आवडणारा विषय आहे, मात्र या गणित हा विषय टाळण्याकडे विद्यार्थ्यांचा कल दिसून येतो. परंतु हा विषय रंजक पद्धतीने शिकविला गेला तर त्याची गंमत काही औरच असते. गणितातील सगळ्यात क्लिष्ट भाग म्हणजे पाढे पाठांतर, पाढे पाठ करणे विद्यार्थ्यांना अतिशय रटाळवाणे वाटत असतात. परंतु रवी काजळे, राजश्री पाटील यांनी यावर अनोखा उपाय शोधून गणित विषय रंजक केला आहे.

सगळीकडे आता गणरायाच्या आगमनाची तयारी सुरू आहे. गणराय विराजमान झाले की सगळीकडे आरत्याची धामधूम सुरू होते. याच संधीचा फायदा घेऊन विद्यार्थ्यांनि संधीचे सोने करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. शिक्षिका पाटील यांना बाप्पाच्या आरतीच्या तालावर पाढे ही संकल्पना सुचली. त्यानुसार दररोज परिपाठच्या वेळी आणि शाळा सुटण्यापूर्वी पखवाज व टाळ यांच्या गजरात आरतीच्या तालावर पाढे म्हणून घेतले जातात. शाळेचा विद्यार्थी वेदांत म्हात्रे हा उत्कृष्ट पखवाज वादक आहे. त्याच्या कलागुणांचा वापर विद्यार्थी हितासाठी करून हा अनोखा उपक्रम सुरू आहे.

# रोहन गोसावीचा संस्थेतर्फे सत्कार

**। खांब । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील धानकान्हे गावचा पुत्र आणि नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे या विद्यालयाचा गुणवंत विद्यार्थी रोहन विनायक गोसावी याने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आपल्या जिद्द, मेहनत आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर सार्थक गोसावी याने नीट परीक्षा उत्तीर्ण होऊन शासकीय कोट्यातून पुणे येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळविला आहे. त्याच्या यशाबद्दल संस्थेतर्फे चेअरमन महेंद्र पोटफोडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# उरणमध्ये पोलीस प्रशासनाची समन्वय बैठक




**। उरण । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सव सण शांततेत आणि उत्साहात साजरा व्हावा यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, सह पोलीस आयुक्त पोर्ट विभाग यांच्यावतीने उरण येथे अधिकारी, पदाधिकारी आणि शांतता समितीची संयुक्त समन्वय बैठक गुरुवारी (दि. १०) बहुउद्देशीय सभागृह, जे.एन. पी.टी. वसाहत येथे आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत पोलिसांनी मंडळांना सूचना मंडप उभारणे, ध्वनीक्षेपकाच्या (डीजे) आवाजाची मर्यादा, प्रत्येक मंडपात सी.सी.टी. व्ही. कॅमेरे आणि अग्निशमन यंत्र बसवण्या बाबत महत्वाच्या सूचना देण्यात आल्या.

या बैठकीस सह पोलीस आयुक्त नवी मुंबई दीपक साकोरे, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२ बेलापूर अमित काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त पोर्ट विभाग विजय चौगुले, उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर, न्हावा-शेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरज पाटील, मोरा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल काटवानी, उलवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन रजाने, उरण वाहतूक प्रभारी संजय पाटील, न्हावा-शेवा वाहतूक प्रभारी अतुल दहिफळे, गटविकास अधिकारी उरण सर्जे राव पाटील, उरण नगर परिषदेचे प्रशासक राजेश घाडगे, नगराध्यक्षा भावना घाणेकर, सिडको अग्निशमन विभागाचे अमित कांबळे, नायब तहसीलदार महेश पाटील, जिल्हा परिषद सदस्य मनीष पाटील, महावितरणचे सहाय्यक अभियंता राहुल भंडारे यांच्यासह पोलीस पाटील, शांतता समितीचे सदस्य, महिला सदस्य, नगरसेवक, गणेश मंडळांचे अध्यक्ष, समाजसेवक, नागरिक आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बेकायदा जाहिरात फलकांविरोधात कारवाई

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

महापालिकेची पूर्वपरवानगी न घेता कामोठे परिसरात जाहिरातींचे व डिजिटल फलक लावणाऱ्या सात आस्थापनांविरोधात पनवेल महापालिकेने फौजदारी कारवाई केली आहे. प्रशासनाने वारंवार सूचना करूनही विनापरवानगी जाहिरात फलक लावल्याचे निदर्शनास आल्यानंतर अतिक्रमण नियंत्रण विभागाने कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. प्रभाग समिती ‘क’च्या हद्दीत कामोठे परिसराचा समावेश असून, शहरात जाहिरात किंवा डिजिटल फलक उभारण्यासाठी महापालिकेची परवानगी घेणे बंधनकारक आहे. याबाबत महापालिकेने प्रसिद्धिपत्रकाद्वारे यापूर्वीच सूचना दिल्या होत्या.

# नागोठणे पारंपरिक पिठोरी उत्सव साजरा

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

संततीचे आरोग्य, सुख-समृद्धी आणि कुटुंबाच्या मंगलमय भविष्यासाठी श्रद्धेने साजरी केली जाणारी पिठोरी आमावस्या नागोठणे शहर व विभागात भक्तीमय आणि आनंदी वातावरणात उत्साहात साजरी करण्यात आली. ठिकठिकाणी पिठोरी मातेची विधिवत पूजा-अर्चा करण्यात आली. महिलांसह ग्रामस्थांनी भक्तीभावाने पिठोरी मातेचे दर्शन घेतले.

पिठोरी आमावस्येला हिंदू धर्मपरंपरेत विशेष महत्त्व असून, संततीच्या दीर्घायुष्यासाठी, आरोग्यासाठी तसेच कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी पिठोरी मातेची पूजा करण्याची प्रथा आहे. पारंपरिक पद्धतीने केली जाणारी ही पूजा श्रद्धा, संस्कृती आणि कौटुंबिक परंपरेचे जतन करणारी मानली जाते. याच



पारंपरिक धार्मिक भावनेतून नागोठणे शहर व ग्रामीण विभागात अनेक नागरिकांनी आपल्या निवासस्थानी दरवर्षीप्रमाणे पिठोरी आमावस्या उत्साहात साजरी केली. अनेक कुटुंबीयांनी पिठोरी अमावस्या हा सण भक्तिमय वातावरणात साजरा केला. पिठोरी असलेल्या ठिकाणी नातेवाईक मित्रपरिवारांनी भेट देऊन पिठोरी मातेचे दर्शन घेतले. यावेळी उपस्थित भाविकांनी पूजा-अर्चा करून महाप्रसादाचा लाभ घेतला.

नागोठणे शहर तसेच ग्रामीण परिसरातील अनेक मित्रपरिवार व आप्तेष्ट पिठोरी असलेल्या ठिकाणी आवर्जून भेट देत पिठोरी मातेचे दर्शन घेतात. त्यामुळे हा उत्सव धार्मिक श्रद्धेसोबतच आपुलकी, स्नेह आणि सामाजिक बांधिलकीचा उत्सव म्हणूनही अनुभवायला मिळतो.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. १३ ते १९ सप्टेंबर २०२६

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

### आर्थिक लाभ होण्याची शक्यता

**मेष :** राशीधारकांना या साप्ताहाच्या पूर्वार्धात चिंतन करून आपण आपल्या काही दोषांचे सुद्धा निराकरण करू शकाल. थोड्या प्रतिकूलतेस सामोरे गेल्या नंतर आपणास हळू-हळू दिलासा मिळू लागेल. उत्तरार्धात गृह सजावटीचे कार्य हाती घ्याल. अतिरिक्त कामामुळे शरीरास थोडा थकवा जाणवला तरी त्यामुळे आर्थिक लाभ होण्याची शक्यता असल्याने आपण काही तक्रार करणार नाही. व्यावसायिक आघाडीवर आपल्या कष्टाचे फळ मिळू लागेल. सुरुवातीस आपली कामे नियोजनानुसार पूर्णत्वास नेण्यात परिश्रम करावे लागले किंवा आपले फासे उलटे पडले तरी निराश न होता प्रयत्न चालू ठेवल्यास उत्तरार्धात यश प्राप्ती होऊन आपणास मानसिक दिलासा मिळेल. पूर्वार्धात नोकरीत वरिष्ठांशी काही कारणाने वाद होणार नाहीत याची काळजी घ्यावी. कायद्या विरुद्ध कार्ये किंवा अनैतिक कार्ये करून आर्थिक प्राप्ती करण्याचे विचार मनातून काढून टाका. **महिलांना :** आपल्या प्रियव्यक्तीसाठी एखादी सुंदर वस्तू खरेदी करण्यासाठी आपण खर्च कराल. प्रियव्यक्ती, मित्र, नातेवाईक यांच्या सहवासात बहुतांश वेळ घालवाल. **शुभ दिनांक : १४,१५.**

### वडीलधाऱ्यांकडून लाभ होण्याची शक्यता

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहात व्यावसायिक आघाडीसाठी पूर्वार्ध अधिक अनुकूल आहे. व्यावसायिक आघाडीवर प्रतिस्पर्धी व शत्रूंवर मात करू शकाल. कौशल्याच्या जोरावर आपण लोकांच्या प्रशंसेस पात्र व्हाल. नोकरी करणाऱ्यांच्या कामात व विचारात सर्जनात्मकता दिसून आल्याने पदोन्नतीची शक्यता नाकारता येत नाही. उत्तरार्धात शासकीय अडथळे येऊ शकतात. उत्तरार्धात आपली प्रतिमा मलीन होईल अशा कार्यांपासून दूर राहावे. पूर्वार्धात पिता किंवा वडिलधाऱ्या व्यक्तींकडून लाभ होईल. परंतु उत्तरार्धात पैतृक संपत्तीशी संबंधित कार्यात विघ्ने येण्याची किंवा अपेक्षेनुसार फलप्राप्ती न होण्याची शक्यता आहे. मित्र, पत्नी, संतती यांच्या कडून लाभ होईल. स्त्री मित्रांकडून लाभ होईल. विद्यार्थ्यांना अभ्यासातील समस्यांचे निराकरण झाल्याने दिलासा मिळेल. कोणत्याही विषयाचा खोलवर अभ्यास करताना आपली आकलनशक्ती कमी असल्याचे जाणवेल. **महिलांना :** दांपत्य जीवनात सुद्धा पारस्परिक विचारातील प्रगल्भतेमुळे एकमेकांच्या सहवासाचा अत्युच्च आनंद उपभोगू शकाल. आपल्या दोघात एकमेकांप्रतीचे आकर्षण टिकून राहील. **शुभ दिनांक : १६,१७.**

### भविष्यासाठी योजना तयार करा

**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान आपली सुरुवात चांगली होईल. व्यावसायिक आघाडीवर प्रगतीची अपेक्षा आपण बाळगू शकता. आपली बहुतांश कार्ये कारकिर्दीच्या प्रगतीशी संबंधितच असतील. भविष्य विषयक अनेक योजना सुद्धा तयार कराल. स्वतःच्या कार्यात स्थैर्य राखण्याचा प्रयत्न कराल. जर कोणाशी व्यावसायिक संबंधात तणाव असेल किंवा कामात काही कायदेशीर किंवा शासकीय समस्या असतील तर त्या दूर करण्यास आपण प्राधान्य द्याल. सुरुवातीस देशांतर्गत कार्ये व संपर्कात वाढ होईल. ह्या कालावधीत आपण व्यक्तीगत व व्यावसायिक आघाडीवर सामाजिक माध्यमांचा उपयोग अधिक प्रमाणात कराल. आपण आपल्या व्यक्तीगत व व्यवसाईक संबंधात उत्तम प्रगती साधू शकाल. मित्रांचा संपर्क व सहवास कमी लाभला तरी वैवाहिक जोडीदार किंवा प्रियव्यक्तीशी जवळीक राहील. या काळात दरम्यान आपल्या वाणीत कलात्मकता वाढेल. **महिलांना :** अनेकदा आपल्या वाक्चातुर्याने भिन्नलिंगी व्यक्ती आकर्षित होतील. या दरम्यान वैयक्तीक संबंधाचा उपयोग योग्य प्रकारे कसा करावा हे आपणास समजू शकेल. **शुभ दिनांक : १८,१९.**

### विचार सकारात्मक ठेवा

**कर्क :** राशीधारकास या सप्ताहाची सुरुवात सामान्यच असली तरी जस जसे दिवस पुढे सरकतील तस तसे वातावरण अनुकूल होत जाईल. सुरुवातीच्या दिवसात व्यावसायिक व व्यक्तीगत संबंधांच्या बाबतीत आपण अधिक उत्साह दाखवाल. आपल्यात कितीही उत्साह असला तरी तो इतरांसाठी त्रासदायी ठरणार नाही याची आपणास काळजी घ्यावी लागेल. आपण जर जीवनातील काही तथ्य समजून घेऊन ते अमलात आणलेत तर हे दिवस आनंदात घालवू शकाल. सुरुवातीपासूनच भागीदारीत संबंधांचे उत्तम सौख्य मिळाल्याने आपले विचार सकारात्मक होऊन त्याचा परिणाम आपल्या व्यक्तिगत व व्यावसायिक जीवनावर होत असल्याचे दिसून येईल. जीवनात चढ-उतार तर येतच राहतील परंतु त्यांना सामोरे जाऊन आनंदाचे क्षण कसे घालवावे हे जर आपण शिकून घेतलेत तर त्याहून कोणतेही यश मोठे असणार नाही. आपल्या मनात हा सिद्धांत केंद्रस्थानी असेल. **महिलांना :** महत्वाचे निर्णय घेताना सुद्धा वैवाहिक जोडीदाराचे म्हणणे शांतपणे ऐकून त्यांच्या मुद्द्यांना महत्व द्यावे. **शुभ दिनांक : १४,१८.**

### अधिक विचारात गुंतू नका

**सिंह :** राशीसाठी या सप्ताहात या कालावधीत आपण आर्थिक, कारकीर्द, संबंध बाबतीत, अनावश्यक विचारात गुंतून राहिल्याने वास्तविक स्थिती आपणास समजू शकणार नसल्याने हे दिवस विशेष आशादाई ठरू शकणार नाही. त्यामुळे शक्य तितकी जास्त पारदर्शकता व स्पष्टता असावी. काहीवेळा हाती आलेली संधी निसटून गेल्याने स्वतःला किंवा नशिबास दोष देण्या ऐवजी नव्या जोमाने, नव्या आशेने व नवीन व्यूहरचना करून मार्गक्रमण करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. आपल्या जीवनात दीर्घकाळ टिकणारे सकारात्मक परिवर्तन घडून येईल ज्यामुळे प्रतिकूल परिस्थितीचा सामना करण्याचे बळ आपल्यात येईल. हे वर्ष व्यावसायिक आघाडीवर भागीदारी कार्यासाठी आशास्पद नाही. भागीदारांशी आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक करावेत. सांघिक कार्यात व आपल्या वैयक्तिक कार्यात विलंब होईल. **महिलांना :** उत्तरार्धात आपल्या कामांना गती येईल. सारासार विचार करूनच नवीन कार्याची सुरुवात करावी. आपल्या भावनांना आवर घालून जबाबदारपणे वागण्याचा प्रयत्न कराव. **शुभ दिनांक : १३,१९**

### आप्तांपासून दूर राहण्याची शक्यता

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान हे संघर्षांसह सुखद अनुभव देणारे आहे. जीवनाप्रती सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपण मार्गक्रमण कराल. नोकरी करणाऱ्यांच्या कामात किंवा जागेत बदल होण्याची शक्यता असून त्याचा कालांतराने आपणास फायदा होईल. जर आपल्यावर कामाचे ओझे असेल किंवा प्रकल्प पूर्ण करण्यात विलंब होत असेल तर उतरार्धपासून त्यात सुधारणा होऊ लागेल. आठवड्याच्या मध्यापासून नोकरीत आपला उत्साह वाढल्याने सहकाऱ्यांशी काही कटुता निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. आजवर व्यावसायिक आघाडीवर होत असलेला विलंबानंतर ओसरताना व कामाचे ओझे सुद्धा कमी होताना दिसू लागेल. भागीदारी कार्यात किंवा नवीन करारात विलंबाची शक्यता असल्याने त्यापूर्वीच त्यांची पूर्तता करावी. **महिलांना :** मात्र, सतत आपल्या भावनात चढ-उतार होत असल्याचे दिसून आल्याने अधून-मधून आप्तांपासून दूर जाल. मात्र, अशा परिस्थितीत जर आपल्या ऐवजी त्यांच्या दृष्टिकोनातून परिस्थितीचा अभ्यास केलात तर त्याचे उत्तम परिणाम मिळवू शकाल. **शुभ दिनांक : १५,१८.**

### प्रिय व्यक्तीचा सहवास घडण्याची शक्यता

**तुळ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता शक्य तितका स्वभावातील उग्रपणा नियंत्रित ठेवलात तर संबंधात दुरावा निर्माण होणार नाही. प्रियव्यक्तीच्या सहवासाचा आनंद उपभोगू शकाल. एखाद्या रमणीय स्थळी फिरावयास किंवा छोटाश्या प्रवासास जाऊन आनंदात वेळ घालवू शकाल. पूर्वार्धात विद्यार्थ्यांना परिश्रम वाढवावे लागले तरी उत्तरार्धात त्याचे चांगले फळ मिळू शकेल. बौद्धिक प्रवृत्ती व चर्चेस आपण प्राधान्य द्याल. पूर्वार्धात आपणास आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. वाहन चालवताना काळजी घेण्याचा सल्ला देण्यात येत आहे. अनावश्यक खर्च टाळावा. आर्थिक बाबतीत तज्ज्ञांच्या सल्ल्याने व्यवहार करावेत. जेणेकरून ज्याचा योग्य परतावा आपणास मिळू शकेल. आरोग्याच्या दृष्टीने पूर्वार्ध चांगला असला तरी उत्तरार्धात विशेषतः रक्तदाब, हृदयाच्या ठोक्यांची अनियमितता किंवा डोळ्यांची जळजळ आदी समस्या होण्याची शक्यता आहे. **महिलांना :** कोणाशीही नाराजी पत्करू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवण्याचा प्रयत्न करा. **शुभ दिनांक : १६,१७.**

### बौद्धिकक्षेत्रात वाव मिळेल

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहात आपल्या प्राप्तीत थोडी अनिश्चितता निर्माण होण्याची शक्यता असल्याने उत्तरार्धात आपणास आर्थिक बाबीत काळजी घ्यावी लागेल. विशेषतः कोठून पैसे येणार असतील तर वसुलीवर आधीपासूनच लक्ष देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. गुंतवणुकीसाठी शेवटचे तीन दिवस उत्तम आहेत. पुढील कळवधीत आपल्याला शासकीय लाभ किंवा वरिष्ठांकडून लाभ किंवा पैतृक संपत्तीतून प्राप्ती संभवते. जर भावंडांशी पैतृक संपत्तीमुळे तणाव निर्माण झाला असेल तर वडिलधाऱ्यांच्या मध्यस्थीने त्याचे सुखद निराकरण होऊ शकेल. आरोग्याच्या दृष्टिकोनातून दिवस चांगले असले तरी अखेरच्या तीन दिवसात नाक-कान-घसा यांच्याशी संबंधित त्रास होण्याची शक्यता आहे. या दरम्यान विशेषतः श्वसनाचे विकार, कफ, खोकला यांचा त्रास वरचेवर होण्याची शक्यता असल्याने आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. बौद्धिकक्षेत्राला वाव मिळेल. **महिलांना :** विशेषतः महिलावर्गाला त्यांच्या अंगभूत कलागुणांना उत्तम संधी मिळेल. प्रवास योग संभवतात. प्रकृतीबाबत जागरूक राहा. **शुभ दिनांक : १३,१५.**

### अनाश्यक खर्च होण्याची शक्यता

**धनु :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या दरम्यान प्रियव्यक्ती किंवा वैवाहिक जोडीदाराशी व्यवहारातसुद्धा बदल होऊ शकतो. आपल्या भिन्नलिंगी व्यवसायीक संबंधातील जवळीक वाढेल. या दरम्यान वस्त्रालंकार, हौसमौज करण्याच्या वस्तू आदीसाठी खर्चाची किंवा खरेदीची शक्यता आहे. आपल्या जवळ आर्थिक सुबत्ता असली तरी खर्चावर नियंत्रण ठेवल्यास उर्वरित रक्कम गुंतवणूक करून किंवा अन्य मार्गाने खर्च करून आपल्या फायद्यात वाढ करू शकाल. आपल्या प्राप्तीच्या साधनात बदल होण्याची शक्यता आहे. सुरुवातीच्या दिवसांत विद्यार्थ्यांना गंभीरतापुर्वक अभ्यास करावा लागेल. शिक्षणासाठी किंवा व्यवसायासाठी परदेशात जाण्याच्या प्रयत्नात तसेच देशांतर्गत कार्यात अखेरच्या तीन दिवसांत विलंब होण्याची शक्यता आहे. संपत्तीसह आरोग्य सुद्धा महत्वाचे आहे. हे ध्यानात ठेवून पूर्वार्धात आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. **महिलांना :** प्रकृतीबाबत, विशेषतः उष्णतेच्या विकारांबाबत सावध राहा. आरोग्याचा त्रास होऊ शकतो. वेळेवर जेवण घ्या, नातलगांन कडून चांगली बातमी मिळेल. **शुभ दिनांक : १४,१६.**

### कुटुंबियांशी जवळीक साधाल

**मकर :** राशीसाठी या आठवड्याचे ग्रहमान शक्य असल्यास कर्ज किंवा उधारी करणे टाळावे. काही अनपेक्षित खर्च उद्भवल्याने आपणास कर्ज किंवा उधारी करावी लागण्याची शक्यता आहे. कामाच्या ठिकाणी किंवा सरकारी विभागात शक्यतो अधिकारी वर्गाशी व प्रतिष्ठित व्यक्तींशी वाद टाळावेत. कायद्या विरुद्ध असलेली कामे टाळावीत. भागीदारी संबंधात काळजी करण्या सारखे काही नाही. कुटुंबियांशी जवळीक साधू शकाल. शक्यतो कोणत्याही व्यक्तीशी वाद टाळण्याचा सल्ला देण्यात येत आहे. संपर्क साधताना सुद्धा पारदर्शकपणा व विनम्रपणा असण्याची गरज आहे. विशेषतः नंतर याची आपणास काळजी घ्यावी लागेल. विद्यार्थ्यांना अभ्यासात परिश्रम वाढवावे लागतील. आपण एखाद्या विषयाचा खोलवर अभ्यास करण्याचा विचार केलात तरी त्याची अंमलबजावणी करण्याची योग्य संधी न मिळाल्याने आपणास नैराश्य येण्याची शक्यता आहे. **महिलांना :** आपल्या चेहेऱ्यावरील तेज काही अंशी कमी होण्याची शक्यता आहे. विशेषतः कोणते ना कोणते आजारपण आपणास त्रास देत राहील, त्यामुळे आरोग्याची काळजी घेणे गरजेचे ठरेल. **शुभ दिनांक : १७,१८.**

### गैरसमज होण्याचे प्रसंग टाळा

**कुंभ :** राशी या सप्ताहातील ग्रहमान पाहता बेजबाबदारपणे कोणतेही कृत्य करू नका. इतरांमधील दोष काढण्याचे कटाक्षाने टाळावे. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास आपल्याबद्दल गैरसमज होण्याचे प्रसंग टाळू शकाल.. घरघूती संबंधात सानिध्य टिकून राहील. आपण प्रणयी जीवनात अधिक मग्न राहिलात तरी नंतर संबंधात वैविध्य राखण्यात व जोडीदारास खुश ठेवण्यात आपणास कष्ट करावे लागतील. अशा परिस्थितीत प्रसंगानुसार भेटवस्तू देऊन आपल्या जोडीदाराशी जवळीक साधू शकाल. धार्मिक कारणांसाठी खर्च होण्याची शक्यता आहे. शक्यतो कोणाशीही उधार उसनवारी करणे टाळावे. ह्या दरम्यान काही ना काही कारणांनी अनेकदा प्रवास करावे लागतील. एखाद्या अनोळखी व्यक्तीकडून किंवा स्रोता कडून आर्थिक किंवा अन्य लाभ मिळवू शकाल. मात्र, शेअर्स किंवा तत्सम काम करणाऱ्यानी नंतर खूपच सावध राहावे लागेल, अन्यथा मोठ्या नुकसानास सामोरे जावे लागेल. **महिलांना :** प्रकृतीच्याबाबत चालढकलपणा करू नका माणूस पारखण्याचे सूत्र पाळल्यास पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाही. **शुभ दिनांक : १४,१७.**

### धार्मिक कार्यात रस घ्या

**मीन :** हा साप्ताहात मीनराशीसाठी एकूण ग्रहमान पाहता शेवटच्या दिवसांत व्यावसायिक व व्यक्तीगत संबंधात पारदर्शकता वाढवावी लागेल. प्रत्यक्ष शत्रूंचा जोर वाढेल तेव्हा काळजी घ्यावी. व्यावसायिक भागीदारांशी संवाद साधताना थोडे सावध राहावे. विशेषतः शेवटच्या तीन दिवसांत नवीन करार टाळावेत. ज्यांना नाक-कान-घसा यांच्याशी संबंधित त्रास आहे त्यांनी या कालावधीत उपचारात हेळसांड करू नये. सामाजिक क्षेत्रात आपली वाहवा मिळवाल. आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा, त्यामुळे गैरसमज वाढणार नाही. शेतीविषयक व स्थावरजंगमबाबतची कामेमार्गी लागतील. आपण वैभवी जीवनशैलीप्रती अधिक आकर्षित व्हाल ज्यात खूप खर्च होण्याची शक्यता असल्याने खर्च नियंत्रणात ठेवावेत. अनैतिक संबंधांपासून दूर राहण्याचा सल्ला देण्यात येत आहे. मेदवृद्धी, मधुमेह इत्यादींशी संबंधित विविध समस्या होण्याची जास्त शक्यता आहे. **महिलांना :** घरगुती वातावरण चांगले ठेवता येईल. आपल्या विकासाची एखादी योजना आखणे आवश्यक आहे. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. **शुभ दिनांक : १५,१७.**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे बेलकडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| बेलकडे | ९१ | ०-५७-००<br>पो.ख.०-२१-००<br>०-७८-०० | ०.६९ | विलास कृष्णा पाटील.<br>कैलास कृष्णा पाटील. |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेच्या त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे, असे गृहित धरून आमचे अशिल सदरची मिळकत खरेदी करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. १३/०९/२०२५

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा.वत्सला, टिळक रोड, स्टेट बँके समोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक श्री. सतिश सखाराम पिंपरकर कडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे - कामतपाडा, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ५३ | ६ | ०.७३.०० | ०.४७ |

सदरची जमिन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याने ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्जलिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि.१३/०९/२०२६

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. ५०४, गजवक्र रेसिडेन्सी,
पाचवा मजला, कचेरी रोड, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.८१४९२११३६६/७७०९१६०५६७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पुनाडे, ता. उरण, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १२९/१४ | एकूण क्षेत्र ०-२०-०० हे.आर | ०.६२ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :-१३/०९/२०२६
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## रायगड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यासेवक सहकारी पतसंस्था मर्या. पेण-रायगड.
**रजि.नं.: आर.जी.डी./अे.बी.जी./बी.एन.के./(ओ)/१०३**
**दिनांक १/८/१९९१**
**३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
**(फक्त सभासदांसाठी)**

रायगड जिल्हा माध्य. व उच्च माध्य. विद्यासेवक सहकारी पतसंस्था मर्या. पेण-रायगड या संस्थेची सन २०२५-२६ सालची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ठिक ११:३० वाजता श्री.अशोकदादा साबळे विद्यालय माणगांव, जि. रायगड या ठिकाणी मा. अध्यक्ष श्री. राजेश जयसिंग गोळे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. तरी सर्व सभासदांनी या सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१. संस्थेच्या दि. १७/०८/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२.संचालक मंडळाने संस्थेचा तयार केलेला दि.०१/०४/२०२५ ते ३१/३/२०२६ या मुदतीचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्विकारणे.
३.संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे व लाभांश जाहिर करणे.
४. सन २०२५-२६ या मुदतीच्या लेखापरिक्षण अहवालाचे वाचन करुन स्विकारणे.
५. सन २०२६-२७ या मुदतीच्या वैधानिक लेखापरिक्षणासाठी म.स.सं. अधिनियम १९६० मधील कलम १(१) ब अन्वये लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.
६.सन २०२६-२७ या मुदतीच्या अंतर्गत लेखापरिक्षणासाठी लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.
७. सन २०२६-२७ या कालावधीच्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.
८. वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर राहू न शकलेल्या अनुपस्थित सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत करणे बाबत.
९. सुधारीत आदर्श उपविधी दुरुस्तीसह स्विकारणे. (पगारादार नोकरांची आदर्श उपविधीचा मसुदा संस्थेच्या कार्यालयात पहावयास मिळेल.)
१०. नफ्यातून राखीव निधीची तरतूद १०% करण्यास मंजुरी देणे बाबत.
११. मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळच्या विषयांवर चर्चा करणे.

स्थळ : पेण
दिनांक : १३ सप्टेंबर २०२६

**आपला विश्वासू**
**श्री. शहाजी अरुण बेरे**
**सचिव**
रायगड जिल्हा माध्य. व उच्च माध्य. विद्यासेवक सहकारी पतसंस्था मर्या. पेण- रायगड.

१. गणसंख्ये अभावी सदरची सभा तहकुब करावी लागल्यास सदर सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. अशा सभेस गणसंख्यापुर्ततेची आवश्यकता नाही.
२. सोबतच्या अहवाला संबंधीचे प्रश्न अगर सूचना असल्यास सभासदांनी त्या दि.१९ सप्टेंबर २०२६ पर्यंत पतसंस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत द्याव्यात.
३. सभेपुढील विषयासंबंधीचे कागदपत्र पतसंस्थेच्या कार्यालयात कामकाजाच्या वेळेत पहावयास मिळतील.
४. ज्या सभासदांनी अद्याप आपले वारस नेमले नसतील त्यांनी कार्यालयात येवून वारसांच्या नावाची नोंद करावी.
५. सभेस येताना अहवालाची प्रत सोबत आणावी.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस सदर जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे कि, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत ही खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे. गिरवले, ता.पनवेल, जिल्हा रायगड**

| सर्व्हे नं./हिस्सा नं | खाता नं | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| २६/३/अ | ३१९ | ०-१२-१०<br>पो.ख ०-०२-३०<br>खरेदी क्षेत्र ०-१४-४० | २.५९ |
| | एकुण क्षेत्र | ०-१४-४० | |

वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या मालकी हक्कात श्री. सुनिलकुमार रामस्वरूप सोनी यांच्या नावाची नोंद आहे,त्यांनी सदर मिळकत ही आमचे अशिलाना खरेदी देण्याची ठरली असुन सदर व्यवहाराबाबत वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणत्याही प्रकारचे गहाणखत, दानपत्र, बक्षीसपत्र, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगीहक्क, विकसनकरार, समजोताकरार, अल्प किंवा दिर्घमुदतीचा भाडेपट्टा करार अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने तिच्या असलेल्या हक्कांबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसांपर्यत खालील पत्त्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नाही आली तर वर नमुद केलेली शेतजमिन मिळकतीचे खरेदी करण्याकरीता आमचे अशिल यांना कोणतीही बाधा नसेल याची सर्वानी नोंद घ्यावी.

दिनांक :११.०९.२०२६
ठिकाण : पनवेल

**ॲड. प्रविणकुमार पांडुरंग मोरे**
पत्ता : ऑफीस नं.०३, आशा हॉमोनी को ऑप हौ. सो प्लॉट नं.१४, सेक्टर १७, खांदा कॉलनी, पनवेल ४१०२०६ मो नं. ९०२९५८९९९०

## जाहीर नोटीस

माझे आशिल यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे :-

मौजे मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्र. व उपविभाग क्र.२६४, एकुण क्षेत्र ०.४१.१० (हे.आर.), आकार १०.२६ (रु.पैसे) या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक विजया नित्यानंद पाटील, माधुरी अमोल कांबळे, उत्तम मनोहर राऊत, मधुगंधा चंद्रकांत राऊत, सिध्देश चंद्रकांत राऊत, सीमा श्रीकांत राऊत, सुधीर मनोहर राऊत, स्मिता चंद्रकांत राऊत व राजश्री दिपक सुर्वे यांच्याशी जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह माझे आशीलांनी विकत घेण्याबाबत बोलणी केलेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विदयमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहीवाटीचे हक्क, कुळ हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशील विद्यमान मालकांबरोबर पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक :- १३/०९/२०२६.

**(ॲड. परेश एम. घरत)**
तळमजला, अशोका शॉपींग सेंटर,
एस.टी.स्टड जवळ, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड
९८५०४८१२३४

दिनांक : १३ सप्टेंबर २०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - अंत्राट तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.-आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) नंदु काशिनाथ डायरे<br>२) नरेश काशिनाथ डायरे<br>३) शेवंतीबाई काशिनाथ डायरे<br>४) यशोदा नंदकुमार तरे<br>५) वनिता विठ्ठल पेमारे | ७५ | ८ | ०-४३-०० | ० | ४७ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक :-१३/०९/२०२६

## - जाहीर नोटिस-

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे आशिलांनी मौजे बामणगाव, ता.अलिबाग, येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत, मिळकतीचे विद्यमान शर्मिला सदानंद कवठेकर यांचेकडून विकत घेण्याचे ठरवून तसा साठेकरार आमचे अशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बामणगाव, ता.अलिबाग, गट नं. २५२, जिरायत ०-७९-७०, वरकस ०-४२-२०, पो.ख.०-०३-८०, एकूण १-२५-७० आकार रु.१२.१२/- या मिळकतीपैकी शर्मिला सदानंद कवठेकर यांच्या मालकीची ०-१६-७० गुंठे क्षेत्र, आकार १.२८ ही मिळकत हा या नोटिसचा विषय आहे.**

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत विद्यमान मालकांच्या ताबे कब्जाची, वहिवाटीची, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीं संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्नवस्त्र, हवाला, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, वाटणी, बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी. या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.१३.०९.२०२६

**ॲड. राधिका फाटक**
२०२, त्रिमुर्ती प्लाझा सोसायटी, अलिबाग

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान जमीन मालकांचे दरम्यान झालेली आहेत व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला आहे. सदर मिळकतीचे मालकी हक्कांबाबतचा शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणे कामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

| मौजे | गट क्र. व उपविभाग | मिळकत मालकाचे नाव | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| सुरई, ता.मुरुड | १८ | जगदिश सखाराम आयरकर | ०-०५-३०<br>पो.ख. ०-००-२०<br>एकुण ०-०५-५० | १.०२ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, पोटगी साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १५ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणारे यांचेकडे कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनाजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरच्या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे. सदर नोटीस प्रसिद्ध करण्यास तसेच सदर व्यवहारास जगदिश सखाराम आयरकर यांची कोणत्याही प्रकारची हरकत नाही.

अलिबाग
दिनांक : १३/०९/२०२६

सही /-
**ॲड. अनिकेत ना. पाटील**
ऑफीस : श्रुती सारंग बिल्डिंग,
ऑफीस नं.३, युनियन बँक ऑफ
इंडिया समोर, अलिबाग-रायगड.

## जाहीर सुचना

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली बिनशेती मिळकत ही श्री. आनंद राजीव गोदीवाला, रा. श्रीबाग- अलिबाग, यांचे मालकी हक्काची व ताबे वहीवाटीची आहे. सदर मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतची खात्री विद्यमान मालकांनी दिलेली आहे. सदर मिळकतीचे कायदेशिर मालकी हक्काबाबतचे टायटल ओपिनियन (Title Verification) व शोध प्रमाणपत्र देण्याबाबत सांगितलेले आहे. त्यानुसार खालील परिशिष्टयामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री.आनंद राजीव गोदीवाला, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध आहेत किंवा कसे या बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती / संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा ) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर चौ.मी. ) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| चोंढी, ता.अलिबाग. | ६८/२ | ९-००-०० एकूण | ९०-०० |

अलिबाग,
दिनांक : १२/०९/२०२६.

सही/-
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग,
टिळक रोड, अलिबाग- रायगड.

## जाहीर सुचना

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली शेतजमिन मिळकत ही श्री. राजीव गोदिवाला, रा. श्रीबाग अलिबाग, यांचे मालकी हक्काची व ताबे वहीवाटीची आहे. सदर मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतची खात्री विद्यमान मालकांनी दिलेली आहे. सदर मिळकतीचे कायदेशिर मालकी हक्काबाबतचे टायटल ओपिनियन (Title Verification) व शोध प्रमाणपत्र देण्याबाबत सांगितलेले आहे. त्यानुसार खालील परिशिष्टयामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री.राजीव गोदिवाला, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध आहेत किंवा कसे या बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर ) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| चोंढी, ता.अलिबाग. | ६९/२ | ०-१७-००<br>०-०३-१० पो.ख.<br>०-२०-१० एकूण | ०-३२ |

अलिबाग.
दिनांक १२/०९/२०२६.

सही/
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग,
टिळक रोड, अलिबाग- रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान जमीन मालकांचे दरम्यान झालेली आहेत व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला आहे. सदर मिळकतीचे मालकी हक्कांबाबतचा शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणे कामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

| मौजे | स.नं. | मिळकत मालकाचे नाव | अकृषिक क्षेत्र हे आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| सहाण, ता.अलिबाग | ३३९ | दिपा श्रीधर शितोळे, श्रीधर मदन शितोळे | बिनशेती ८-८५-०० | ८८.५० |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, पोटगी साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १५ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणारे यांचेकडे कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनाजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरच्या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे. सदर नोटीस प्रसिद्ध करण्यास तसेच सदर व्यवहारास दिपा श्रीधर शितोळे व श्रीधर मदन शितोळे यांची कोणत्याही प्रकारची हरकत नाही.

अलिबाग
दिनांक : १३/०९/२०२६

सही /-
**ॲड. अनिकेत ना. पाटील**
ऑफीस श्रुती सारंग बिल्डींग,
ऑफीस नं. ३, युनियन बँक ऑफ
इंडिया समोर, अलिबाग-रायगड.

(केवळ सभासदांसाठी)

**जनता शिक्षण मंडळ, अलिबाग**
**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

जनता शिक्षण मंडळ, अलिबाग या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दिनांक २६/०९/२०२६ रोजी सकाळी ठिक ११:३० वाजता मंडळाच्या महाविद्यालयाच्या जागेत भरणार आहे.

गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास ती सभा अर्ध्यातासानंतर त्याच ठिकाणी त्याच कामासाठी सुरु होईल. त्या सभेस गणसंख्येची आवश्यकता नाही.

कृपया सदर सभेस अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

**-: सभेपुढील कामे :-**

काम नं १. : मागील दिनांक २५/०९/२०२५ च्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास मंजूरी देणे.
काम नं २. : सनदी लेखापाल यांनी मागील आर्थिक वर्षाच्या ताळेबंदामध्ये असलेले परंतु निरुपयोगी, कालबाह्य निर्मुल्य व निकामी झालेले साहित्य प्रमाणित करुन निर्लेखित (राईट ऑफ) केलेल्यासह सन २०२५-२६ चे सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेले संस्था व संस्थेच्या सर्व शाखांचे जमाखर्चाचे एकत्रित ताळेबंद व नफातोटा पत्रक मंजूर करणे.
काम नं ३. : जनता शिक्षण मंडळाच्या संचालक मंडळाने सादर केलेला सन २०२५-२६ या वर्षाचा वार्षिक अहवाल मंजूर करणे.
काम नं ४ : सन २०२६-२७ या वर्षाकरिता सनदी लेखापाल यांची नेमणूक करणे व त्याचा मेहनताना ठरविणे.
काम नं. ५ : मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या कामांचा विचार करणे.

अलिबाग
दिनांक : ०९/०९/२०२६

**ॲड. डॉ. गौतम प्र.पाटील**
**अध्यक्ष,**
**जनता शिक्षण मंडळ**

दि. ११/०९/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक किरण दत्तात्रेय मोडखरकर यांच्या मालकीची मिळकत त्यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| तळाशेत ता.अलिबाग | १६/२ | एकुण ०-४०-०० | ९.७० |

वर वर्णन केलेल्या मिळकतींपैकी क्षेत्र ०-२०-०० हे.आर. ही मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ (सात) दिवसांचे मुदतीत खालिल सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरच्या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. मानस सुधाकर पाटील**
मु. आंबेघर, पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ७७४३८०९६५३


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **विधवा महिला पाहिजे**-उंच असलेली, वय-३६ ते ४६ वर्षे, रंग-गोरा, सुंदर, शिक्षण-किमान १० वी पास, स्वयंपाक येणारी, जातीची अट नाही-पुरूष-वय ५२ वर्ष MNC जॉब उत्पन्न ७५००० महिना मो. ९८९२७१३०८०
- **मुंबईतील नामांकित कंपनीच्या** नागाव गेस्ट हाऊसमध्ये कर्मचारी हवेत. मॅनेजर केअरटेकर कूक माळी मदतनीस ड्रायव्हर गार्ड राहण्या-खाण्याची सोय माहितीसह संपर्क करा. व्हाट्सअप- ८१६९५८४०७२.
- **Vacancy in furniture Workshop** office Education - Graduation Experience - 2 years Location - Bamansure, chondhi Contact - 9823585321
- **फर्निचर शोरूममध्ये सेल्स गर्ल/बॉय पाहिजे** ठिकाण-झिराड, पात्रता -MBA अनुभव -३-४ वर्षे सेल्सचा अनुभव, पगार-२५००० महिना Contact- 9823585321
- **सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये** ऑफिस कामासाठी स्थानिक मुलगी पाहिजे व ड्रायव्हर पाहिजे. 9763006555
- **अलिबाग एसटी स्टॅन्डजवळ** दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९.
- **जन्नावार हॉस्पीटल चेंढरे** अलिबाग मध्ये कामासाठी मावशी स्टाफ नर्स साठी जागा आहे. संपर्क - ७७९८० ३४५०९
- **प्रल्हाद इलेक्ट्रीकल्स** - घरगुती इलेक्ट्रीक वस्तु घरी येऊन किंवा घरून घेऊन जाऊन चेक अथवा दुरूस्त केल्यास जातील. ७०६६१३८३६८/७३७८४८०१५१
- **TANNA FINSERV**
शॉप नं. १, शारदा CHS, महावीर चौक, बेल्जियन वॅफल समोर, अलिबाग, जि. रायगड, ऑफिस स्टाफची आवश्यकता, शेअर मार्केटसाठी Bolt Operator आवश्यक, Tanna Finserv मध्ये करिअरची उत्तम संधी! संपर्कः ९९२३७५०५४९/९१०५७१७०३८. इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा. अनुभवी व नवोदित उमेदवारांचे स्वागत आहे.

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**




## राशीभविष्य

- **मेष** : अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवावं. जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील. विद्यार्थ्यांना सुयश प्राप्त होईल.
- **वृषभ** : उपजत कला-गुणांना संधी लाभतील. गैरसमजांपासून दूर रहावं. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील.
- **मिथुन** : साऱ्या गोष्टी मनाप्रमाणे घडतील. नोकरीत कामाचा ताण वाढेल. कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल.
- **कर्क** : भावंडांचं उत्तम सहकार्य राहील. कार्यक्षेत्रात नव्या संधींचा लाभ घ्यावा. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **सिंह** : महत्त्वाची कामं विलंबानं होतील. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. चोरी अथवा नुकसान संभवतं.
- **कन्या** : प्रलंबित कामं मनासारखी होतील. महत्त्वाचे करार तुर्तास नको. ज्येष्ठांचं मार्गदर्शन कामी येईल.
- **तूळ** : उगाच चिंता करू नका. ग्रहमानाची अनुकूलता लाभणार आहे. आवडीच्या क्षेत्रात संधी लाभतील.
- **वृश्चिक** : दिलासादायक घटना घडतील. आर्थिक प्रश्नातून मार्ग निघेल. कलाकारांचा उत्साह वाढता राहील.
- **धनु** : महत्त्वाची कामं हातावेगळी होतील. व्यवसायात नव्या संधींचा लाभ घ्यावा. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **मकर** : महत्त्वाचे निर्णय विचारानं घ्यावेत. व्यवसायात उलाढाल वाढेल. स्थापत्य क्षेत्रात संधी लाभतील.
- **कुंभ** : मनात निराशा दाटून येईल. नको त्या विचारांनी चिंता वाढीस लागेल. कुलदेवतेची उपासना करावी.
- **मीन** : प्रियजनांच्या भेटीगाठी होतील. खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. नव्या ओळखी कामी येतील.

## १३ सप्टेंबर
दिनविशेष

**१९२९** : लाहोर कटातील आरोपी जतींद्रनाथ दास यांचा तुरुंगातील जुलमाचा निषेध म्हणून केलेल्या उपोषणात त्रेसष्ठाव्या दिवशी मृत्यू.
**१९९९** : मॉस्कोमध्ये बॉंबस्फोट. ११९ ठार.
**२००३** : ज्येष्ठ गायक पं. दिनकर कैकिणी यांना तानसेन पुरस्कार तर मेंडोलिनवादक यू. श्रीनिवास यांना कुमार गंधर्व राष्ट्रीय पुरस्कार जाहीर.
**२०१७** : कुलभूषण जाधव प्रकरणात भारत सरकारने आंतरराष्ट्रीय न्यायालयात लेखी स्वरुपात बाजू मांडली.

आरोग्यमंत्र

## सांध्यांची कुरकुर

वयोवृद्ध माणसांना जिना चढणं, उतरणं ,खाली मांडी घालून बसणं व उठणं , गुडघे दुखत असल्याने अनेकदा नको वाटतं. शरीरात असंख्य सांधे आहेत. पण मुख्य भार पडतो तो गुडघ्यांवरच. वयोपरत्वे सांधे कुरकुरु लागतात आणि दुखतात. सांधा म्हणजे दोन हाडं एकत्र येऊन हालचाल होते ती जागा. तिथं दोन्ही हाडांच्या टोकांना कुर्चा नावाच्या मऊ श्लेष्मल पदार्थाने झाकलेलं असतं. या कुर्चा जिथं संपतात तिथून हाडाचा प्रत्यक्ष भाग स्नायूंनी झाकला जातो. दोन्ही हाडांच्या कुर्च्यांनी बनलेला हालचाल करणारा जोड एका आवरणानं संपूर्ण



झाकला जातो. या आवरणाच्या आत एक मऊ वंगण सतत स्रवत असतं. त्यामुळे कोणतीही हालचाल करताना सांधा कुरकुरत नाही. वयानुसार अन्य काही कारणाने कुर्चा झिजतात. कुर्चांची झीज झाल्यामुळं ज्या सहजपणं सांध्याची हालचाल व्हायला पाहिजे ती होईनाशी होते. हाडांच्या टोकांशी घर्षण होऊन सूज धरू लागते. या सुजेमुळे व घर्षणामुळे सांधेदुखी सुरू होते. काही आजारात सांध्यातील वंगण कमी होतं. परंतु न वापरला गेल्यानेच सांधा निकामी होत जातो हेही प्रयोगाने सिद्ध झालेले आहे. ज्यांनी आयुष्यभर नियमित हालचाल आणि व्यायाम केला आहे. सर्व सांध्यांचा वापर होईल अशी काळजी घेतली आहे त्यांचे साधे क्वचितच त्रास देतात. शरीरात सांधे आहेत म्हणूनच हालचाल शक्य आहे. ते शक्यतो पूर्ण निरोगी रहावेत, याची निगा राखणं त्यासाठीच आवश्यक आहे.

अजब गजब

## चित्रविचित्र प्राणी

* थोर्नी डेव्हिल नावाची एक पाल आहे. ही पाल ऑस्ट्रेलियातच आढळते. तिच्या संपूर्ण शरीरावर काटे असतात. त्यामुळे ही पाल खूपच धोकादायक बनली आहे. या पालीच्या डोक्यावरचा काटा खूप मोठा असतो. हा काटा म्हणजे दुसरं डोकं आहे की काय, असं वाटतं. ही पाल दिवसभरात हजारो मुंग्या खाऊन टाकते.

* दक्षिण तसंच मध्य अमेरिकेतल्या काही देशांमध्ये पोटू नावाचा पक्षी आढळतो. याच्या त्वचेचा रंग खोडाच्या लाकडासारखा असतो. मान हे या प्राण्यांचं मुख्य वैशिष्ट्य आहे.

* जपानी स्पायडर क्रॅब हा सुद्धा अनोखा सजीव. हा सजीव कोळ्यासारखा दिसत असला तरी तो खेकडा आहे. या खेकड्याचं वजन १८ किलोपर्यंत असू शकतं. हा खेकडा १०० वर्षांपर्यंत जगू शकतो.

* ऑस्ट्रेलिया आणि न्यू गिनीमध्ये विशिष्ट प्रकारची पाल आढळते. या पालीला फ्रिल नेक्ड लिझार्ड असं म्हटलं जातं. या पालीच्या मानेजवळ पंखांसारखा एक भाग असतो. यामुळे ही पाल वेगळी वाटते.

ब्युटी टॉक

## तजेलदार फेस मिस्ट

त्वचेचं सौंदर्य खुलवणारी विविध उत्पादनं बाजारात मिळतात. आपण आय लायनर, मस्कारापासून फाउंडेशन, कंसीलर, लिपस्टिक, आय शॅडोचा वापर करतो. सौंदर्याच्या बदलत्या संकल्पना स्वीकारण्याचा आजच्या महिलांचा प्रयत्न असतो. मात्र मेक अप उत्पादनांमधल्या रसायनांमुळे त्वचा खराब होऊ शकते. हे टाळण्यासाठी तुम्ही फेस मिस्ट वापरू शकता. फेस मिस्ट हा प्रकार बराच लोकप्रिय ठरतो आहे. म्हणूनच तुमच्या मेक अप किटमध्ये फेस मिस्टची बाटली असायलाच हवी. फेस मिस्ट म्हणजे नेमकं काय आणि त्याच्या वापरामुळे काय लाभ होतात हे जाणून घेऊ.

* फेस मिस्ट म्हणजे एकप्रकारचा स्प्रे असतो. हा स्प्रे विविध प्रकारच्या नैसर्गिक घटकांपासून बनवला जातो. मिस्ट चेहऱ्यावर फवारल्यानंतर आपल्याला खूप ताजंतवानं वाटतं. त्वचेला ओलावा देण्याचं काम फेस मिस्ट करतं. बाजारात कोरफड, ग्रीन टीपासून तयार केलेले फेस मिस्ट मिळतात. मिस्ट घरीही तयार करता येतं. तेलकट त्वचा असणाऱ्यांनीही फेस मिस्ट वापरायला हवं. **(क्रमश:)**

### पंचांग

**रविवार, १३ सप्टेंबर २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
भाद्रपद शु. २, चंद्रराशी : कन्या,
नक्षत्र : हस्त, योग : शुक्ल,
सूर्योदय ६.२८, सूर्यास्त ६.४१

### फॉरवर्ड्स

**झट से बदल दूं इतनी ना हैसीयत
हैं ना आदत हैं हमारीं...**

**रिश्तें हो या लिबास हम बरसों
चलातें हैं...!**

### वेगळ्या वाटा

सध्या सर्वच क्षेत्रात प्रचंड स्पर्धा पहायला मिळते. वाढती आव्हानं, प्रलोभनं यामुळे युवा वर्गावर खूपच ताण आला आहे. अनेक जण झटपट यशाच्या मागे लागले आहेत. ताण, स्पर्धा यांचा सामना करताना अनेकांना नैराश्य येतं. काहींना क्रीडा क्षेत्रात काहीतरी करून दाखवायचं असतं. सध्या बरेच युवक स्वत:चा व्यवसायही सुरू करतात. अशावेळी त्यांना गरज असते ती प्रेरणेची, प्रोत्साहनाची. अशी प्रेरणा देण्याचं काम 'मोटिव्हेशनल स्पीकर' करतात. सध्या बरेच जण 'मोटिव्हेशनल स्पीकर' म्हणून काम करतात. तुमच्यातही इतरांना प्रेरणा देण्याची धमक असेल तर 'मोटिव्हेशनल स्पीकर' म्हणून करिअर घडवता येईल. **(क्रमश:)**

करिअरवाटा

## हमखास मिळेल यश

स्पर्धा परीक्षांची तयारी हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातला प्रचंड तणावाचा काळ असतो. त्यामुळे या काळातील तणाव कमी करण्यासाठी प्रयत्न होण्याची गरज आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी काही पथ्यं पाळली पाहिजेत. पहिली गोष्ट म्हणजे आपल्यावर फार मोठा तणाव नाही हे मनाला समजावलं पाहिजे. काही विद्यार्थ्यांना गरज नसताना तणाव ओढवून घेण्याची सवय असते. मात्र



आता कारकिर्दीचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे थोडे कमी-जास्त मार्क मिळाले म्हणून सगळं गमावलं असं होत नाही. अर्थात तयारी मनापासून करायला हवी. पण फार तणावाखाली राहण्याची आवश्यकता नाही. बऱ्याच वेळा अशा परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांना मित्रमैत्रिणींच्या अभ्यासाशी आपल्या अभ्यासाची तुलना करण्याची सवय असते. तेव्हा अशी तुलना न करता आपण आपल्या पध्दतीने अभ्यास केला पाहिजे. आपण तणावमुक्त मनस्थितीत अभ्यास करू तेवढा तो चांगला होतो. तेव्हा विनाकारण ओढवून घेतलेला तणाव सोडून दिला पाहिजे आणि तणावमुक्त अवस्थेत तसंच ताज्यातवान्या मनाने अभ्यास केला पाहिजे. तसं झाल्यास कोणत्याही परीक्षेत यश मिळवणं शक्य होईल.

खेचाखेची

### प्रार्थना

**शिक्षिका** : मुलांनो, सांगा तुम्ही जेवणापूर्वी काय करता?
**मुले** : बाई, आम्ही हात-पाय स्वच्छ धुतो आणि त्यानंतर जेवायला बसतो.
**शिक्षिका** : शाब्बास मुलांनो! जेवणापूर्वी हात-पाय स्वच्छ धुवावेत आणि देवाची प्रार्थना करावी.
.
**वर्ग** : बाई, आमच्या आईला छान स्वयंपाक करता येतो. त्यामुळे आम्ही देवाची प्रार्थना करत नाही.

### वेगळं काही

जगातला सर्वात महागडा तुरुंग क्युबामध्ये आहे. इथे एका कैद्यावर कोट्यवधी रुपये खर्च होतात. 'ग्वांतानमो बे' असं या तुरुंगाचं नाव आहे. हा तुरुंग ग्वांतानमो खाडीच्या किनाऱ्यालगत आहे. या तुरुंगात ४० कैदी असून प्रत्येक कैद्यावर वर्षाला ९३ कोटी रुपये खर्च होतात. या तुरुंगात १८०० पोलीस आहेत. प्रत्येक कैद्यामागे ४५ पोलीस आहेत. तुरुंगाच्या सुरक्षेसाठीच दरवर्षी ३९०० कोटी रुपये खर्च होतात. या तुरुंगात जागतिक स्तरावरचे अत्यंत धोकादायक कैदी आहेत. या तुरुंग परिसरात तीन इमारती असून दोन इमारतींमध्ये गुप्त मुख्यालयं आहेत. तसंच दोन रुग्णालयंही आहेत. वकिलांसाठीही वेगळी सोय करण्यात आली आहे. इथे वकील कैद्यांशी संवाद साधू शकतात.

स्मार्ट शॉपिंग

## फर्निचरची ऑनलाईन खरेदी

फर्निचर घ्यायचं ठरलं असेल आणि त्यातही ऑनलाईन शॉपिंग करणार असाल तर काही गोष्टी लक्षात ठेवायला हव्या.



* सोफा किंवा बेड घ्यायचा असेल आणि शॉपिंग साईटवरची वस्तू आवडली असेल तर सर्वात आधी घरातल्या जागेचं मोजमाप करा. फर्निचर वेगवेगळ्या आकारामध्ये उपलब्ध असतं. त्यामुळे आधी आकाराबद्दलची माहिती नीट वाचून घ्या. ते फर्निचर तुमच्या घरात नीट बसायला हवं. ऑनलाईन खरेदी करायचं निश्चित झाल्यावर नियम आणि अटी जाणून घ्या. * फर्निचरची निवड केल्यानंतर त्याबद्दलची माहिती नीट वाचून घ्या. संबंधित उत्पादनाचा रंग, मटेरियल, मेटेंनन्स याबद्दलची सगळी माहिती वाचून घ्यायला हवी. * वजनदार फर्निचर ग्राहकाच्या घरापर्यंत पोहोचवण्यासाठी येणारा खर्च दुकानदार ग्राहकांकडूनच वसूल करतात. हा खर्च किती आहे याची माहिती करून घ्या. दुकानदार अव्वाच्या सव्वा शुल्क आकारात असतील तर खरेदीबाबत विचार करा. * रिटर्न पॉलिसी जाणून घ्या.

## सुडोकू १४९


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ९ | | | ४ | ८ | ५ | २ | ६ |
| ३ | | ६ | | | | | | |
| | | ५ | | | ७ | ४ | | ९ |
| १ | | ४ | | | | | | ८ |
| | | | ४ | | ९ | | | |
| ९ | | | | | | ६ | | ४ |
| ५ | | ३ | ६ | | | ७ | | |
| | | | | | | ८ | | ३ |
| ४ | ६ | ७ | ८ | २ | | | ५ | |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १४८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ४ | ५ | ३ | ९ | ८ | ६ | १ | ७ |
| ८ | १ | ३ | ७ | ६ | ५ | २ | ४ | ९ |
| ६ | ९ | ७ | २ | १ | ४ | ८ | ५ | ३ |
| ७ | ३ | १ | ६ | ८ | २ | ५ | ९ | ४ |
| ५ | ६ | ९ | १ | ४ | ३ | ७ | २ | ८ |
| ४ | २ | ८ | ५ | ७ | ९ | ३ | ६ | १ |
| १ | ७ | २ | ४ | ३ | ६ | ९ | ८ | ५ |
| ३ | ८ | ६ | ९ | ५ | १ | ४ | ७ | २ |
| ९ | ५ | ४ | ८ | २ | ७ | १ | ३ | ६ |

## शब्दकोडे क्रमांक १४९



**आडवे शब्द :-**
१) साखळी
४) मोठी कळशी
७) खळबळजनक
११) कमीज बरोबरचे एक वस्त्र
१३) प्रशाला
१५) चुलता
१७) पुरुष
१८) पक्षांचा समूह
१९) न्यूनता
२१) पिकांवर पडणारा एक रोग
२३) जिवलग मित्र
२५) टोळीचा प्रमुख
२७) श्रीरामाच्या तीन भावांची नावे
३०) हात
३१) संयमन, दाबून टाकणे
३३) कारस्थान
३४) एक प्रश्नार्थक शब्द
३५) व्रत
३७) तात्पर्य
३८) मोठी सतरंजी
४०) डोंगरावरील सपाट भाग
४१) निर्लज्ज
४३) अंजनाचा एक प्रकार
४४) प्रयत्न
४५) अकारण
४७) कागद चिकटविण्याचा घरगुती पदार्थ
४८) पगार
५०) एक बारीक धान्य
५२) विद्युल्लता
५३) जाणकार
५५) केव्हा (ग्रा)
५६) जंगलात राहणारे प्राणी
५८) पंख
५९) शेळी
६२) जैन साधू
६४) हिंदुस्थान
६५) दारूचा एक प्रकार
६६) उद्यान
६७) ठाणवई
६८) करमणूक करणारा
७०) जिनसांची यादी
७३) तात
७४) घोड्याचे घर
७५) पाठविलेला
७६) आनंद
७७) एक श्वासरोग
७८) समशेर

**उभे शब्द :-**
२) वाळा
३) संगोपन
४) अति उंचावरून फिरणारा पक्षी
५) रविवार
६) धनी
८) साहित्यातील नऊ भावना
९) चौक
१०) समीक्षक
१२) घाव, प्रहार
१४) मृत्युदेवता
१६) मध
२०) तारणारा
२२) विणणारा, साळी
२४) खात्री
२६) उंबरठा
२८) ब्राह्मण
२९) नाश, शंका, लेश
३२) शंकराचे एक नाव
३६) उंट हाकणारा
३७) सामन्यातील पराक्रमी खेळाडू
३८) शत्रुच्या नाशाचे मंत्रतंत्र
३९) अभिनेता
४०) काळे मणी ओवणारा
४१) गणितातील दोन प्रकार
४२) सूर्याचे एक नाव
४३) परमेश्वर
४४) छोटा खड्डा
४६) कार्य, काम
४७) धोका
४९) तेव्हा(ग्रा)
५१) अरण्य
५४) खोडण्याचे साधन
५७) ओरखडा
५८) एक फळ
६०) काटकसर
६१) कमळाचे तळे
६२) क्षमा असावी,
६३) मोठी टोपली
६४) शपथ
६५) लक्ष्मी
६९) ढग, लवकर
७१) मद्य तयार करणारा
७२) मत्सर
७३) बारा महिन्याचा काळ

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| का | र | खा | न | दा | र | ■ | ज | या | अं | गी | मो | ठे | प | ण |
| ज | मा | ■ | फा | र | क | त | ■ | म | ज | ■ | ह | ■ | र | ■ |
| वा | व | र | ■ | ■ | बा | ळ | से | ■ | न | र | क | या | त | ना |
| ■ | र | य | ता | वा | ■ | त | वा | ना | ■ | स | ■ | त्रा | ■ | म |
| अ | ■ | त | ■ | ग | बा | ळा | ■ | त | ल | वा | र | ■ | चा | क |
| वा | फ | ■ | ज | णू | ■ | ट | प | ■ | व | न | वा | स | ■ | र |
| स्त | ■ | क | ट | क | ट | ■ | द | श | क | ■ | ळ | ■ | घ | ण |
| व | हा | ण | ■ | ■ | क | ता | र | ■ | र | या | ■ | भा | न | ■ |
| ■ | त्या | ■ | वा | ल | ■ | र | ■ | श | ■ | ■ | खा | स | दा | र |
| व | ण | वा | ■ | ता | र | का | बा | र | का | ■ | ल | ■ | ट | प |
| ड | ■ | र | म | ■ | ■ | ना | ■ | म | न | क | व | डा | ■ | का |
| वा | रा | ■ | द | ■ | प | थ | क | ■ | न | ■ | र | का | ना | ■ |
| न | ज | रा | न | ज | र | ■ | स | दीं | ■ | अ | ■ | ई | ■ | पा |
| ल | ■ | खुं | ■ | ■ | त | ब | क | ■ | त | रु | ण | त | रु | णी |
| ■ | ना | डी | ■ | जा | णे | ■ | स | र | प | ण | ■ | ■ | प | ■ |

**श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनी १७५० च्या सुमारास भाद्रपदातील गणेशोत्सव थाटामाटाने करण्यास सुरूवात केली. लोकमान्य टिळकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी जनसंघटनेच्या उद्देशातून गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप प्राप्त करून दिले. १७३२ मध्ये पुणे येथे गणेशोत्सवाची प्रथा होती व त्याकाळीदेखील मिरवणुकीत मानाचा क्रम ठरला होता; हे एका दुर्मिळ दस्तावेजाद्वारे स्पष्ट झाल्याचे नमूद केले आहे. मात्र, त्यापूर्वीच समर्थ रामदास स्वामी यांनी महाराष्ट्रातील पहिला सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केल्याचे ढळढळीत पुरावे उपलब्ध झाले असताना, भारत इतिहास संशोधक मंडळाकडून त्याकडे दुर्लक्ष होत असल्याची खंत समर्थ रामदासस्वामींच्या शिवथरघळीबाबतच्या संशोधकांनी व्यक्त केली. आहे.**

# पहिला सार्वजनिक गणेशोत्सव समर्थ रामदास स्वामींचाच

शैलेश वसंत पालकर
९२२६८४९१८५

पुणे येथील एका दैनिकातील बातमीमध्ये १७३२ मध्ये पुणे येथे गणेशोत्सवाची प्रथा होती व त्याकाळीदेखील मिरवणुकीत मानाचा क्रम ठरला होता; हे एका दूर्मिळ दस्तावेजाद्वारे स्पष्ट झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. प्रचलित माहितीनुसार श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनी १७५० च्या सुमारास भाद्रपदातील गणेशोत्सव थाटामाटाने करण्यास सुरूवात केली.


लोकमान्य टिळकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी जनसंघटनेच्या उद्देशातून गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप प्राप्त करून दिले. या दोन घटनाच चर्चेत असताना त्यापूर्वीही पुणे येथील गणेशोत्सव आणि मिरवणुकीतील मानाचा क्रम अस्तित्वात असल्याचे दूर्मिळ दस्तावेजाद्वारे स्पष्ट होत असल्याचे भारत इतिहास संशोधक मंडळात राजेंद्र ढोमे यांना १७३२ सालचा अप्रकाशित दस्तावेज मिळाला असल्याचे इतिहासाचे अभ्यासक मंदार लवाटे यांनी माहिती देताना सांगितल्याचे बातमीत नमूद करण्यात आले आहे. मंदार लवाटे यांनी सांगितले की, 'पेशव्यांच्या गणेशोत्सवाचे अनुकरण त्यांच्या सरदारांनी केले असून या दस्तावेजातील माहितीत, कन्हेर सर येथे राहणारे इतिहासप्रसिध्द राणोजी शिंदे यांनी पुणेनजिकच्या औंध या गावची त्रिंबकजी आणि सूर्याजी शिंदे यांची निम्मी पाटीलकी विकत घेतली, असा उल्लेख असून तपशिलामध्ये मानपान आणि हक्क यांचा उल्लेख आहे. यातील एका कलमामध्ये 'गणेश चौथीचा गणेश पुढे रानवडे यांचा, मागून सिंदीयांचा' असे स्पष्ट म्हटले आहे. याचा अर्थ, त्याकाळी औंधसारख्या छोट्या गावातही गणेश चतुर्थीला प्राणप्रतिष्ठा होत असताना मिरवणूक निघत असावी आणि त्यातील मानाचे क्रमांकही निश्चित ठरविले जात असावेत. त्यानुसारच मूळ पाटील असलेल्या रानवडे यांच्या गणपतीचा मान पहिला ठेवला आहे.' यासंदर्भात १७५२ मधील नोंद उपलब्ध असून गराडे या सासवडजवळील गावाची पाटीलकी थोरले बाजीराव पेशवे आणि त्यांचे बंधू चिमाजी अप्पा यांनी विकत घेतली होती. नानासाहेब पेशवे यांनी पुरंदरे यांना देऊन टाकली. या पाटीलकीचे हक्क व मानपान याविषयी यात कलम असून, 'गणेश-गौरी पुरंदरे यांच्या पुढे व मागे जगदाळे यांच्या' असा स्पष्ट उल्लेख आहे.

सुंदरमठ व आनंदवनभुवन एकाच ठिकाणी असलेल्या शिवथरघळीचे संशोधकांनी गिरीधरस्वामींच्या समर्थ प्रताप ग्रंथामध्ये आलेल्या उल्लेखाबाबत इतिहास संशोधक सेतू माधव पगडी यांनी समर्थ आणि समर्थसंप्रदाय ग्रंथामध्ये पान क्रमांक १०६ वर यापेक्षाही आधी म्हणजे इ.स. १६७५ मध्ये समर्थ रामदास स्वामींनी महाराष्ट्रातील पहिल्या सार्वजनिक गणेशोत्सवाचे आयोजन केल्याचे वर्णन केल्याचे पुराव्यादाखल सांगितले आहे.

**'समर्थे सुंदरमठी गणपती केला।दोनी**
**पुरूषे सिंदूरवर्ण अर्चिला।**
**सकळ प्रांतासी मोहोछव**
**दाविला।भाद्रपद माघपर्यंत।**
**शिवराजासी अकरा मुष्ठी भिक्षा मागो**
**धाडीली**
**शिवराज म्हणे माझी परिक्षा समर्थे**
**मांडीली।**
**अकरा अकरी (एकवीसाशे-१२१)**
**खंडया कोठी पाठविली।**
**हनुमान स्वामीमुष्ठी लक्षुनिया।।'**

असे हे वर्णन आहे. यातील 'दोही पुरूष'चा चुकीचा अर्थ 'दोन पुरूष उंचीचा' असा काही अभ्यासकांनी लावल्याने (दासायन) सध्या आपण मोठ-मोठया गणेशमूर्ती पाहतो आहोत. गजमुख गणेशाला गज म्हणजे हत्तीएवढाच महाकाय बनविण्याचा अट्टाहास केवळ या चुकीचा अर्थ लावण्यातून होत असल्याने गणेशमूर्तीकारांनीदेखील मूर्तींच्या उंचीबाबत नाराजी व्यक्त केली आहे. हा गणेशोत्सव कशासाठी आयोजित करण्यात आला असावा याचे वर्णन समर्थरचित 'सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची...' या आरतीमध्ये दिसून येते. विजापूरचा सरदार अफझलखान हिंदवी स्वराज्यावर चाल करून आल्याचे शिवथरघळीतील आनंदवनभुवनामध्ये समर्थांना समजून आले.

**समर्थांच्या आनंदवनभुवनी कवितेतील**
**८ वे कडवे**
**'हे साक्ष देखिले दृष्टी।**
**किती कल्लोळ ऊठिले।**
**विघ्नघ्ना प्रार्थिले गेलो।**
**आनंदवनभुवनी।।८।।'**



हे याचा पुरावा आहे. यानंतर सन १६५८ साली 'सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची...' या आरतीद्वारे समर्थांनी 'संकटी पावावे। निर्वाणी रक्षावे।' असा म्हणजेच आमच्या महाराजांना या संकटामध्ये पाव आणि त्यांचे निर्वाणापासून रक्षण कर, असा नवस समर्थांनी गणपतीला केला. सन १६५९ साली अफझलखान प्रतापगडाच्या पायथ्याशी मारला गेला. सन १६७४ साली शिवछत्रपतींचा राज्याभिषेक झाला आणि छत्रपतींना निर्वाणीपासून रक्षिणाऱ्या गणपती नवस फेडण्यासाठी समर्थांनी शिवरायांकडे अकरा मुष्ठी भिक्षा मागितली. शिवरायांनी दिलेले १२१ खंडी धान्य भाद्रपद चतुर्थी ते माघ चतुर्थीपर्यंत सरासरी दररोज ६७५ किलो दिवसाला महाप्रसादासाठी लागल्यास सुमारे पाच महिने चाललेल्या या महाराष्ट्रातील पहिल्या सार्वजनिक गणेशोत्सवास दररोज ९५०० भाविक महाप्रसादाचा लाभ घेण्यास उपस्थित राहिले असावेत. त्यामुळेच समर्थांचा हा महाराष्ट्रातील पहिल्या सार्वजनिक गणेशोत्सव कोकणासह देशात सर्वदूर पसरला असावा तसेच समर्थरचित गणपतीची आरती यामुळे सर्वच गणेशोत्सवामध्ये म्हणण्याचा प्रघात आजतागायत सुरू आहे. 'दास रामाचा वाट पाहे सदना' या शब्दांचा संदर्भ घेता समर्थांचे रामदासपठार येथील खऱ्या शिवथरघळीजवळ सापडलेल्या आनंदवनभुवनाचा उल्लेख 'सदन' असा गिरिधरस्वामींनी केला आहे. जेथे या गणेशोत्सवासाठी महाप्रसादाचा उपक्रम होता; त्यासाठी लागणारे खाद्यतेल तयार करण्यासाठी असलेल्या जमिनीचा महसूली ७/१२ तेलाची घाणी असलेले ठिकाण म्हणून 'घाणीचा माळ' या नावानेच आहे.

**'समर्थ पर्वती केले येक गुप्त सदन।**
**प्रसंगे ठेवावया देवार्चन।**
**सूर्य प्रकाश सन्निध उदक जाण।**
**मार्ग सोपान करून जावे।'**

यामुळे आनंदवनभुवन जसे समर्थांच्या सर्वग्रंथलेखनाचे ठिकाण आहे तसेच ते या आरतीचेही जन्मस्थान आहे, असा दावा आहे. या गणेशोत्सवासाठी मंडप उभारण्यात आला होता; त्याठिकाणच्या जागेचा महसूली ७/१२ उतारा 'मंडपाचा माळ' असा आहे.

भारत इतिहास संशोधक मंडळामार्फत पुणे जिल्ह्यातील गणेशोत्सवाची परंपरा आणि मानाचा क्रम विचारात घेतला जात असताना महाराष्ट्रातील पहिला सार्वजनिक गणेशोत्सव समर्थ रामदास स्वामी यांनी महाड तालुक्यातील राम दासपठार येथील सुंदरमठामध्ये तब्बल पाच महिने आयोजित करून स्वराज्यावर व छत्रपतींवर आलेल्या संकटापासून वाचविणाऱ्या गणपतीचा नवस फेडल्याच्या इतिहासाकडे दुर्लक्ष झाल्याची खंत सुंदरमठ व आनंदवनभुवन एकाच ठिकाणी असलेल्या शिवथरघळीच्या संशोधकांनी व्यक्त केली आहे.

**'आक्रा आक्रा बहु आक्रा।**
**काय आक्रा कळेचिना।**
**गुप्त ते गुप्त जाणावे। आनंदवनभुवनी।।'**

रामदासपठारावर सुंदरमठामध्ये समर्थांच्या गणेशोत्सवानंतर तब्बल ३३५ व्या वर्षी शनिवार, दि.११ सप्टेंबर २०१० रोजी पुन्हा गणेशोत्सव सुरू करण्यात आला. सुंदरमठ असलेल्या रामदासपठार येथे पूर्वीच्या १० गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना होत असे. त्यामुळे ही ११ वी गणेशमूर्ती होती. ३३५ वर्षे यात ३३५ =११ हा पहिला ११ तर ११ सप्टेंबर हा दुसरा ११ आणि रामदासपठावरील ११ वी गणेशमूर्ती हा तिसरा ११ असा 'आक्रा आक्रा बहु आक्रा। काय आक्रा कळेचिना। गुप्त ते गुप्त जाणावे। आनंदवनभुवनी।।' या कडव्याच्या प्रचितीचा भाग होता. ●

# सार्वजनिक गणेशोत्सवामागील उद्देश आणि वास्तव !

जगन घाणेकर

सार्वजनिक गणेशोत्सव म्हणजे केवळ श्री गणेशाची मूर्ती आणून ती एखाद्या सार्वजनिक स्थळी स्थापन करणे, एवढेच डोळ्यांसमोर न येता त्यासमवेत त्याची सजावट, त्यानिमित्ताने होणारे सार्वजनिक कार्यक्रम आदी अनेक गोष्टी आपसूकच नजरेसमोर येतात. आजमितीला सार्वजनिक गणेशोत्सव केवळ मुंबई, ठाणे आणि पुणेपुरता मर्यादित राहिला नसून राज्यातील सर्वात मोठा उत्सव बनला आहे. राज्य सरकारने यंदा गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे. महाराष्ट्रासह अन्य राज्यांतही गणेशोत्सव उत्साहाने साजरा होऊ लागला आहे. यानिमित्ताने राज्याच्या अर्थकारणात दरवर्षी मोठ्या प्रमाणात उलाढाल होत असते. शहरासारख्या ठिकाणी या दिवसांत एवढ्या मोठ्या प्रमाणात भाविकांची वर्दळ असते की कधी रात्र सुरु झाली आणि कधी संपली याचा पत्ताही लागत नाही. शहरातील सार्वजनिक गणेशोत्सवाची मजा लुटण्यासाठी देश विदेशातून भाविक आणि पर्यटक मोठ्या प्रमाणात शहरांत दाखल होतात. देशाच्या सीमा ओलांडून साता समुद्रापार ज्या ज्या ठिकाणी मराठी माणूस वसला आहे त्या त्या ठिकाणी सार्वजनिक गणेशोत्सव आज साजरा होऊ लागला आहे. मुळात 'कुटुंबातील मंडळींनी एकत्र येऊन साजरा करायचा एक सण असलेली श्री गणेशचतुर्थी सार्वजनिक उत्सव कशी बनली', हे समजून घेऊया.

सार्वजनिक गणेशोत्सवाचे प्रणेते म्हणून लोकमान्य टिळक यांना ओळखले जाते. एकदा लोकमान्य टिळकांनी ह.भ.प. श्रीपतीबुवा भिंगारकर यांना विचारले, 'मी स्वराज्यप्राप्तीसाठी प्रयत्न करीत आहे; पण ईश्वरी साहाय्यावाचून कोणतेही कार्य शेवटास जात नाही. तेव्हा या स्वराज्याच्या कार्याचा राष्ट्रभर प्रसार होण्यासाठी कोणाची आराधना करावी?' बुवा म्हणाले, 'तुम्ही श्री गणपतीची पार्थिव पूजा चालू करा, म्हणजे तुमचे सर्व हेतू सिद्धीस जातील.' त्यावर लोकमान्य टिळक म्हणाले, 'मी एकट्याने अशी पूजा करून भागणार नाही. राष्ट्रभर ती सर्वांनी केली पाहिजे.

आपल्याकडे भाद्रपद शुद्ध चतुर्थीस घरोघर पार्थिव गणपतीची पूजा करायचा पूर्वीचा प्रघात आहेच. तो आता राष्ट्रभर चालू करूया.' तेव्हापासून लोकमान्यांच्या प्रेरणेने सार्वजनिक गणेशोत्सव चालू झाला! यावरून आपल्याला 'सार्वजनिक गणेशोत्सव चालू होण्यामागील मूळ प्रेरणा राष्ट्रहित आणि ईश्वरभक्ती ही आहे', हे स्पष्ट होते. 'सार्वजनिक गणेशोत्सव चालू करण्यामागील आपले उद्देश कोणते आहेत', हे लोकमान्य टिळकांनी तेव्हाच एका भाषणात स्पष्ट केले. वर्ष १८९४ मध्ये झालेल्या त्यांच्या भाषणाचा सार म्हणजे 'धर्मजागृती, राष्ट्रजागृती आणि पाश्चिमात्य संस्कृतीच्या आक्रमणाचा विरोध', हे सार्वजनिक गणेशोत्सव चालू करण्यामागील मुख्य उद्देश होत. आता मनात प्रश्न येतो की, हे उद्देश आज कालबाह्य झाले आहेत का? सध्या किती जणांमध्ये या उद्देशांचे भान आहे? सध्या किती ठिकाणी या उद्देशांना अनुरूप ठरेल, अशा प्रकारे हा उत्सव साजरा केला जात आहे? ज्या प्रकारे तो साजरा केला जात आहे, त्यात काही चुकत आहे का? जे चुकत आहे, त्यामागील कारणे कोणती आणि त्यात सुधारणा कशी करता येईल? हे आजचे ज्वलंत प्रश्न आहेत. आज अनेक ठिकाणी गणेशोत्सवासाठी वर्गणी काढताना जबरदस्ती केली जाते. काहींची आर्थिक क्षमता नसताना समाजात इतरांसोबत राहायचे म्हणून त्यांना पदरमोड करून वर्गणी द्यावी लागते. काही ठिकाणी मंडळातील कार्यकर्ते हा समजूतदारपणा दाखवतात; मात्र काही ठिकाणी नागरिकांना वर्गणी देण्यासाठी त्रास दिला जातो हे नाकारता येणार नाही.

मुळात, हिंदूंमध्ये ऐक्य निर्माण करण्यासाठी सुरु केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या मूळ उद्देशालाच आज हरताळ फासला जात आहे. वर्षागणिक निरनिराळी मंडळे स्थापन होऊ लागली आहे. शहरांत १००मीटरच्या परिसरातही २-३ मंडळे स्थापन झालेली पाहायला मिळतात. जवळजवळच्या मंडळांमध्ये सजावट, गणेश मूर्तींची उंची, उत्सवानिमित्त ठेवण्यात आलेले कार्यक्रम, आगमन-विसर्जन मिरवणुका अशा वेगवेगळ्या कारणांमुळे भांडणे होताना पाहायला मिळतात. ज्या ठिकाणी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी जमते अशा मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्सवादरम्यान भलताच उत्साह संचारलेला असतो. या उत्साहाच्या भरात आलेल्या भाविकांशी वाद घालणे, त्यांना शिवीगाळ करणे असले प्रकार या काळात हल्ली बातम्यांमध्येही पाहायला मिळू लागले आहेत.



भाविकांना आकर्षित करण्यासाठी मंडपात उंच गणेशमूर्ती बसवली जाते; मात्र अनंत चतुर्दशीला तिचे पूर्ण विसर्जन न करताच कार्यकर्त्यांकडून पळ काढला जातो. ज्या गणेशमूर्तीची १० दिवस मनोभावे पूजा केली जाते, त्याच मूर्तीची पुढे अवहेलना होते. सजावट, विद्युत रोषणाई यांवर अमर्याद खर्च केला जातो. मिरवणुकांमध्ये मंगलवाद्ये वाजवण्याऐवजी अथवा सात्विक गाणी किंवा भजने लावण्याऐवजी जीवघेणा डीजे लावून त्यावर चित्रविचित्र अंगविक्षेप करत नृत्य केले जाते. आगमन विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणाऱ्यांकडून काही ठिकाणी मद्यपान केले जाते. सार्वजनिक गणेशोत्सवाचे निमित्त करून काही ठिकाणी गणेश मंडपातच रात्री जुगाराचा डाव बसतो. या दिवसांत विधायक आणि समाजोपयोगी प्रबोधनात्मक कार्यक्रम ठेवण्याऐवजी काही ठिकाणी लावणी अथवा चित्रपट संगीताचे कार्यक्रम ठेवले जातात. या कालावधीत गणेश मंडपातील वातावरण सात्विक राहण्यासाठी सुमधुर भजने अथवा गणरायाची गाणी, स्तोत्र लावण्याऐवजी कर्णकर्कश आवाजात चित्रपट गीते लावली जातात. आरत्या म्हणताना त्या मंजुळ आवाजात न म्हणतात आरडाओरड करत म्हटल्या जातात. श्रीच्या मंडपात स्वच्छता ठेवली जात नाही. श्री गणेशाच्या हा उत्सव सार्वजनिक असला तरी तो धार्मिक उत्सव आहे. राष्ट्रकार्याला धार्मिक अधिष्ठान असावे आणि त्यातून राष्ट्रजागृतीचा संदेश लोकांपर्यंत पोहोचावा या उद्देशाने लोकमान्य टिळकांनी हा उत्सव सुरु केला. आजमितीला हा उद्देश लोप पावून उत्सवात अपप्रवृत्ती शिरल्या आहेत.

अर्थात वर नमूद केलेले प्रकार हे काही ठिकाणीच पाहायला मिळत असले तरी ते आपल्या धार्मिक उत्सवाला गालबोट लावणारे असल्याने ते थांबायला हवेत. आज हिंदूंमध्ये धर्मशिक्षणाचा अभाव असल्याने उत्साहाच्या भरात ते काय करत आहेत हे त्यांच्याच लक्षात येत नाही. आपल्या उत्सवात शिरलेल्या या चुकीच्या प्रथांना उखडून उत्सव सात्विक आणि लोकहिताचा व्हावा यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची आज नितांत आवश्यकता आहे. ●

# आपणच आपले आधार




सुनील गवळी

अत्ता हि अत्तनो नाथो. आपणच आपले नाथ, आपणच आपले आधार आणि शिल्पकार. माणसाच्या आयुष्यात अनेक व्यक्ती येतात. काही मार्ग दाखवतात, काही हात धरतात, काही प्रेरणा देतात, तर काही आपल्या चुका दाखवून देतात. आई-वडील संस्कार देतात, शिक्षक ज्ञान देतात, मित्र साथ देतात आणि समाज अनुभव देतो. तरीही आपल्या आयुष्याचा खरा प्रवास मात्र आपल्यालाच करावा लागतो. दुसरा कोणी आपल्या वतीने जगू शकत नाही, आपल्या मनातील संघर्ष लढू शकत नाही आणि आपल्या अंतर्मनात परिवर्तन घडवून आणू शकत नाही. म्हणूनच ''अत्ता हि अत्तनो नाथो'' हा विचार केवळ आध्यात्मिक संदेश नाही; तो जीवन जगण्याची जबाबदारी स्वीकारण्याचा मूलमंत्र आहे. आपल्या आयुष्यात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीसाठी परिस्थिती, माणसे, नशीब किंवा काळाला दोष देणे सोपे असते. ''माझ्यामुळे नाही'', ''परिस्थितीच अशी होती'', ''त्याने असे केले म्हणून माझे असे झाले'', अशा विचारांमध्ये माणूस काही काळ स्वतःला दिलासा देऊ शकतो; पण त्यातून परिवर्तन घडत नाही. परिवर्तनाची सुरुवात तेव्हा होते, जेव्हा माणूस स्वतःला एक साधा पण कठीण प्रश्न विचारतो की ''या परिस्थितीत मी काय करू शकतो?'' हा प्रश्न माणसाला तक्रारीपासून कृतीकडे घेऊन जातो.

स्वावलंबन म्हणजे इतरांची मदत नाकारणे नव्हे. उलट, योग्य वेळी योग्य व्यक्तीचे मार्गदर्शन स्वीकारणे हीदेखील शहाणपणाचीच खूण आहे. परंतु मार्गदर्शन मिळाल्यानंतर पाऊल आपल्यालाच उचलावे लागते. शिक्षक दिशा दाखवू शकतो; पण अभ्यास विद्यार्थ्यालाच करावा लागतो. डॉक्टर उपचार सुचवू शकतो; पण आरोग्यासाठी आवश्यक शिस्त आपल्यालाच पाळावी लागते. मित्र धीर देऊ शकतो; पण संकटातून बाहेर पडण्याची मानसिक तयारी आपल्यालाच करावी लागते. म्हणूनच मदत घेणे ही कमजोरी नाही; परंतु स्वतःची जबाबदारी दुसऱ्यावर सोपवणे ही कमजोरी ठरू शकते.

आजच्या काळात ही शिकवण अधिक महत्त्वाची वाटते. तंत्रज्ञानाने आपले जीवन सोपे केले आहे; पण त्याचबरोबर आपल्या अनेक गरजा बाह्य साधनांवर अवलंबून झाल्या आहेत. सोशल मीडियावरील कौतुकातून आत्मविश्वास मिळवण्याची सवय, इतरांच्या मान्यतेवर स्वतःची किंमत ठरवण्याची प्रवृत्ती आणि प्रत्येक अडचणीसाठी बाह्य कारण शोधण्याची मानसिकता माणसाला स्वतःपासून दूर नेत आहे.

खरा आत्मविश्वास मात्र टाळ्यांमधून निर्माण होत नाही. तो स्वतःच्या प्रयत्नांतून निर्माण होतो. आपण एखादे काम केले आणि त्यासाठी कोणी कौतुक केले नाही, तरी ते काम योग्य होते का? आपण एखादा निर्णय घेतला आणि सर्वांनी त्याला विरोध केला, तरी तो आपल्या मूल्यांशी प्रामाणिक होता का? आपल्याला अपयश आले आणि कोणी आधार दिला नाही, तरी पुन्हा उभे राहण्याची शक्ती आपल्यात आहे का? अशा प्रश्नांची उत्तरे बाहेर शोधता येत नाहीत. त्यासाठी स्वतःच्या अंतर्मनाशी संवाद साधावा लागतो.

यासाठी स्व-निरीक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्या मनात कोणते विचार वारंवार येतात, कोणत्या प्रसंगी आपण पटकन रागावतो, कोणत्या गोष्टी आपल्याला अस्वस्थ करतात, आपण कोणाकडून सतत मान्यता अपेक्षित ठेवतो, आपल्या अपयशाचे कारण आपण कुठे शोधतो की हे शांतपणे पाहणे म्हणजे स्वतःला ओळखण्याची सुरुवात.

मनाचे निरीक्षण करण्याची सवय लागली की एक महत्त्वाचा फरक जाणवतो की घटना आणि आपली प्रतिक्रिया या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. घटना आपल्या नियंत्रणात नसू शकते; परंतु त्या घटनेला आपण कसा प्रतिसाद देतो, यावर बऱ्याच अंशी आपले नियंत्रण असते. याच ठिकाणी आत्मशिस्त महत्त्वाची ठरते.

मोठे परिवर्तन अनेकदा मोठ्या निर्णयांमधून होत नाही; ते छोट्या-छोट्या सवयींमधून घडते. वेळेचे भान ठेवणे, दिलेले काम पूर्ण करणे, चुकीची कबुली देणे, भावनेच्या भरात निर्णय न घेणे, नियमित वाचन करणे, शरीराची आणि मनाची काळजी घेणे, आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्वतःशी प्रामाणिक राहणे. या साध्या गोष्टी व्यक्तिमत्त्वाला आतून मजबूत करतात. स्वतःचा आधार होणे म्हणजे स्वतःला सर्वज्ञ समजणे नव्हे; स्वतःच्या अपूर्णतेची जाणीव ठेवूनही पुढे जाण्याची तयारी ठेवणे होय.

चूक झाली तर स्वतःला दोष देत बसण्याऐवजी तिच्याकडून शिकणे आवश्यक आहे. अपयश आले तर स्वतःची किंमत कमी समजण्याऐवजी त्यातून पुढचा मार्ग शोधणे आवश्यक आहे. कारण अपयश माणसाला संपवत नाही; अपयशाबद्दलची चुकीची भूमिका माणसाला थांबवते.

बुद्धांच्या विचारातील आत्मनिर्भरतेचा गाभा याच ठिकाणी जाणवतो.मार्ग दाखवला जाऊ शकतो; पण मार्गावर चालण्याचे काम स्वतःलाच करावे लागते. आजच्या विद्यार्थ्यांसाठीही हा विचार अत्यंत उपयुक्त आहे. पालक सुविधा देऊ शकतात, शिक्षक शिकवू शकतात, पुस्तके ज्ञान देऊ शकतात आणि तंत्रज्ञान माहिती उपलब्ध करून देऊ शकते; परंतु जिज्ञासा, अभ्यासाची सवय, एकाग्रता, सातत्य आणि चारित्र्य या गोष्टी विद्यार्थ्याने स्वतःमध्ये विकसित कराव्या लागतात. कोणीतरी आपल्यासाठी परीक्षा देऊ शकत नाही आणि कोणीतरी आपल्यासाठी जीवनाचा अर्थही शोधू शकत नाही. म्हणून शिक्षणाचा अंतिम उद्देश केवळ बाह्य यश मिळवणे नसून स्वतःला घडवण्याची क्षमता निर्माण करणे हा असायला हवा.

''मी कोण आहे?'', ''मला कसे जगायचे आहे?'', ''माझ्या निर्णयांची जबाबदारी मी घेतो का?'', ''माझ्या कृतींचा इतरांवर काय परिणाम होतो?'' असे प्रश्न विचारणारा विद्यार्थी केवळ परीक्षेसाठी तयार होत नाही; तो जीवनासाठी तयार होत असतो. आपण अनेकदा बदलाची अपेक्षा इतरांकडून करतो. घरातील व्यक्ती बदलावी, समाज बदलावा, व्यवस्था बदलावी, परिस्थिती बदलावी अशी इच्छा असते. परंतु जग बदलण्याची सुरुवात अनेकदा एका छोट्याशा ठिकाणापासून होते. स्वतःपासून स्वतःची भाषा बदलली की संवाद बदलतो. स्वतःची वृत्ती बदलली की नाती बदलतात. स्वतःच्या सवयी बदलल्या की जीवनशैली बदलते. स्वतःची विचारपद्धती बदलली की निर्णय बदलतात. आणि निर्णय बदलले की आयुष्याची दिशा बदलू शकते. म्हणूनच ''आपणच आपले नाथ'' हा विचार अहंकार शिकवत नाही; तो जबाबदारी शिकवतो. तो एकटेपणा शिकवत नाही; तो अंतर्गत सामर्थ्य शिकवतो. तो इतरांना नाकारत नाही; तो स्वतःची भूमिका स्पष्ट करतो. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला कुणीतरी मार्गदर्शक मिळेलच असे नाही. काही वाटा एकट्याने चालाव्या लागतील. काही निर्णय स्वतः घ्यावे लागतील. काही दुःख स्वतःला समजून घ्यावे लागेल आणि काही प्रश्नांची उत्तरे बाहेर कुठेही सापडणार नाहीत. अशा वेळी आपल्या अंतर्मनातील शांत आवाज आपल्याला सांगतो की थांबू नकोस. दोष देत बसू नकोस.

स्वतःकडे पाहा. स्वतःला समजून घे. स्वतःला घडव. आणि पुढचे पाऊल स्वतःच टाक. कारण आयुष्याला दिशा देणारा सर्वांत महत्त्वाचा माणूस आपल्या आयुष्यात बाहेर कुठेतरी नसतो; तो आपल्या आत असतो.

आपण परिस्थितीचे केवळ परिणाम भोगणारे नसतो; आपल्या विचारांनी, कृतींनी आणि निवडींनी आपण आपल्या आयुष्याचे शिल्पकारही असतो. आणि म्हणूनच म्हणावेसे वाटते ''अत्ता हि अत्तनो नाथो'' हा केवळ एक बौद्ध विचार नाही; तो स्वतःच्या जीवनाची जबाबदारी स्वतः स्वीकारण्याचे धैर्य आहे. आपणच आपले मार्गदर्शक, आपणच आपल्या परिवर्तनाची सुरुवात, आणि आपणच आपल्या सुंदर भविष्याचे शिल्पकार. ●

# बाप्पा घरी आले हो...
# गणरायाच्या आगमनाने आनंदी आनंद

जगाचा कारभार जो चालवितो त्याला आपण देव मानतो .देव आहे असे वाटते. आपल्याला प्रकाश देतो म्हणून सूर्याला सूर्यदेव म्हणतो. आपल्या समजूतीप्रमाणे ज्यांच्या देवत्व आहे अशांची आपण पूजा करू लागतो. कधी कधी दगडाला शेंदूर लावून देवत्व आणतो. आपल्या समजुतीप्रमाणे त्याला नाव ठेवतो, मग कोणी देव मानतो. कोणी देवीची पूजा करतो. पूजेची सुरुवात कधीपासून सुरू झाली यात मत मतांतर आहेत; परंतु मानव पूजा करतो हे निर्विवाद सत्य आहे.

अनादी कालापासून पुरुषाप्रमाणे महिलेला सारखे स्थान दिले आहे, त्यामुळेच देव आणि देवी यांचे महत्त्व अबाधित राहते. पौराणिक काळापासून श्री गणेशाला अग्रपूजेचा मान मिळाला. कसा मिळाला? यासाठी अनेक वेगवेगळ्या कथा सांगितल्या जातात. प्रत्यक्ष गणेश पिता शंकरालाही जे अशक्य वाटले ते श्री गणेशाने पूर्ण केले. श्री गणेशाला भारतातच नव्हे तर जगातील अनेक देशात गणेश पूजन करतात. अनेक देशाचे उत्खननात श्री गणेशाच्या मूर्ती सापडलेल्या आहेत. हाच तो पुरावा की भारत वर्षाखेरीज जगाच्या कानाकोपऱ्यात सनातन धर्म होता. सनातन धर्माच्या सहिष्णु भूमिकेमुळे इतर धर्माने त्यांचेवर अतिक्रमण केले; परंतु सनातन धर्म हा शास्त्रीय तत्त्वज्ञानावर आधारित असल्या कारणाने शेवटपर्यंत सनातन धर्म टिकून राहिला.

भारतावर इंग्रजांची सत्ता होती त्यावेळी भारतातील माणसे एकत्र होण्यास मज्जा होता. समाज एकत्र होण्यास बंदी घातली होती. मग भारतीय समाज एकच आला एकत्र आला तर काय होईल याची इंग्रजांना भीती वाटत होती अशा वेळी लोकमान्य टिळकांनी शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याचा प्रयोग केला. जेव्हा एखादा गव्हर्नर बदलून जाताना नव्या गव्हर्नरला सूचना द्यायचा. मराठ्यांना शिक्षा केली तर ते सहन करतील परंतु त्यांच्या धर्म भावनेत ढवळाढवळ केली तर ते पेटून उठतील याचा फायदा घेऊन लोकमान्य टिळकांनीश्री गणेश उत्सव व शिवजयंती साजरी करण्याचे ठरवले व त्याचा योग्य तो फायदा झाला. भारतातील जनता एकत्र येऊन स्वातंत्र्याची ज्योत बहुजन समाजात पसरली त्याचा परिणाम



गिरीधर पिंगळे (गुरुजी)

म्हणून भारत स्वतंत्र झाला.

प्रथम गणेश उत्सव सार्वजनिक स्वरूपात होता. वैयक्तिक पातळीवर कधी आला हे समजले नाही. आज विभक्त कुटुंब पद्धतीमुळे कुटुंबातील माणसं पोटासाठी दाही दिशेला गेली तरीही या गणेश उत्सवामुळे सर्व दूर गेलेली मंडळी एकत्र येतात त्यामुळे त्यांच्याच विचारांची देवाणघेवाण होते आपुलकी निर्माण होते. उदाहरण द्यायचे झाल्यास मुंबई व कोकणासह इतर शहरात काम करणारी कामगार मंडळी आपल्या सर्व सुट्ट्या गणपतीसाठी राखून ठेवून सर्व कोकणात जातात मनोभावे पूजा करतात वारकरी जशी पंढरपूरला जाऊन माऊलीच्या दर्शनाचा आस लागलेली असते ती मंदिराचे कळसाचे दर्शन झाल्यावर मन तृप्त होते तसेच सर्व मंडळींना गणेश चतुर्थीची आस लागलेली असते कधी एकदा बाप्पासाठी गावी जातो असे होते. गणेशाची पूजा अर्चा ,आरतीमध्ये भक्तगण तल्लीन होतात ते म्हणतात कितीही खर्च झाला तरी चालेल पण बाप्पाच्या उत्सवात काहीही कमी पडता कामा नये यावरून त्यांची श्रद्धा किती तळमळीची आहे हे दिसते. बाप्पावर अनेक नवीन नवीन कवणे लिहूनआपली श्रद्धा प्रकट केली आहे.

श्री गणेशाची पूजा कशी करावी? यात मत-मतांतर असू शकतात पण सर्वांचा भाव एकच असतो. जो तो आपल्या ज्ञातीप्रमाणे उत्सव साजरे करतो बाप्पाच्या नैवेद्यासाठी आपल्या मतीप्रमाणे करतात. जेव्हा मानव प्रगत अवस्थेत नव्हता त्यावेळी पूजा करताना त्यांच्या प्रथाही रानटी होत्या. तरीही त्या देवापर्यंत पोहोचत होत्या. त्यांच्या चालीरतींचे आज आपणास आश्चर्य वाटते.


आज उत्सवाच्या नावाखाली विकृत प्रकार पहावयास मिळतात याला कुठेतरी आळा बसणे गरजेचे आहे आपल्या अंगात असणाऱ्या कलांचा आपण पुरेपूर फायदा कसा होईल हे पाहावे. उत्सवाच्या निमित्ताने स्टेज मिळतो व वेळही मिळतो बापाचे आगमनाने जो आनंद मिळतो तो कितीही पैसे खर्च केले तरी मिळणार नाही ही गणेशाची पार्थिव पूजा असते, त्यामुळे श्री गणेशाच्या मूर्तीचे विसर्जन केले जाते. बापाला निरोप देताना बाळ गोपालांच्या डोळ्यात आसवे जमा झाल्याशिवाय राहात नाही. कारण बाप्पा आपल्या घरातील सदस्य झालेला असतो. एक व्यक्ती आपला सोडून जातो, अशा वेळी लहान मुले नेऊ नका देऊ नका म्हणून हक्क सांगत खूप रडतात.

जाता जाता श्री गणरायाला एकच विनंती की आपण चौदा विद्या व चौसष्ट कलांचे स्वामी आहात तर आपण आम्हा सर्वांना आपल्या सर्व विद्या व सर्व कला आम्हाला द्याल अशी अपेक्षा करीत आहे, एवढेच माझे मागणे आहे. गणपती बाप्पा मोरया. गणपती बाप्पासाठी एक कवन

**श्री गणराया तू आमचा त्राता**
**आमच्या शिक्षणात विद्या दाता**
**तुझी सोंड आणि तू वेगळा**
**चौसष्ट कलांचा तुझा ठाव आगळा**
**अग्रपूजेचा तुज मान मिळाला**
**गवसणी घातली तू विश्वाला**
**पूजन करिता तव गणराया**
**अल्पमती मी तुज गुण गाया**
**आम्हा गणांचा तू नातलग**
**जणू वाटतो आमचा जिवलग!!**

# अंतर्मुख करणारे प्रवाही

प्रवाही, नात्यांमधल्या सुखावणाऱ्या गोष्टी, हे डॉ.मृण्मयी भजक लिखित पुस्तक, ग्रंथाली प्रकाशनने देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. आपले तिसरे पुस्तक प्रकाशित होत असताना झालेला आनंद लेखिकेने 'मनोगत'मध्ये व्यक्त केला आहे. या पुस्तकातील सर्व घटना रोजच्या जगण्यातल्या आहेत. त्यामुळे वाचक त्यांच्याशी जोडले जातील. आपल्या सगळ्यांच्याच भावविश्वात असलेल्या आशा-निराशा, बंध-अनुबंध,आसक्ती-विरक्ती अशा भावना या पुस्तकातील वेगवेगळ्या कथांमधून पाझरतात. ही लेखमाला दैनिक नवशक्तीमध्ये दीर्घकाळ प्रकाशित होत होती. त्यातील निवडक लेख या पुस्तकात घेतल्याचे लेखिकेने नमूद केले आहे. या पुस्तकामध्ये ४० लेख समाविष्ट आहेत. पुस्तकाचे सुंदर, रंगीत मुखपृष्ठ अन्वर हुसेन यांचे आहे.




पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

हिरवे अश्रू, या पहिल्या लेखात परतीच्या प्रवासात, पुण्याहून निघताना, चुकून सानिका आपल्या पतीसह पंधरा वर्षांनी जिथे नव्याने संसार सुरू केला होता, अशा त्या काळातील भाड्याच्या घरापाशी गाडीतून येते. त्या काळातील नव्या संसारातील सुखद आठवणींची झलक, तेथे पुन्हा पहावयास न मिळाल्यामुळे ती नाराज होते. परंतु थोड्या अंतरावर गाडी गेल्यावर, तेथून उंचावरून, त्यांच्या पूर्वीच्या गच्चीवर, फुललेली बाग पाहून जणु मोगऱ्याचा दरवळ तिच्या मनापर्यंत पोहोचतो आणि दोघे खुश होतात. आवडती आजी बाहेरगावी जाणार असल्यामुळे ऋतुज नाराज आहे. त्यामुळे तो क्लासला जायला तयार नाही.मात्र आधीचा निर्णय बदलल्यामुळे, त्यालाही आजीबरोबर पुण्याला जाण्याची संधी मिळाल्याने तो खुश होतो. तेरा वर्षांच्या ऋतुजचे 'शैशव' न संपल्याचे जाणवते. आईपणाचं गिल्ट,या लेखातील अंजलीला आपल्या मुलाला वाढवताना, नोकरी करीत असल्याने, त्याला पूर्ण वेळ न दिल्याचे दुःख वाटत होते. परंतु 'मदर्स डे'च्या दिवशी, सोसायटीच्या जाहीर कार्यक्रमात, समीरने मॉमच्या आवडीचे, 'अळूचे फदफदं' केले. ते पाहून आणि त्याचे प्रेम जाणवून तिच्या डोळ्यात पाणी येते. चाफा, मधील जयंतराव आणि मालतीबाई यांना गावाला राहण्याची सवय असल्यामुळे, त्यांना मुलाकडे मुंबईला यायला फारसे आवडत नसे. मुंबईला आल्यावर त्यांची जाण्याची सतत घाई असे. परंतु शैलेशला त्यांनी आपल्याजवळ राहावे असे वाटे. एके दिवशी तो बाबांना बागेत फिरायला घेऊन जातो. तेथे गावाकडला चाफा लावल्याचे सांगतो. तेथील चाफा फुलल्याने, एकट्याने फिरताना जयंतराव अंतर्मुख होतात आणि काही दिवस मुंबईत राहण्याचा निश्चय करतात. पावसाळ्याच्या दिवसात अन्वया भिजण्याचा मनमुराद आनंद घेते.परंतु घरी येते तेव्हा बाबा आलेले पाहून घाबरते. ते खूप बोलतील असे वाटत असतानाच, त्यांच्या बालमित्राचा फोन येतो. गप्पांमध्ये पावसात भिजल्याच्या, तेव्हाच्या आठवणींना उजाळा मिळाल्याने बाबा न ओरडता, अन्वयाची काळजी घेतात, अन्वयाचा पावसाळा 'हॅपी' होतो. तरुणाई, मधील श्वेता पैशाच्या मोहाने आपला मार्ग चुकते. चुकीची जाणीव झाल्याने, ती ताईकडे येऊन तिची माफी मागते. ताई मोठ्या मनाने तिला माफ करते. बाई बाई.. लेखातील एक प्रौढ समंजस स्त्री महिला दिन वेगळ्या प्रकारे कसा साजरा करते ते वाचायला मिळते. घरी काम करणाऱ्या बाईचा, नेहमीचे काम करायला न देता, तिला विविध भेटवस्तू देऊन, सिनेमाच्या तिकिटासह शेवटी चॉकलेट देते. दोघी वेगळ्या प्रकारे 'महिला दिन' साजरा करतात. दुपटं, या कथेतील सिया शहाणी मुलगी. तिचा पाचवा वाढदिवस साजरा झाला आणि नंतर घरामध्ये छोटा भाऊ सारंग आला. सियाला दीदी झाल्याचे कौतुक वाटत होते. परंतु थोड्याच काळानंतर ती आपल्या बालपणीच्या वस्तू सारंगला देण्यास विरोध करू लागली, काहीशी आक्रमकही झाली. मात्र नंतर आते तिची समजूत घालते आणि सिया पूर्ववत सारंगजवळ खेळू लागते. ऊब या कथेतील इशाला आजोबांना नवीन स्वेटर आणायचा आहे. मात्र आजोबा जुना स्वेटर वापरण्याचाच आग्रह धरतात. सियाच्या आग्रहामुळे नवीन स्वेटर आणला जातो आणि आजोबा सोसायटीच्या वॉचमनला, थंडीच्या काळात तो नवीन स्वेटर देतात. त्यांच्या डोळ्यातला नवीन स्वेटर 'भेट' देण्यातील आनंद सियाच्या डोळ्यातही दिसून येतो आणि ती प्रेमाने आजोबांना बिलगते. ताठ कणा, या लेखामध्ये नानी आणि रिंकू या दोन पिढ्यांतील, विविध टोकाच्या सवयी, नंतर परस्परांना कशा लागू पडतात आणि बदलतात, हे सोदाहरण उत्तम स्पष्ट होते. पावसाची मैत्रीण,मधील ती कितीतरी वर्षांनी, मित्राला भेटायला निघाली आहे. इमारतीच्या दारातच थुईथुई नाच करत त्याने तिचं स्वागत केलंय. त्या नृत्याचा ताल इतका सुंदर आहे की त्यात इतरांच्या नजरा, प्रश्नचिन्ह, कुजबुज तिला काहीच ऐकू येत नाहीये. ती निघालीये पूर्वीप्रमाणेच त्याला भेटायला, त्यात चिंब व्हायला, मोकळी व्हायला आणि त्याला भरून घ्यायलाही... ती प्रवाही. (पृष्ठ ७२). उद्योगिनीमधील, माधवच्या अपघाती निधनानंतर मालतीने स्वतःच्या हिमतीवर, गेल्या पाच वर्षांत, नानकटाई बनवण्याचा व्यवसाय यशस्वीपणे सुरू केला आणि उच्चभ्रू स्त्रियांच्या एका सभेत, साध्यासुध्या असलेल्या तिचे सार्थ कौतुकही होते आणि ती 'नानकटाई क्वीन' ठरते. पुस्तकभेट या लेखात लहान मुलांमध्ये वाचनाची आवड कशी निर्माण करता येईल, याची सुयोग्य चर्चा केली आहे. किशोरवयीन मुले आजूबाजूच्या अन्य मुलांच्या अनुकरणातून रात्री बारा वाजता वाढदिवस साजरा करण्याचा आग्रह पालकांना करतात. त्याची कथा 'रात्रीचे बारा' या लेखात वाचायला मिळते. स्वतःचा आणि इतरांचा वाढदिवस साजरा करताना आपला आणि इतरांचा वेळ आणि पैसा किती खर्च होतो आणि त्यातून साध्य काय होते, याचा विचारही पालकांनी करण्याची गरज आहे. दरवर्षी येणारा वाढदिवस हा अंतर्मुख करणारा असेल किंवा वेगळ्या प्रकारे साजरा केला जात असेल, तर ते अधिक चांगले नाही का, असे वाटत राहते. सुपी डू या लेखातील एकत्र कुटुंबातील मीरा सर्वांच्या खाण्याच्या आवडीनिवडी पुरवताना, सर्वांबरोबर भरपूर आहार केल्याने, चांगली जाडजूड झाली आहे. डॉक्टरांच्या सल्ल्याने वजन कमी करण्यासाठी तिला सर्वांचे सहकार्य कसे मिळते, हे या लेखात उत्तम प्रकारे सांगितले आहे. बहुतेक प्रौढ स्त्रिया आपले आरोग्य जपताना दिसत नाहीत, हेही खरेच! मोबाईलचे आपण गुलाम बनल्याने, व्यायामासाठी चालणारेही मोबाईलला आपल्यापासून दूर ठेवत नसल्याने काय होते, ते 'चालणे : एक अनुभव' या लेखात वाचावयास मिळते. चालताना आजूबाजूचे अनुभव घेणे कसे विसरले जात होते, त्याची जाणीव या लेखातून होते. कोरोना काळातील काही

बरे-वाईट अनुभवही काही लेखांतून व्यक्त झाले आहेत.

''प्रवाही, नात्यांमधल्या सुखावणाऱ्या गोष्टी'' हे डॉ. मृण्मयी भजक यांचे हे वाचनीय पुस्तक वाचकाला अंतर्मुख करते आणि विचारप्रवृत्तही! शेवटी लेखिकेचा सविस्तर परिचय छायाचित्रासह दिला आहे. उच्च मध्यमवर्गीय कुटुंबातील, मध्यवयीन स्त्रीच्या, सक्रिय आर्थिक सहभागामुळे, निर्माण झालेल्या, बदलत्या भूमिकांची जाणीव या पुस्तकाच्या वाचनातून होते. ●

**पुस्तकाचे नाव : प्रवाही**
**लेखिका : डॉ. मृणमयी भजक.**
**९४२२५३५०८४**
**प्रकाशक: ग्रंथाली, मुंबई -१६.**
**पहिली आवृत्ती : २०.८.२०२५**
**पृष्ठे :१६१. मूल्य : रुपये ३५०/-**

# ऋषीपंचमी आणि हुंदरबी

**ऋषीऋणाची जाणीव, कोकणच्या मातीचा सुगंध आणि संस्कृतीच्या मुळांशी जोडणारा दिवस म्हणजे 'ऋषीपंचमी'...!**

नाव उच्चारताच डोळ्यांसमोर उभे राहतात ते आपल्या प्राचीन संस्कृतीचे ऋषी, त्यांच्या तपश्चर्येचा प्रकाश, ज्ञानाची अखंड परंपरा आणि मातीशी नातं सांगणारे साधे, सात्त्विक जीवन. भाद्रपद शुद्ध पंचमीला येणारा हा दिवस केवळ एक धार्मिक विधी नाही; तर ज्ञान, संस्कार, कृतज्ञता, संयम आणि निसर्गाशी असलेल्या आपल्या अतूट नात्याची आठवण करून देणारा संस्कृतीचा सोहळा आहे.

गणेश चतुर्थीच्या मंगलमय आगमनानंतर दुसऱ्याच दिवशी येणारी ऋषीपंचमी कोकणच्या लोकजीवनात एक वेगळीच रंगत घेऊन येते. विशेषतः मालवणी प्रांतात 'हुंदरबी' या नावाने ओळखला जाणारा हा दिवस म्हणजे श्रद्धा, लोकपरंपरा आणि कोकणी माणसाच्या निर्मळ मनाचा सुंदर मिलाफ आहे.

गणरायासोबत येणारे 'हुंदीरमामा'...

भाद्रपद शुद्ध चतुर्थीला गणपती बाप्पाचे आगमन होते. डोक्यावर मुकुट, लंबोदर देहयष्टी, हातात मोदक आणि सोबत त्याचे लाडके वाहनमूषक!

कोकणी-मालवणी बोलीत हा मूषक म्हणजेच आपला 'हुंदीरमामा!'

गणपती बाप्पा आले की हुंदीरमामाही आलेच!

बाप्पाच्या आगमनाइतकेच त्याच्या या छोट्याशा वाहनाचेही कोकणी माणसाच्या मनात आपुलकीचे स्थान आहे.

लोकपरंपरेत एक सुंदर आख्यायिका सांगितली जाते. गणपती बाप्पा आपल्या भरदार देहयष्टीसह इवल्याशा उंदरावर विराजमान झाले. बाप्पाचा भार आणि उंदराची छोटीशी पाठ.

या विसंगतीमुळे बाप्पा सुरुवातीला घसरले. हे दृश्य पाहून आकाशातील चंद्रदेवाला हसू आले. हुंदीरमामाला त्याची लाज वाटली आणि तो रागाने रुसुन बसून राहिला.

तेव्हा गणरायाने आपल्या लाडक्या वाहनाला प्रेमाने आश्वासन दिले

''एक दिवस तुझेही पूजन केले जाईल.''

या लोककथेतून एक मोठा संदेश मिळतोलहान म्हणून कुणालाही कमी लेखू नये. ज्याला जग क्षुल्लक समजते, त्यालाही सन्मानाचे स्थान मिळू शकते. म्हणूनच गणपतीच्या या छोट्याशा वाहनालाही कोकणच्या संस्कृतीने आपल्या प्रेमाच्या पदरात जपले आहे.

आणि चंद्राला मिळालेल्या शापाची लोककथा तर आपल्या बालपणीच्या आठवणींचाच एक भाग आहे. आकाशातील चंद्रावरील डागांकडे पाहताना आजही या कथा नकळत मनात उमटतात.

'अतिथी देवो भव'कोकणी माणसाच्या रक्तात भिनलेला संस्कार!

कोकणची माती तशी साधी. लाल माती, हिरवीगार शेती, नारळी-पोफळीच्या बागा, आंब्याच्या सावल्या, डोंगर-दऱ्या आणि समुद्राची अथांग साथ...

पण या मातीपेक्षा समृद्ध आहे कोकणी माणसाचे मन!

घर कितीही साधे असो, परिस्थिती कितीही हलाखीची असो; दारात आलेल्या पाहुण्याला प्रेमाने बसवायचे, पाण्याचा तांब्या द्यायचा, घरात जे असेल ते मनापासून वाढायचेहा कोकणचा संस्कार.

''अतिथी देवो भव!''

ही केवळ म्हण नाही; ती कोकणी जीवनपद्धती आहे.

ऋषीपंचमीच्या निमित्ताने हा आदरातिथ्याचा आणि अन्नाबद्दलच्या कृतज्ञतेचा भाव अधिकच



खुलून येतो.

'नया आसा'नव्या धान्याचा आनंद!

खरंतर आमच्या गावात

'नया' हो सण म्हणजे हुंदरबी. 'नया' हा मालवणी माणसांच्या संस्कृतीचा एक सण. शेतातील पिकणाऱ्या धान्यदेवतेच्या पहिल्या घासाची चव गणपतीबाप्पाला नैवेद्य दाखवून करायची गोड प्रथा मालवणी माणसात दिसून येते.

ऋषीपंचमीच्या दिवशी कोकणातील गावागावांत एक वेगळेच चैतन्य जाणवते.

ग्रामदैवताच्या मंदिरात पहाटेपासून ढोल-ताशांचा निनाद सुरू होतो. पहाटेच्या शांत वातावरणाला भेदून जाणारा ढोलाचा आवाज जणू संपूर्ण गावाला जागे करतो.

''नया आसा!''

नवे धान्य आले आहे... नव्या ऋतूचे स्वागत झाले आहे... निसर्गाने पुन्हा एकदा आपल्या कष्टाचे फळ आपल्या ओंजळीत टाकले आहेअसा आनंद या शब्दांत सामावलेला असतो.

आंब्याची पाने, नऊ प्रकारची धान्ये, केसर, गंध, अक्षता यांचा वापर करून पूजा केली जाते. नऊ धान्यांचे आणि पानांचे तोरण तयार केले जाते.

ते केवळ घराच्या दरवाजावरच नाही, तर घरातील वस्तूंनाही बांधले जाते.

ज्या वस्तूंनी वर्षभर आपल्या जीवनाची साथ दिली, त्यांच्याबद्दलही कृतज्ञता!

गणपतीच्या माटीलाही हे तोरण बांधले जाते. कारण भारतीय संस्कृतीने निर्जीव वस्तूंमध्येही कृतज्ञतेची भावना पाहिली आहे.

शेतातून आलेले नवे धान्य आणि आईच्या हातची खीर...

ऋषीपंचमी म्हणजे निसर्गाच्या ऋणाची जाणीव करून देणारा दिवस.

भातशेतातून आलेल्या नव्या धान्याचा तांदूळ आणायचा...

त्याची प्रेमाने खीर करायची...

नऊ प्रकारच्या भाज्यांचा नैवेद्य करायचा...

आणि हा प्रसाद शेतात ठेवायचा.

या साध्याशा कृतीमागे किती मोठा भाव दडलेला आहे!

ज्या मातीतून अन्न मिळाले, त्या मातीला विसरायचे नाही.

ज्या शेतकऱ्याने कष्ट केले, त्याचे ऋण विसरायचे नाही.

ज्या निसर्गाने पाऊस, माती, सूर्यप्रकाश दिला, त्याची कृपा विसरायची नाही.

आजच्या आधुनिक जीवनात आपण बाजारातून अन्न विकत घेतो आणि त्यामागचा प्रवास विसरतो. पण आपल्या पूर्वजांनी प्रत्येक घासामागे असलेली माती, पाऊस, शेतकरी, बैल, बी-बियाणे आणि निसर्गाची शक्ती ओळखली होती.

ऋषींची भाजीसाधेपणात दडलेली समृद्धी

ऋषीपंचमीच्या दिवशी अनेक ठिकाणी विविध कंदमुळे, भाज्या आणि रानभाज्या एकत्र करून 'ऋषींची भाजी' केली जाते.

ही भाजी म्हणजे फक्त अनेक भाज्यांचा संगम नाही.

ती म्हणजे निसर्गाने दिलेल्या विविधतेला वंदन!

धनंजय शेटये

आजच्या पिढीला अनेक रानभाज्यांची नावेही माहीत नसतील. पण आपल्या आजी-आजोबांच्या पिढीला या भाज्यांचे ऋतू, त्यांची चव, त्यांचे गुण आणि त्यांचा वापर ठाऊक होता.

म्हणून ऋषीपंचमी हा सण आपल्याला केवळ पूजा शिकवत नाही; तो स्थानिक अन्नसंस्कृतीचे आणि पारंपरिक ज्ञानाचे महत्त्वही सांगतो.

परंपरेनुसार या दिवशी कष्टाने पिकवलेल्या धान्याचा त्याग करून साधे, कंदमुळे व रानभाज्यांवर आधारित अन्न ग्रहण करण्याची पद्धत काही ठिकाणी आहे. भाताऐवजी वरीचे तांदूळ अर्थात भगर वापरण्याची प्रथा अनेक घरांत आढळते.

या आहारामागे एक सुंदर प्रतीक आहे

शरीराला संयम आणि मनाला शुद्धतेची जाणीव.

सप्तर्षीआपल्या संस्कृतीचे ज्ञानदीप

ऋषीपंचमीचा केंद्रबिंदू म्हणजे सप्तर्षींचे पूजन. कश्यप, अत्री, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नी आणि वसिष्ठया सात महान ऋषींसोबत माता अरुंधतीचे स्मरण केले जाते.

हे ऋषी म्हणजे केवळ प्राचीन काळातील व्यक्ती नव्हेत. ते आपल्या संस्कृतीच्या ज्ञानपरंपरेचे दीपस्तंभ आहेत.

वेद, शास्त्र, औषधविद्या, संस्कार, अध्यात्म, समाजव्यवस्था आणि जीवनदृष्टी यांची परंपरा पुढे नेणाऱ्या या ऋषींच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस.

आपल्या पूर्वजांनी ज्ञानाला संपत्तीपेक्षा श्रेष्ठ मानले. म्हणूनच त्यांनी ज्ञान देणाऱ्यांना 'ऋषी' म्हणून आदर दिला.

आज आपण आधुनिक शिक्षण घेतो, विज्ञान शिकतो, तंत्रज्ञानाच्या युगात जगतो; पण या सर्व ज्ञानपरंपरेच्या मुळाशी असलेल्या आपल्या प्राचीन चिंतनाचा विसर पडू नये, हीच ऋषीपंचमीची खरी शिकवण.

**ऋषीऋणाची जाणीव**

भारतीय संस्कृतीने मानवावर अनेक प्रकारची ऋणे सांगितली आहेतदेवऋण, पितृऋण, ऋषीऋण...

आपण जे काही जाणतो, शिकतो, अनुभवतो, ते सर्व आपल्याला कुणीतरी आधी दिलेले असते.

आई-वडिलांनी जीवन दिले.

गुरूंनी ज्ञान दिले.

पूर्वजांनी संस्कार दिले.

ऋषींनी ज्ञानाची वाट दाखवली.

निसर्गाने जगण्यासाठी आवश्यक सर्व काही दिले.

मग कृतज्ञता व्यक्त करणे ही आपली जबाबदारी नाही का?

ऋषीपंचमी याच भावनेला उजाळा देते.

कारण सणाचा गाभा हा कृतज्ञता, आत्मपरीक्षण, संयम आणि संस्कार यांत आहे. परंपरा जपताना तिचा अर्थही जपूया...

आज गाव बदलत आहेत.

मातीची घरे कमी होत आहेत.

शेतीचे क्षेत्र कमी होत आहे.

रानभाज्या दुर्मीळ होत आहेत.

ढोल-ताशांचा आवाज मोबाइलच्या रिंगटोनमध्ये हरवत आहे.

पण अजूनही कोकणातील एखाद्या गावात पहाटे ढोलाचा आवाज ऐकू येतो...

एखाद्या घराच्या दारावर आंब्याच्या पानांचे तोरण डोलत असते...

आईच्या हातची नऊ भाज्यांची भाजी चुलीवर शिजत असते...

नव्या तांदळाची खीर सुगंध पसरवत असते...

आणि एखादा आजोबा नातवंडांना सांगत असतो

''अरे, ही आपली परंपरा आहे...

ही फक्त पूजा नाही; आपल्या मातीशी असलेलं नातं आहे!''

तेव्हा जाणवते

संस्कृती पुस्तकांत नसते; ती जगण्यात असते.

ती आजीच्या हातच्या चवीत असते.

ती शेताच्या बांधावर असते.

ती देवळातील घंटानादात असते.

ती ढोलाच्या तालात असते.

ती नव्या धान्याच्या सुगंधात असते.

ती घराच्या दारावरील तोरणात असते.

आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजेती आपल्या मनात असते. ऋषीपंचमीचा खरा संदेश...

ऋषीपंचमी आपल्याला सांगते

ज्ञानाचा अहंकार करू नका; ज्ञान देणाऱ्यांचे स्मरण करा.

अन्न वाया घालवू नका; प्रत्येक घासामागचा कष्टाचा घाम ओळखा.

निसर्गाचा उपभोग घेऊ नका; त्याच्याप्रती कृतज्ञ राहा.

परंपरा अंधपणे पाळू नका; तिच्यामागचा सुंदर अर्थ समजून घ्या.

आणि आपल्या पुढच्या पिढीला केवळ आधुनिक जग देऊ नका; त्यांना आपल्या मातीची ओळखही द्या.

कारण ज्याच्या पायाखाली आपल्या गावची माती नाही, त्याच्या प्रवासाला दिशा मिळेल; पण मुळांची ऊब मिळणार नाही.

ऋषीपंचमी म्हणजे...

सप्तर्षींच्या ज्ञानाला वंदन...

निसर्गाच्या उदारतेला नमन...

शेतकऱ्याच्या कष्टाला सलाम...

अन्नदात्याप्रती कृतज्ञता...

पूर्वजांच्या संस्कारांचे स्मरण...

आणि कोकणच्या मातीत रुजलेल्या समृद्ध लोकपरंपरेला मनापासून मुजरा!

गणरायाच्या आगमनानंतर कोकणच्या अंगणात उमलणारा हा संस्कृतीचा सुंदर सोहळा आपल्याला पुन्हा एकदा सांगतो

''माणूस कितीही आधुनिक झाला, तरी त्याने आपल्या मातीशी, निसर्गाशी, ज्ञानाशी आणि संस्कारांशी असलेले नाते कधीही तोडू नये.''

याच मंगल भावनेने सर्वांना ऋषीपंचमीच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा! ●

# निवडक

## श्री चरणी अव्वल स्थानी कायम

**दुबई :** भारतीय फिरकी गोलंदाज श्री चरणी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने जाहीर केलेल्या टी-२० गोलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानी कायम आहे. अनुभवी दीप्ती शर्मांने क्रमवारीत सुधारणा झाली आहे आहे. ताज्या क्रमवारीत श्री चरणी पहिल्या



क्रमांकावर असून, त्यानंतर इंग्लंडची सोफी एक्लेस्टोन दुसऱ्या, इंग्लंडची चार्ली डीन तिसऱ्या, दक्षिण आफ्रिकेची न म्बाला चौथ्या आणि इंग्लंडची लॉरेन बेल पाचव्या स्थानावर आहे. भारताची अनुभवी फिरकी गोलंदाज दीप्ती शर्मांने दोन स्थानांची झेप घेतली असून ती आता सहाव्या स्थानावर आहे. दीप्ती सध्या सुरू असलेल्या आशिया कपमध्ये उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. आणि भारताला उपांत्य फेरीपर्यंत पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

## लाठी स्पर्धेत 'नीव' शाळेचे यश



**नागाव :** राज्यस्तरीय लाठी स्पर्धेत अलिबाग तालुक्यातील 'नीव' विद्यामंदिर नागाव शाळेतील तीन सहभाग घेऊन आपल्या शाळेचे नाव उंच शिखरावर नेले आहे. आठ वर्षाखालील गटामध्ये साईशा पाटील एकमलाठी रौप्यपदक व द्विअनेका सुवर्णपदक, पार्थ निरंजन वहाळकर पंचमलाठी द्विअनेका सुवर्णपदक, मलये पाटील एकमलाटी कांस्यपदक, द्विअनेका सुवर्णपदक प्राप्त केले. या तिन्ही विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय लाठी स्पर्धेसाठी गुजरात येथे निवड झाली आहे. सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या संचालिका कीर्ती कवळे, मुख्याध्यापिका श्वेता कांबळे, उपमुख्याध्यापिका निकिता नागलेकर व सर्व शिक्षकांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षक प्रियंका गुंजाळ यांचे मार्गदर्शन लाभले.

## चॅम्पियन्स ट्रॉफीचे भारतात आयोजन

**दुबई :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) जाहीर केले की, पहिली आयसीसी महिला चॅम्पियन्स ट्रॉफी २०२७ ही स्पर्धा १४ ते २८ फेब्रुवारी दरम्यान मुंबई आणि वडोदरा या भारतीय शहरांमध्ये आयोजित केली जाईल. मुंबईतील क्रिकेट क्लब ऑफ इंडिया (सीसीआय) स्टेडियम आणि वडोदरा आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम



ही या प्रतिष्ठित स्पर्धेची ठिकाणे असतील, ज्यात जगातील सहा आघाडीचे महिला क्रिकेट संघ ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, भारत, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका आणि श्रीलंका सहभागी होतील. ६ जुलै रोजीच्या पात्रता फेरीच्या अंतिम तारखेपर्यंत आयसीसी महिला टी-२० आंतरराष्ट्रीय संघ क्रमवारीत त्यांच्या स्थानानुसार पात्र ठरलेले हे सहा संघ, राऊंड-रॉबिन लीगमध्ये स्पर्धा करतील, ज्यातील अव्वल दोन संघ २८ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या अंतिम सामन्यात प्रवेश करतील. श्रीलंकेत आयोजित करण्याचे नियोजित होते, पण जुलैमध्ये झालेल्या आयसीसी वार्षिक परिषदेत सांगितलेल्या आवश्यक सुधारणा श्रीलंका क्रिकेटने केल्यामुळे आता ती भारतात आयोजित केली जाईल. आयसीसीने आपल्या यजमान निवड निकषांच्या आधारे बांगलादेश, भारत आणि दक्षिण आफ्रिका या तीन दावेदारांचे मूल्यांकन केले आणि भारताला पर्यायी यजमान म्हणून शिफारस केली. या निर्णयाला आयसीसी बोर्डाने मंजुरी दिली. आयसीसी महिला चॅम्पियन्स ट्रॉफी २०२७ ही महिला क्रिकेटसाठी एका रोमांचक नव्या पर्वाची सुरुवात आहे. स्पर्धेची पहिली आवृत्ती म्हणून, ही स्पर्धा जगातील सर्वोत्तम संघांना एका थरारक आणि उच्च-स्तरीय स्पर्धेसाठी एकत्र आणेल, ज्यामुळे संघांना क्रमवारीत वर चढण्यासाठी आणि जागतिक स्तरावर आपले स्थान निश्चित करण्यासाठी अधिक प्रोत्साहन मिळेल.

## तळ्यात पावसाळी क्रीडा स्पर्धांचा शुभारंभ



**तळा :** महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या पावसाळी क्रीडा स्पर्धांना रायगड जिल्ह्यात उत्साहात सुरुवात झाली आहे. रायगड जिल्ह्यातील तळा तालुकास्तरीय दोन दिवसीय भव्य क्रीडा स्पर्धांचे आयोजन दि. ११ व १२ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन सोहळा पंचायत समिती तळाचे सभापती नथुराम मुकण आणि अक्षरा कदम यांच्या हस्ते पार पडला. या दोन दिवसीय स्पर्धेत १४, १७ आणि १९ वर्षांखालील मुले व मुली असे दोन गट करण्यात आले असून थाळीफेक, गोळाफेक, भालाफेक, लांब उडी, उंच उडी, धावणे, बुद्धिबळ, रिले, चालणे, कुस्ती आणि मैदानी खेळ अशा विविध क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. या स्पर्धेत तळा तालुक्यातील गो. म. वेदक विद्यामंदिर, बोरघर हायस्कूल, पिटसई हायस्कूल, पढवण हायस्कूल, मजगाव हायस्कूल, महागाव हायस्कूल, राजिप तळा, कला-वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा, एस. एस. निकम तळा, उर्दू हायस्कूल तळा, मांदाड हायस्कूल, पन्हेळी हायस्कूल, उसर हायस्कूल, राजिप वाशी हवेली, राजिप गायमुख यांसह अनेक शाळांचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. दरम्यान, यापूर्वी जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर विविध क्रीडा प्रकारात चमकदार कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी नायब तहसीलदार मंगेश पालांडे, गटविकास अधिकारी सुनील गायकवाड, गटशिक्षणाधिकारी दीपाली दिवेकर, पुरुषोत्तम मुळे, सचिन कदम, महादेव लोकरे, कसबे पी. पी., वैद्यकीय अधिकारी डॉ. मोधे, विजय येलवे, केंद्रप्रमुखांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लाड यांनी केले. तर आभार क्रीडा समन्वयक कसबे पी. पी. यांनी मानले.

श्रीलंकेचा पाकिस्तानला धोबीपछाड | दोन्ही संघांकडे विजयाची समान संधी

# भारत-श्रीलंकेत रंगणार अंतिम सामना

| मुंबई | वृत्तसंस्था |



भारत आणि श्रीलंका यांच्यात महिला आशिया कप २०२६ चा अंतिम सामना १३ सप्टेंबर रोजी दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर रंगणार आहे. ११ सप्टेंबरला झालेल्या सामन्यात श्रीलंकेने पाकिस्तानचा पराभव करत त्यांचे आशिया कप जिंकण्याचे स्वप्न धुळीस मिळवले आणि थेट अंतिम फेरीत धडक मारली. यासोबतच श्रीलंका संघाने सलग तिसऱ्यांदा अंतिम फेरी गाठली आहे.

अंतिम सामन्यात श्रीलंकेचा सामना हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाशी होणार आहे. पहिल्या उपांत्य सामन्यात भारताने बांगलादेशचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला होता. त्यानंतर दुसऱ्या उपांत्य सामन्यात श्रीलंका आणि पाकिस्तान आमनेसामने आले होते. हा सामना चांगलाच रोमांचक झाला. या सामन्यात पाकिस्तानने श्रीलंकेसमोर १३१ धावांचे लक्ष्य ठेवले होते.

श्रीलंकेने हे लक्ष्य १९ व्या षटकात चार गडी राखून पूर्ण केले. पाकिस्तानची कर्णधार फातिमा सनाने ४७ धावांची महत्त्वाची खेळी केली. त्यानंतर गोलंदाजीतही तिने चार बळी घेतले. त्यामुळे पाकिस्तानचा पराभव झाला असला तरी फातिमाला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. आता भारत आणि श्रीलंका यांच्यात आशिया कपचा अंतिम सामना रंगणार आहे. चला तर मग जाणून घेऊया हा सामना कधी, कुठे आणि किती वाजता होणार आहे.

भारत आणि श्रीलंका यांच्यातील महिला आशिया कप २०२६ चा अंतिम सामना रविवार, १३ सप्टेंबर रोजी होणार आहे. त्याचबरोबर भारत आणि श्रीलंका यांच्यातील हा सामना दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळला जाणार आहे. आता दोन्ही संघ अंतिम सामन्यासाठी सज्ज झाले आहेत.

भारताला आशिया कपची ट्रॉफी जिंकायची असेल, तर श्रीलंकेच्या संघाचे आव्हान पार करावे लागणार आहे. त्यामुळे १३ सप्टेंबरला होणारा हा सामना चांगलाच रंगणार आहे. दरम्यान, भारत आणि श्रीलंका संघ आता रविवारी १३ सप्टेंबरला एकमेकां विरूद्ध अंतिम सामना खेळतील. भारताने दहावेळा तर श्रीलंका संघाने सलग तिसऱ्यांदा आशिया कपची फायनल गाठली आहे. भारत-श्रीलंका महिला आशिया कपचा अंतिम सामना भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता सुरू होईल. त्याआधी अर्धा तास म्हणजेच ७.३० वाजता दोन्ही संघांचे कर्णधार नाणेफेकीसाठी मैदानात उतरतील.

**'दोन्हा संघातील खेळाडू**

हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मंधाना, शेफाली वर्मा, दीप्ती शर्मा, रिचा घोष, राधा यादव, श्री चरणी, रेणुका सिंह ठाकूर, क्रांती गौड, भारती फुलमाळी, गुनालन कमलिनी, नंदिनी शर्मा, प्रतीका रावल, अरुंधती रेड्डी आणि प्रेमा रावत.

**श्रीलंकेचा संघ**

चमारी अटापट्टू (कर्णधार), इमेशा दुलानी, संजना कविंदी, विश्मी गुणरत्ने, हर्षिता समरविक्रमा, कविशा दिलहारी, नीलाक्षिका सिल्वा, हसिनी परेरा, कौशानी नुथ्यांगना, सुगंधिका कुमारी, चेतना विमुक्ती, काव्या कविंदी, मिताली अयोध्या, देवमी विहंगा आणि चामुडी प्रबोदा.

## आशियाई क्रिकेट संघाच्या प्रशिक्षकपदी लक्ष्मण

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्सचे क्रिकेट संचालक व्हीव्हीएस लक्ष्मण हे जपानमधील आइची-नागोया येथे होणाऱ्या आगामी २०२६ आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय पुरुष संघाच्या प्रशिक्षकपदाची धुरा सांभाळणार आहेत. क्रीडा मंत्रालयाने जाहीर केलेल्या प्रशिक्षकांच्या यादीनुसार, लक्ष्मण यांना सुनील जोशी, हृषिकेश कानिटकर, सुभादीप घोष यांची मदत मिळेल. यापूर्वी चीनमधील हांगझोऊ येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेतही लक्ष्मण यांनी भारतीय पुरुष संघाचे प्रशिक्षकपद भूषवले होते, जिथे भारताने सुवर्णपदक जिंकले होते. नयमित मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर हे वेस्ट इंडिजविरुद्धच्या मायदेशातील वनडे मालिकेसाठी वरिष्ठ संघासोबत असतील; या मालिकेतील पहिला सामना २७ सप्टेंबर रोजी खेळवला जाणार आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेतील क्रिकेट स्पर्धा २४ सप्टेंबरपासून सुरू होईल. भारत आपला पहिला सामना चार दिवसांनंतर खेळेल.

## नमिता नाईक इंग्लिश मिडीयम स्कूलला लाठी स्पर्धेमध्ये सुवर्णपदक



| अलिबाग | प्रतिनिधी |

नागपूर येथे (दि. ६) सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय लाठी स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत के. ई. एस. नमिता नाईक इंग्लिश मिडीयम स्कूल अलिबाग शाळेतील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय लाटी स्पर्धेमध्ये ७ सुवर्णपदक मिळवले. स्पर्धेत १६ जिल्ह्यानी सहभाग घेत २५० विद्यार्थी सहभागी झाले होते. रायगड जिल्ह्यातील २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन अलिबाग तालुक्यातील के. ई.एस नमिता नाईक इंग्लिश मिडीयम स्कूल विद्यार्थ्यांनी भरघोस यश प्राप्त केले. आठ वर्षाखालील गटामध्ये रुद्रा पिळणकर एकमलाठी द्विलाठी सुवर्णपदक पटकावले. प्रियल तुरे सुवर्णपदक, प्रण्नेश पाटील एकमलाठी, द्विलाठी, सुवर्णपदक, शिवम गुंजाळ एकम लाठी पंचम लाठी सुवर्णपदक प्राप्त केले. या सर्व विद्यार्थ्यांची राष्ट्रीय लाठी स्पर्धासाठी गुजरात येथे निवड करण्यात आली आहे. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## एजबॅस्टन कसोटीत पाकिस्तान पराभवाच्या छायेत

| बर्मिंगहॅम | वृत्तसंस्था |




इंग्लंडने पहिल्या डावात आधीच ३२० धावांची आघाडी घेतली होती. त्यानंतर, बाबर आझम (७६) आणि शान मसूद (९५) यांनी शानदार खेळी केली आणि अखेरीस, पदार्पण करणाऱ्या रझाउल्लाहने चार बळी घेत ८१ धावा करून पाकिस्तानला झोपेतून जागे केले. परिणामी, पाकिस्तानने दुसऱ्या डावात ४४९ धावांचा डोंगर उभा करून डावाने पराभव टाळला आणि इंग्लंडसमोर तिसऱ्या दिवसाच्या अखेरपर्यंत १३० धावांचे लक्ष्य ठेवले. दुसऱ्या दिवशी पाकिस्तानचा डाव ५२ धावांवर दोन गडी बाद असा होता. बर्मिंगहॅमच्या मैदानावर तिसऱ्या दिवशी अझान अवैस आणि शान मसूद डावात आले. या दोघांनी सूत्रे हाती घेतली आणि ५२ धावांनी आघाडी वाढवली.

पहिल्या डावात १३३ धावांवर सर्वबाद झाल्यानंतर, माजी कर्णधार मसूद आणि कर्णधार बाबर यांनी पाकिस्तानला डावाच्या पराभवाच्या उंबरठ्यावरून वाचवले, पण ते याहून पुढे मजल मारू शकले नाहीत. त्यांच्या बाद झाल्यानंतर पाकिस्तानच्या ३१८ धावांवर आठ गडी बाद झाले होते. त्यानंतर रझाउल्लाह आणि मोहम्मद अब्बास यांनी सूत्रे हाती घेतली. त्यांनी दिवसअखेरपर्यंत आपली जागा टिकवून ठेवली, ज्यामुळे इंग्लंडचे वेगवान गोलंदाज विकेट्ससाठी हताश झाले. रझाउल्लाह आणि अब्बास यांनी नवव्या विकेटसाठी १२१ धावांची भागीदारी केली. पाच चौकार आणि दोन षटकारांसह ६७ चेंडूंमध्ये ४२ धावा करून अब्बास बाद झाला. मात्र, रझाउल्लाहने चार चौकार आणि नऊ षटकारांसह ६३ चेंडूंमध्ये ८१ धावा करून सर्वांची मने जिंकली. तिसऱ्या दिवसाच्या अखेरीस पाकिस्तानने दुसऱ्या डावात ४४९ धावांचा डोंगर उभा केला. रझाउल्लाहच्या ३२० धावांच्या आघाडीनंतर, त्यांनी इंग्लंडसमोर १३० धावांचे लक्ष्य ठेवले. यासह तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला. आता इंग्लंडला विजय मिळवण्यासाठी उर्वरित दोन दिवसांत १३० धावांची गरज आहे.

## सबालेन्का-रायबाकिना जेतेपदासाठी भिडणार

| न्यूयॉर्क | वृत्तसंस्था |



यूएस २०२६ ओपनच्या महिला एकेरीच्या अंतिम सामन्याचं चित्र स्पष्ट झाले आहे. अव्वल मानांकित आर्यना सबालेन्का आणि कझाकस्तानची एलेना रायबाकिना विजेतेपदासाठी आमनेसामने येतील. दरम्यान, अमेरिकन कोको गॉफ आणि जेसिका पेगुला यांचा प्रवास उपांत्य फेरीतच संपला.

आर्थर स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात, सबालेन्कानं तिसऱ्या मानांकित जेसिका पेगुलाचा ७-५, ६-२ असा पराभव केला. या विजयामुळे ती सलग तिसऱ्या यूएस ओपन विजेतेपदापासून फक्त एक विजय दूर आहे.

दुसऱ्या उपांत्य फेरीत, अमेरिकन कोको गॉफचा सामना एलेना रायबाकिनाशी झाला. गॉफनं पहिला सेट ६-३ नं जिंकून सामन्याची शानदार सुरुवात केली. मात्र, त्यानंतर रायबाकिनाने जोरदार पुनरागमन करत दुसरा सेट ६-४ नं जिंकून सामना निर्णायक सेटमध्ये नेला. रायबाकिनाने तिसरा सेटही ६-४ नं जिंकून अंतिम फेरीत प्रवेश केला.

यूएस ओपन २०२६ महिला एकेरीचा अंतिम सामना सबालेन्का आणि रायबाकिना यांच्यात खेळला जाईल. सबालेन्का तिच्या सलग तिसऱ्या विजेतेपदासाठी प्रयत्न करेल, तर रायबाकिना स्वतःच्या विजेतेपदासाठी प्रयत्नशील असेल.

## ब्राझीलच्या फुटबॉल संघाची घोषणा

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |



पाच वेळा विश्वचषक विजेत्या ब्राझीलने ३ ऑक्टोबर रोजी कोलकाता येथील विवेकानंद युवा भारती क्रीडांगणावर भारताविरुद्ध होणाऱ्या मैत्रीपूर्ण सामन्यासाठी २६ सदस्यीय मजबूत संघाची घोषणा केली आहे. मुख्य प्रशिक्षक कार्लो अँसेलोटी यांनी विनिसियस ज्युनियर, राफिन्हा, अँड्रिक आणि ब्रुनो गुइमारेस यांसारख्या स्टार खेळाडूंचा संघात समावेश केला आहे. या संघात बॅलोन डी ओरसाठी नामांकित तीन फुटबॉलपटूंचाही समावेश आहे. भारतात येण्यापूर्वी, ब्राझीलचा संघ २५ आणि २९ सप्टेंबर रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध दोन सामने खेळेल. त्यानंतर संघ कोलकाता येथे जाईल, जिथे ३ ऑक्टोबर रोजी त्यांचा सामना भारतीय संघाशी होईल. अँसेलोटी यांनी आक्रमणामध्ये अनेक पर्यायांचा समावेश केला आहे. विनिसियस ज्युनियर, राफिन्हा आणि अँड्रिक यांच्या व्यतिरिक्त, एस्तेवाओ, जोआओ पेड्रो, पेड्रो, रायन आणि सॅम्युअल लिनो यांचाही संघात समावेश करण्यात आला आहे. ब्रुनो गुइमारेस आणि डग्लस लुईझ ही मिडफिल्डमधील प्रमुख नावे आहेत. आंद्रेई सँटोस, ब्रेनो बिडॉन, डॅनिलो सँटोस आणि गॅब्रिएल बोंटेम्पो यांचाही संघात समावेश करण्यात आला आहे. आर्सेनलचा बचावपटू गॅब्रिएल मॅगाल्हेस आणि अनुभवी ब्राझिलियन फुटबॉलपटू मार्किन्होस यांचा समावेश आहे. आर्थर डायस, डग्लस सँटोस, जायर, मातेउझिन्हो, माउरो ज्युनियर, व्हिटोर रेइस आणि वेस्ली यांची निवड झाली आहे. गोलरक्षक म्हणून ह्यूगो सूझा, पेड्रो मोरिस्को आणि ओटाव्हियो यांचा संघात समावेश करण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधील सर्वात यशस्वी संघांपैकी एक असलेल्या ब्राझीलविरुद्ध स्वतःला आजमावण्यासाठी खालिद जमीलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघासाठी हा सामना एक उत्तम संधी असेल. ब्राझीलचा संघ: गोलरक्षक: ह्यूगो सूझा, पेड्रो मोरिस्को आणि ओटाव्हियो; बचावपटू: आर्थर डायस, डग्लस सँटोस, गॅब्रिएल मॅगाल्हेस, जैर, मार्किन्होस, मातुझिन्हो, मौरो ज्युनियर, व्हिटर रेस, वेस्ली; मिडफिल्डर: आंद्रेई सँटोस, ब्रेनो बिडॉन, ब्रुनो गुइमारेस, डॅनिलो सँटोस, डग्लस लुईझ, गॅब्रिएल बोंटेम्पो; फॉरवर्ड्स: अँड्रिक, एस्टेव्हाओ, जोआओ पेड्रो, पेड्रो, राफिन्हा, रायन, सॅम्युअल लिनो, विनिशियस ज्युनियर यांचा संघात समावेश केला आहे.

## भारत मदनेने पटकावला 'खान्देश केसरी' किताब

| जळगाव | प्रतिनिधी |

ग्रामदैवत मरीआईच्या वार्षिक यात्रेनिमित्त धरणगाव इथे आयोजित करण्यात आलेल्या कुस्तीदंगलीत मल्लांच्या थरारक डावपेचांनी रंगत आली. खान्देश केसरी किताबासाठी झालेल्या अंतिम लढतीत मुंबई महापौर केसरी भारत मदने याने हरियाणाचा मल्ल मलंग ठाकूर याच्यावर मात करत दमदार विजय मिळवला. या विजयासह भारत मदनेने मानाचा खान्देश केसरी किताब पटकावत कुस्तीप्रेमींची मने जिंकली. यंदाच्या कुस्तीदंगलीत महाराष्ट्रासह हरियाणा आणि इतर भागांतील नामांकित मल्लांनी सहभाग घेतल्याने कुस्तीप्रेमींमध्ये मोठी उत्सुकता होती. अंतिम लढतीत दोन्ही मल्लांनी प्रतिस्पर्ध्यावर डाव टाकण्यासाठी अनेक प्रयत्न केले. अखेर भारत मदनेनं मलंग ठाकूर याच्यावर मात करत या प्रतिष्ठेच्या लढतीत विजय मिळवला.

देशातील नामवंत धावपटूंनी सहभाग | जगभरातील खेळाडूंसाठी स्पर्धेचे आयोजन

# हिमालयात कोकण कोस्टल मॅरेथॉनचा आवाज

| रत्नागिरी | प्रतिनिधी |



हिमालयाच्या कुशीत कोकणच्या क्रीडा पर्यटनाचा संदेश घुमवणारी कोकण कोस्टल हाफ मॅरेथॉनची विशेष प्रोमो रन लेह येथे उत्साहात पार पडली. देशभरातील सुमारे २०० धावपटूंनी या उपक्रमात सहभाग घेत कोकणातील या वैशिष्ट्यपूर्ण मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. गेली तेरा वर्षे लडाखमधील पर्यटनाला चालना देण्यासाठी लेह मॅरेथॉनचे आयोजन केले जाते. यंदा या स्पर्धेसाठी भारतभरातून सुमारे सहा हजार धावपटू लेहमध्ये दाखल झाले. या निमित्ताने कोकणवासीयांनी जगभरातील धावपटूंसाठी आयोजित केलेली मॅरेथॉन अशी ओळख निर्माण झालेल्या कोकण कोस्टल हाफ मॅरेथॉनचे प्रमोशनही मोठ्या प्रमाणावर करण्यात आले.

या प्रचार मोहिमेसाठी कोकण कोस्टल हाफ मॅरेथॉनची टीम २० ऑगस्ट रोजी रत्नागिरीहून रवाना झाली होती. सुरत, बडोदा, गांधीनगर, इंदूर, जयपूर, आग्रा, गाझियाबाद आदी रत्नागिरीशी रेल्वेने जोडलेल्या शहरांमध्ये विविध रनिंग कम्युनिटींना भेटी देत ही टीम लेहमध्ये पोहोचली.

या उपक्रमाचे प्रमुख आणि सुवर्णसूर्य फाऊंडेशनचे संचालक प्रसाद देवस्थळी हे जगातील अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या खारदुंग-ला चॅलेंज (७२ किमी) मध्ये सहभागी झाले असून जवळपास ३०० स्पर्धकांमध्ये त्यांचा समावेश आहे. तसेच अभिजित पड्याळ ४२ किमी फुल मॅरेथॉनमध्ये सहभागी झाले आहेत. गेल्या चार वर्षांपासून अधिकाधिक धावपटूंना कोकणाकडे आकर्षित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून लेह मार्केट-शांती स्तूप-लेह मार्केट या मार्गावर विशेष प्रोमो रन आयोजित करण्यात आली. या रनमध्ये देशातील नामवंत धावपटूंनी सहभाग घेतला. त्यामध्ये १५ वेळा कॉम्रेड्स मॅरेथॉन पूर्ण केलेले सतीश गुजराण, भारतातील कॉम्रेड्स मॅरेथॉनमधील वेगवान धावपटू आणि प्रशिक्षक योगेश सानप, एसकेएफ गोवा रिव्हर मॅरेथॉनच्या व्यवस्थापन समितीचे दिनेश हेडा, तेलंगणा पोलिसांच्या अँटी करप्शन विभागातील पिल्ली राजू, मंगळुरूच्या महवीश हुसेन, हिमाचल प्रदेशातील अल्ट्रा रनर तेनझिंग डोलमा यांच्यासह अरुणाचल प्रदेशापासून गुजरातपर्यंत आणि आसेतुहिमाचल भारताच्या कानाकोपऱ्यातील धावपटू सहभागी झाले होते.

> कोकण कोस्टलमध्ये संपूर्ण २१.१ किमीचा मार्ग प्रत्येक क्षणी नवा अनुभव देणारा आहे. यामुळे देशभरातील धावपटूंमध्ये या स्पर्धेबद्दल विशेष आकर्षण निर्माण झाले आहे. येत्या ३ जानेवारी २०२७ रोजी होणाऱ्या कोकण कोस्टल हाफ मॅरेथॉनच्या चौथ्या पर्वाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळेल.
>
> – प्रसाद देवस्थळी
> आयोजक

कोकणवासीय ज्या उत्साहाने या स्पर्धेचा प्रचार करत आहेत, त्यामुळे आता कोकण कोस्टल हाफ मॅरेथॉनला प्रत्यक्ष सहभागी होण्यासाठी यायलाच हवे, अशी प्रतिक्रियाही अनेकांनी दिली. कोकण कोस्टल हाफ मॅरेथॉनची आणखी एक मोठी जमेची बाजू म्हणजे तिचा एकदिशीय मार्ग.

दरम्यान, लेहमध्ये प्रचार मोहीम सुरू असताना रत्नागिरीमध्ये टीम पंचकन्या मानसी मराठे, अंकिता पाटकर, स्नेहल कलाल, केतकी लेले आणि राधा बसणकर या दर रविवारी नियमितपणे मोफत प्रॅक्टिस रनचे आयोजन करत आहेत. बाहेरून जितके धावपटू येतील तितक्याच संख्येने रत्नागिरी जिल्ह्यातील धावपटूंनीही सहभागी व्हावे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. सलग ११० रविवार ही मोफत प्रॅक्टिस रन अखंडपणे सुरू असून त्याचे सकारात्मक परिणाम ३ जानेवारी २०२७ च्या कोकण कोस्टल हाफ मॅरेथॉनमध्ये तसेच २८ मार्च २०२७ रोजी होणाऱ्या गणपतीपुळे हाफ मॅरेथॉनमध्ये निश्चितपणे दिसून येतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)